मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे मुखपत्र

मुस्लीम सत्यशोधक पत्रिका

वर्ष : ९, अंक : ४

एप्रिल-मे-जून २०२३



निवडणूककेंद्रित लोकशाही देशासाठी मारक

राजकीय विश्लेषक डॉ. हिलाल अहमद यांचे मत

मुस्लिम समाजाने सत्यशोधक बनावे

डॉ. रावसाहेब कसबे; महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे पुरस्कार प्रदान

'दलवाई यांच्या नावाने साहित्य पुरस्कार द्यावा'

एकदाचा समान नागरी कायदा आणाच

डॉ. रावसाहेब कसबे

समाज मूल्यांचा आग्रह धरला पाहिजे

पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) - संविधान हा एक मार्ग ...

'सत्यशोधनातून शोधा प्रश्नांची उत्तरे'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'भारतीय लोकशाही निवडणूककेंद्रित झाली असून, समाजात आर्थिक विषमता वाढत आहे, तसेच विवेकवाद व नीतिमत्तेचा ऱ्हास होत आहे. ...

सत्यशोधक मंडळ आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठानतर्फे आयोजि... बोलताना डॉ. हिलाल अहमद. या वेळी व्यासपीठावर (डावीकडू...

मुस्लिम धर्मीयांबद्दल शंकास्पद वातावरण करण्याचा प्रयत्न : डॉ. तांबोळी

पुणे : मुस्लिम धर्मीयांबद्दल सध्या समाजात शत्रुभाव, द्वेष पसरविण्याचे काम सुरु आहे. राजकारणासाठी धुव्रीकरणांची भाषा वापरली जात आहे. लोकांच्या मनात शंका निर्माण होईल, असे जावणीपूर्वक वातावरण निर्मिती करण्यात येत आहे. समाजाच्या एकात्मेसाठी ... प्रवेशद्वारावरच डबे तपासण्याचे आदेश पोलिस प्रशासनाने काढला होता. त्यापार्श्वभूमीवर बागेत येणाऱ्या मुस्लिम धर्मीयांचे डबे तपासण्यात आले होते. ईदच्या दुसऱ्या दिवशी गोड पदार्थ खाण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी एकत्र येतो. कोणत्याही प्रकारचे मासांहार आमच्याकडून मंदिराच्या परिसरात होत नाही. ... करण्यासाठी महिलांची धावपळ असते. दुसऱ्या दिवशी विरंगुळा म्हणून शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या ठिकाणी सारसबागेत येतात. डब्यात गोड पदार्थ, शिरखुर्मा घेऊन लोक येतात. मात्र त्यांच्याकडे संशयाच्या नजरने पाहणे चुकीचे आहे. सारसबागेत पवित्र असे गणपती मंदिराचे ठिकाण आहे.

धर्मांधतेचा बीमोड देशातील नागरिकच करतील : अन्सा...

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : भीती, आमिष तसेच ब्लॅकमेलिंगला घाबरून सत्ताधाऱ्यांच्या पक्षात प्रवेश करीत ...

सत्यशोधक वृत्तीने समाजाला त्या...

हमीद दलवाईंमुळे मुस्लिम महिलांना दिशा मिळते - ऊर्मिला मातोंडकर

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) - समाजातील मागासलेल्या मुस्लिम समाजाला संघटित करून बाहेर काढण्याचे काम हमीद दलवाई ...

मुस्लीम सत्यशोधक मंडळ
५३ वा वर्धापन दिन



माजी खासदार मा. अली अनवर अन्सारी यांचे स्वागत



मा. उर्मिला मातोंडकर यांचे स्वागत



मा. वसीमा हैदरसाब शेख मनोगत व्यक्त करताना...



मा. रजिया सुलताना यांच्या पुस्तकाचे प्रकाशन....

खाजगी वितरणासाठी

मुस्लीम सत्यशोधक पत्रिका

वर्ष : ९ एप्रिल, मे, जून २०२३ अंक : ४

स्वागतमूल्य : रु. १००/-

पत्रव्यवहाराचा पत्ता : सी/८/२३ स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८.

भ्रमणध्वनी : ९८२२६७९३९१ Email : tambolimm@rediffmail.com

वार्षिक वर्गणी : रुपये २५०/- **पंचवार्षिक वर्गणी : रुपये १,२००/-**

मुस्लीम समाजाचे प्रबोधन करणाऱ्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाने ५२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंडळासाठी आपली देणगी व मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे वर्गणीदार होण्यासाठी, जाहिरात देण्यासाठी बँक खाते तपशील पुढीलप्रमाणे -

मुस्लीम सत्यशोधक मंडळ

कॅनरा बँक, भवानी पेठ, पुणे ४२.

बचत खाते क्र.: 0361101010080

IFSC Code : CNRB0000361

अंतरंग....

संपादकीय....

''जो लोग सवाल नही उठाते, वे पाखंडी है... जो सवाल नहीं कर सकते, वे मुर्ख है... जिनके ज़हन मे सवाल उभरता ही नहीं, वे गुलाम है...''

- जॉर्ज गॉडन बायरन

भारतातील आक्रमक हिंदुत्ववाद कधी नव्हे इतका असहिष्णु, बदला घेण्यास असूसलेला आणि कायदा हातात घेऊन मुस्लीम समुदायाला धडा शिकवण्यास सुसज्ज झाला आहे. आतापर्यंतचा अनुभव असा होता की, मुस्लीम समुदायाकडून काही विपरित घटना घडल्यास धार्मिक दंगलीस पोषक वातावरण व्हायचे, आता मुस्लीम समाजाकडून विविध कारणांमुळे अशा घटना होत नाहीत - मग काही तरी शुल्लक कारणे निमित्त ठरतात किंवा अशी कृत्रिम - बनावट कारणे पुढे करण्यात येतात. आता तर कारणं असायलाच पाहिजे असेही नाही. कुरापती काढणे, इतिहासात पुरलेल्या घटनांना उकरून काढणे किंवा स्वत: होऊन अशी परिस्थिती निर्माण करणे असे प्रकार वाढत आहे. अर्थात मुस्लीम जमातवाद संपला आहे, तो शांत आहे असे म्हणता येणार नाही. राजकारण, ध्रुवीकरणाचे वातावरण, हिंदुत्ववाद्यांचे वाढलेले मनोबल, त्यांना लाभलेली मानवी, वित्त आणि अनुकूल राजसत्ता याला घाबरून मनातील अस्वस्थता व्यक्त केली जात नाही. आपण या देशातील अल्पसंख्याक आहोत आणि आपली शक्ती कमी आहे, कुरापत काढणे परवडणारे नाही याची जाणीव झाली आहे किंवा अशा जाणीवा जाणीवपूर्वक निर्माण केल्या जात आहेत.

मध्यंतरी त्र्यंबकेश्वर, अहमदनगर, अमरावती, धुळे, कोल्हापूर भागात हिंदू संघटनांनी मोठ-मोठे मोर्चे काढले, गाव बंद केले, बहिष्काराची भाषा केली, गावातून पळवून लावण्याचे प्रकार झाले आणि याला कारण सांगण्यात आले 'लव्ह जिहाद'चे आणि 'धर्मांतरा'चे. काही ठिकाणी औरंगजेबाच्या फोटोचे, टिपू सुलतानच्या फोटोचे स्टेटस लावण्याचे कारण आणि संपूर्ण मुस्लीम

समाजावर याचे खापर फोडण्याचे, वातावरण पेटवण्याचे प्रयत्न झाले. वास्तविक कोणताही समाज हा गुन्हेगार नसतो. कोणत्याही समाजातील काही माणसं गुन्हेगार मानसिकतेची असू शकतात किंवा अशा माणसांकडून जाणते अजाणतेपणातून काही अपराध होऊ शकतात. अशा अपराध्याला ताब्यात घेणे, पोलीसांच्या ताब्यात देणे आणि रितसर पद्धतीने खरे-खोटे-सत्यता समोर आणणे अशांना शिक्षा होणे हे अपेक्षित असते. मात्र तथाकथीत किंवा खऱ्या गुन्हेगाराला ताब्यात घेणे, त्याला मारणे, हत्या करणे आणि कायदा हातात घेऊन शिक्षा करणे, स्वत:ला न्यायाधिशाच्या भूमिकेत पाहणे हे प्रकार अराजकता निर्माण करणारे आहेत. त्यातही एका व्यक्तीचा अपराध म्हणजे त्याचा जन्म ज्या जात-धर्म समुहात झाला त्या संपूर्ण समाजाचा अपराध समजणे, संपूर्ण समाजाला वेठीस धरणे हे वाढते प्रकार संपूर्ण देशाला अडचणीत आणणारे ठरणार आहेत.

अलीकडच्या काळात संशयाचे वातावरण निर्माण करण्याचे प्रकार आक्षेपार्ह पद्धतीने वाढवण्यात येत आहेत. एक उदाहरण येथे द्यावेसे वाटते, मुस्लीम समाजात रमजान महिन्यास महत्त्व असते. महिनाभर उपवास ठेवतात आणि याची सांगता रमजान ईदला करण्यात येते. या महिन्यात महिला वर्गाची फार बेजारी होते. सकाळ/पहाटेचा स्वयंपाक, ज्येष्ठांची काळजी, स्वच्छता, सायंकाळचा स्वयंपाक असे महिनाभर धावपळीचे असते. ईदच्या दिवशी तर जास्त धावपळ असते. घरातले, नात्यातले, मित्र, अन्य धर्मिय लोक शुभेच्छा देण्यासाठी, जेवणासाठी येत असतात. यात महिलांची दमछाक फार होते. ईदच्या दिवशी झालेली बेजारी-थकवा घालवण्यासाठी, बदल म्हणून किंवा आनंद घेण्यासाठी या महिला मुलांसह जवळपासच्या बागेत जात असतात. हे अनेक वर्षांपासून चालते. यावर्षी पुण्यातील सारसबागेच्या प्रवेशद्वाराजवळ सुरक्षा वाढवण्यात आली. काही हिंदुत्ववादी संघटनांनी असा शोध लावला (जावई शोध) की या महिला मांसाहाराचे पदार्थ घेऊन बागेत येतात आणि त्यामुळे पावित्र्य नष्ट होते, भावना दुखवतात वगैरे. या महिलांच्या पिशव्या, खाण्याचे डबे तपासण्यात आले, असे तपासल्यानंतरच त्यांना सारसबागेत प्रवेश देण्यात आला. विशेष म्हणजे एकाही महिलेजवळ कोणतेही मांसाहाराचे किंवा आक्षेपार्ह पदार्थ मिळाले नाही. मात्र ज्यापद्धतीने संशय व्यक्त केला, अपमानीत

वागवले याबद्दल कोणालाही आपण चुकीचे काही करीत आहोत असे वाटले नाही. भारतात मांसाहार फक्त मुस्लीमच करतात अशी एक भावना-गैरसमज करून दिला आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आरंभापासूनच आधुनिक, प्रवाहातील शिक्षणाचे समर्थन आणि प्रसार करते. मदरसा शिक्षण ऐहिक विकासात अडथळा ठरते म्हणून मुस्लीमांनी मदरसा शिक्षणापासून दूर रहावे अशी भूमिका मांडते. मदरसांची नोंदणी, मदरसांचे आधुनिकीकरण, सुधारणा याचे समर्थन स्वागत करते. मात्र जशा वेदपाठशाळा पुरोहितवर्ग निर्माण करण्यासाठी चालवण्यात येतात तसेच मदरसामधून मुस्लीम पुरोहितवर्ग निर्माण होतात. बहुतेकवेळा दारिद्र्य, आर्थिक प्रश्न असलेले लोक आपल्या मुलांना अशा मदरसात पाठवतात. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात बिहारमधून जवळपास साठ अल्पवयीन मुले पुणे - सांगली भागात मदरसा प्रवेशासाठी त्यांच्या शिक्षकांच्या सोबत येत होती. या मुलांना आणि त्यांच्या शिक्षकांना संशयावरून मनमाड, नाशिक भागात ताब्यात घेण्यात आले आणि प्रसार माध्यमातून अनेक गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न झाला. ही मुले म्हणजे मानवी अपहाराचा प्रकार आहे. त्यांना बालकामगार म्हणून आणण्यात आले. ही मुले बांगलादेशातील असण्याची शक्यता आहे. त्यांच्याकडून काही गुन्हे घडवून आणायचे असतील, त्यांना महाराष्ट्रातच का आणले वगैरे... अर्थात असा तपास करायला काही हरकत नाही. सुरक्षेच्या कारणास्तव, संशय म्हणून तपासणे, चौकशी करणे आवश्यक असतेच. मात्र ज्या पद्धतीच्या बातम्या प्रसारीत करण्यात आल्या, जी बदनामी झाली, संशय निर्माण करण्यात आला ते कसे परत करणार ? बिहारमधून या मुलांचे पालक आले, काही कार्यकर्ते आले, त्यांनी एकूण परिस्थिती समजावून सांगितली. त्यांनी स्वत: शिक्षणासाठी या मुलांना इतक्या लांब पाठवल्याचे सांगितले. आपली मुले परत द्यावीत यासाठी रडकुंडीला येऊन विनंती करीत होते - अर्ज विनवण्या करीत होते. हे चित्रही प्रसारमाध्यमाने टिपले; पण औपचारिकतेच्या नावाखाली जो त्रास दिला, अवमानित केले, संशय पसरवण्यात आला त्याचे काय ?

अगदी अलीकडे म्हणजे १३, १४ जून रोजी शिर्डीच्या साईबाबा मंदिराबद्दल संशयाची बातमी पसरवण्यात आली. या मंदिरात दान केला जाणारा पैसा एका

मशिदीला मदत म्हणून देण्यात येतो अशी कोणीतरी शंका घेतली. यासाठी कुठलातरी जुना व्हिडिओ प्रसारीत केला, ज्यात मुस्लीम मुले पैसे जमा करताना आणि मोजताना दाखवले. मंदिराच्या विश्वस्तांनी, जबाबदार प्रतिनिधींनी असा कोणताही प्रकार होत नसल्याचे स्पष्ट केले. टी. व्ही. चॅनलने ही बातमी खोटी असल्याचे स्पष्ट केले. हे सर्व काही घडले मात्र हे कोणी केले ? का केले ? याचा तपशील मात्र गुलदसत्यात आहे.

मध्यंतरी कोल्हापूर बंदची हाक देण्यात आली. मोर्चा काढण्यात आला आणि कारण ठरले कोणीतरी माथेफिरूने औरंगजेबचा फोटो स्टेटसवर ठेवला. या दंगलीवर अनेक प्रतिक्रिया आल्या. खुद्द कोल्हापूरकरांना हा प्रकार आवडला नाही कारण असा धार्मिक द्वेष यापूर्वी राजर्षि शाहू महाराजांच्या कोल्हापूराने पाहिला नव्हता. मात्र राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया देताना जे उद्‌गार काढले ते कोणाला अक्षेपार्ह वाटले का ? या उद्‌गारावर हव्या तशा प्रतिक्रिया आल्या का ? 'औरंग्याच्या आवलादी कशा पैदा झाल्या ?' या पद्धतीचे ते विधान होते. महाराष्ट्रातील मुस्लीम समाज औरंगजेबला आपला आदर्श किंवा श्रद्धास्थान मानत नाही. 'औरंग्याच्या अवलादी' अशी तीव्र प्रतिक्रिया देणारे उपमुख्यमंत्री दुसऱ्या एका घटनेकडे मात्र पुर्णत: दुर्लक्ष करतात. अर्थात ते ज्या सांस्कृतिक संघटनेतून आले त्यास ते साजेसे आहे. ती घटना म्हणजे - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा मारेकरी नथुराम गोडस यांच्या प्रतिमेला हार घालून त्यांना गौरविण्यात येत होते आणि राष्ट्रपित्यांचा अपमान करण्यात आला. नथुराम गोडसे यांची स्तुती करणे, हार घालणे आणि राष्ट्रपतींचा अवमानकारक भाषेत उल्लेख करणे ही घटना व्यवस्थितपणे दुर्लक्षित कशी केल्या जाते ? आपली लोकशाही इतकी संकुचित करण्यात येत आहे का ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सावरकरांची तुलना करून आंबेडकर मुस्लीमविरोधी कसे होते ? सावरकरांचा हिंदुत्ववाद आणि डॉ. आंबेडकरांच्या हिंदुत्ववादात कसे साम्य आहे ? हे सांगताना संविधानास हार घालून त्याची पूजा करण्यात येते आणि संविधानिक मूल्ये पायदळी तुडवण्यात येतात. धर्मनिरपेक्ष भारताचे हिंदू राष्ट्रात रूपांतर होत असताना समतावादी संघटना 'हरघर संविधान'चा नारा देतात, तर दुसरीकडे 'हरघर सावरकर'चा निर्धार काही हिंदुत्ववादी शक्ती करीत आहेत. या सर्व घटना आमचा देश कोणत्या दिशेने

आणि कुठपर्यंत जाणार आहे हे विचार करणाऱ्या मंडळींच्या लक्षात येण्यास वेळ लागणार नाही.


मुस्लीम द्वेष इतक्या पराकोटीला जात आहे की, समाजसुधारक हमीद दलवाईंविषयी असणारा पूर्वीचा आदर आज कमी झाला आहे. हमीद दलवाई यांच्या स्मृतीदिनानिमित्त दैनिक 'लोकसत्ता'मध्ये 'दलवाई हिंदुंनाही का हवेत ?' असा लेख प्रसिद्ध झाला तेव्हा 'आमच्याकडे भरपूर सुधारक आहेत, दलवाईंची आम्हाला गरज नाही, दलवाई तुमच्याकडेच ठेवा' अशा प्रतिक्रिया आल्या. या संदर्भात लोकसत्तातील लेख आणि त्यावरील प्रतिक्रिया मुद्दामहून या अंकात प्रसिद्ध केल्या आहेत.

गेल्या दोन महिन्यांपासून जागतिक स्पर्धेत भारताला पारितोषिक मिळवून देणाऱ्या महिला त्यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध आंदोलन करीत आहेत. मात्र सरकार या महिलांचे म्हणणे ऐकूण घेण्यास तयार नाही. महिला सन्मानाची वरवर भाषा करणारे, भारताच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या प्रारंभी भाषण करून महिलांच्या समता-सन्मानाची भाषा करणारे या प्रश्नावर कानावर हात ठेवत आहे हे कशाचे निर्देश आहे ? मुस्लीम सत्यशोधक मंडळ अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढा देणाऱ्या कुस्तिगीर महिलांना पाठिंबा देत आहे.

आज अनेक घटना अशा आहेत की आम्ही पेटून उठलं पाहिजे. संविधानाचा जो अवमान होते त्या विरुद्ध प्रश्न विचारले पाहिजेत. आम्ही प्रश्न विचारत नाहीत याचा आपण काय अर्थ घ्यायचा ?

– संपादक

आदरांजली



ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ आणि अभ्यासक डॉ. इम्तियाज अहमद (दिल्ली) यांचे दीर्घ आजाराने दि. १९ जून २०२३ रोजी निधन झाले. मुस्लीम समाजातील जातिव्यवस्था आणि जमातवादी मानसिकतेतून निर्माण झालेल्या प्रश्नांवर त्यांनी विपुल लेखन केले. पुरोगामी वर्तुळात त्यांचे मोठे स्थान होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची विनम्र आदरांजली !

मुस्लीम सत्यशोधक आणि समाजप्रबोधन

● प्रा. मोईन खान

भारताला पाश्चिमात्य विचारांच्या धरतीवर आधुनिक बनविण्याचे श्रेय ब्रिटिशांना दिले जाते. भारतामध्ये आधुनिकतेची नेमकी सुरुवात कधी झाली याबाबत अभ्यासकांची विविध मते आहेत. उदाहरणार्थ, काही अभ्यासक मानतात की ही आधुनिकता १७५७ च्या प्लासीच्या युद्धानंतर भारतात आली कारण त्यानंतर पहिल्यांदाच ब्रिटिशांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात भारतात केली, तर काही जण मानतात की ही आधुनिकतेची सुरुवात १८१८ च्या तिसऱ्या आंग्ल-मराठा युद्धामध्ये मराठ्यांच्या पराभवानंतर सुरू झाली. कारण ब्रिटिशांच्या साम्राज्य निर्मितीमधील शेवटचा अडथळा असलेले मराठा राज्य यामध्ये संपुष्टात आले आणि त्यानंतर इंग्रजांनी संपूर्ण भारतामध्ये त्यांचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले.

ब्रिटिशांनी निर्माण केलेली आधुनिकता ही मुख्यतः राजकीय आणि आर्थिक घटकांच्या अनुषंगाने जास्त ठळकपणे दिसणारी आहे; पण ज्यावेळेस सामाजिकदृष्ट्या आधुनिकतेचा प्रश्न उभा राहतो त्यावेळेस ब्रिटिशांचे कार्य तुलनेने कमी दिसून येते आणि त्यातल्या त्यात हे आधुनिक समाज निर्माण करण्याचे प्रयत्न त्यांनी मुख्यतः हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी-परंपरांना कायद्याची टाळेबंदी करून करण्याचा प्रयत्न केलेले दिसून येते. उदाहरणार्थ, सती बंदीचा कायदा १८२९, विधवा पुनर्विवाह कायदा १८५६ किंवा बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२९. स्वातंत्र्यानंतरदेखील अशा पद्धतीने कायदे करून हिंदू धर्मातील समाज विसंगत गोष्टींवर बंदी आणण्यासाठी अॅट्रासिटीचा कायदा, हिंदू कोड बिल सारखे कायदे संविधानांतर्गत केलेले दिसते. इतर धर्मांमध्ये अशा पद्धतीचे सुधारणावादी आधुनिक कायदे आपल्याला फारसे झाल्याचे दिसत नाही.

आधुनिकता ही दोन पद्धतीची असते. एक म्हणजे यंत्र-तंत्र किंवा साधनांच्या स्वरूपातील आधुनिकता आणि दुसरी म्हणजे विचारांची आधुनिकता. जी व्यक्ती आधुनिक साधने वापरत असेल ती विचारानेदेखील आधुनिक असेलच असे नाही. विचारांची आधुनिकता निर्माण करण्यासाठी आधुनिक शिक्षण ही

महत्त्वाची अट आहे. भारतातील मुस्लीम समाज हा जितका सहिष्णू आहे त्यापेक्षा जास्त तो रूढी-परंपरावादी असल्याचे दिसून येते. हिंदू धर्मामध्ये भक्ती चळवळ आणि सत्यशोधक समाज अशा सुधारणावादी चळवळींमुळे सामाजिक बदलांचे वातावरण निर्माण झाले. त्या पद्धतीचे सुधारणावादी विचार मुस्लीम धर्मामध्ये सुफी संप्रदायाव्यतिरिक्त आपल्याला इतर कोणत्याही चळवळीतून मांडले गेलेले दिसत नाही. त्यातही जितका प्रभाव भक्ती चळवळीचा हिंदू समाजावर दिसतो, तितका प्रभाव सुफी संप्रदायाचा मुस्लीम समाजावर सामाजिक सुधारणेच्या अनुषंगाने दिसत नाही.

एक समाज म्हणून आपण त्याचवेळेस आधुनिक होऊ शकू, ज्यावेळेस समाजातील प्रत्येक घटक आधुनिक विचारांवर निर्माण होईल; पण हे विचार मुस्लीम धर्मातील मुल्ला-मौलवींच्या धार्मिक आणि सामाजिक वर्चस्वामुळे मुस्लीम समाजापर्यंत पोहोचले नसल्याचे दिसून येते. भारतातील मुस्लीम समाजाने जरी भारतीय समाजव्यवस्थेची वैशिष्ट्ये आत्मसात केलेली असली तरी मूळ धार्मिक विचार आणि सनातनी प्रवृत्ती हे देखील भारतीय मुस्लीम समाजाचे एक वैशिष्ट्य असलेले दिसून येते. एकूण भारतीय समाजाप्रमाणेच तो दारिद्र्याने, निरक्षरतेने, बेकारी, महागाई इत्यादी आर्थिक प्रश्नांनी ग्रासलेला आहे; पण धार्मिकतेचा पगडा, धर्मचिकित्सा विरोध आदी बाबतीत तो असंवेदनशील आहे. त्यामुळे मुस्लीम धर्मामध्ये सहजासहजी बदल करणे अत्यंत कठीण कार्य आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ

भारतीय मुस्लीम समाजाला आधुनिक बनविण्याचे कार्य करण्यासाठी २२ मार्च १९७० रोजी पुण्यात हमीद दलवाई यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळ नावाची एक चळवळ सुरू केली. मंडळाच्या आरंभी काळातच विघटनकारी रूढींना विरोध करून मुस्लीम प्रबोधन कार्य करण्याचे मंडळाने निश्चित केले. धर्मातील कालविसंगत व विघटनवादी प्रवृत्ती निर्माण करणाऱ्या अशा सर्व रूढींना विरोध केला तर मुस्लीम प्रबोधनाचे कार्य होऊन या समाजाचे हित साधले जाईल, असा विश्वास बाळगला होता. २२ मार्च १९७० रोजी पुण्यातील साधना कार्यालयाच्या आंतरभारती सभागृहात हिंदू-मुस्लीम समाजातील सुमारे ३०० नागरिक उपस्थित होते.

या चळवळीचे नाव त्यांनी केलेल्या कार्यामुळे अगदी कमी कालावधीमध्ये संपूर्ण भारतामध्ये पसरले. त्यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे

इस्लामच्या इतिहासात अशा पद्धतीची सुधारणावादी चळवळ निर्माण करण्याची ही पहिलीच वेळ होती. सनातन, परंपरागत श्रद्धा उखडून काढल्याशिवाय नव्या समाजाला पुढे जाता येणार नाही. आज विसंगत ठरलेल्या कल्पनांना धार्मिक कोंदण असल्यामुळे त्या नाहीशा करणे सोपे काम नाही. मुस्लीम समाजाच्या धार्मिक आणि ऐहिक दृष्टिकोनात मूलभूत बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने या सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने विविध कार्यक्रमांतून, आंदोलनांतून, परिषदांमधून मुस्लीम धर्मातील अनिष्ट आणि काल सुसंगत नसलेल्या रूढी-परंपराच्या विरोधात आवाज उठवला. त्यामुळे भारतीय मुस्लीम समाजाला आधुनिक विचारांशी सुसंगत करून सुधारणावादी चळवळ सुरू करण्याचे श्रेय मुस्लीम सत्यशोधक मंडळाला दिले जाते. मंडळाच्या ध्येय आणि धोरणांमधून त्यांना मुस्लीम समाजामध्ये कशा पद्धतीचा बदल करायचा होता त्याबद्दलची कल्पना येते.

स्त्रियांचे प्रश्न

कोणत्याही समाजाची प्रगती बघायची असेल तर त्या समाजामध्ये असलेल्या स्त्रियांची स्थिती बघावी. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या निर्मितीची प्रेरणा मुळात स्त्रियांच्या प्रश्नांमधून मिळालेली दिसते. दिनांक १८ एप्रिल १९६६ रोजी हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली सात मुस्लीम महिलांचा 'एक इटुकलासा मोर्चा' महाराष्ट्र विधानसभेवर धडकला. या मोर्च्यामध्ये सहभागी असलेल्या मुस्लीम महिलांची मागणी फक्त इतकीच होती की राज्यामध्ये हिंदूंना लागू असलेला द्विभार्या प्रतिबंधक कायदा (सवतबंदीचा कायदा) मुस्लिमांनाही लागू करण्यात यावा. मोर्चा जरी सात जणींचा असला तरी या सात जणींनी पूर्ण मुस्लीम समाजामध्ये धर्माच्या नावाखाली दाबल्या गेलेल्या स्त्रियांचे प्रतिनिधीत्व केलेले होते. या मोर्चाच्या स्वागतासाठी विधानसभेतील आमदार हजर होते व तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी जातीने जाऊन सहभागी स्त्रियांचा अर्ज स्वीकारून ते तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले. ही घटना मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या निर्मितीच्या अगोदरची होती.

मंडळाच्या स्थापनेनंतर जबानी तलाक, द्विभार्या पद्धत, विधवा पुनर्विवाह इत्यादी मुस्लीम महिलांच्या विविध समस्यांचे निवारण करण्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विविध पावले उचललेली दिसून येतात. डिसेंबर १९७१ मध्ये मंडळाच्या वतीने घेण्यात आलेली 'मुस्लीम महिला परिषद' इस्लाम जगताच्या

इतिहासातील पहिलीच अशा पद्धतीची परिषद होती. परिषदेमध्ये धर्माच्या नावाखाली स्त्रियांचे होत असलेले शोषण आणि समान नागरी कायदा लागू करण्याची गरज या संदर्भात चर्चा करण्यात आली. जरी परिषदेला उपस्थित महिलांची संख्या फक्त १६९ असली तरी त्याकडे एका क्रांतीच्या स्वरूपामध्ये बघणे महत्त्वाचे वाटते कारण क्रांती ही सुरुवातीला एका लहान गटामध्ये सुरू होते व त्याला व्यापक स्वरूप येत जाते. या परिषदेचा परिणाम भारतातील जातीयवादी मुस्लीम लोकांवर असा झाला की, त्यांना आता एकत्र येऊन या सुधारणावादी विचारांचा एकजुटीने सामना करणे गरजेचे वाटले व त्यांनी अखिल भारतीय पातळीवर 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ कमिटी'ची स्थापना केली. याचेच रूपांतर १९७३ मध्ये 'मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड'मध्ये झालेले दिसून येते. यावरून त्या महिला परिषदेचे महत्त्व कळून येते.

सेक्युलॅरिझम (इहवाद)

थॉमस जेफरसनने १८०२ मांडलेल्या 'वॉल ऑफ सेपरेशन'मध्ये सेक्युलॅरिझमची बिजे रोवली गेलेली आढळतात. जेफरसनने मांडलेल्या विचारांमध्ये 'चर्च आणि स्टेट' अर्थात धर्म आणि राज्य यांच्यामध्ये परस्पर हस्तक्षेप नसावा, असा विचार मांडला. काळानुरूप या सेक्युलॅरिझमचे अर्थ अभ्यासकांनी वेगवेगळ्या स्वरूपाने लावलेले दिसते; परंतु त्यासाठी लोकशाही ही 'पूर्व अट' आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे. काही जणांसाठी याचा अर्थ 'सर्वधर्म समान' असा आहे, काहींसाठी सेक्युलॅरिझम म्हणजे निधर्मी असणे तर काहींसाठी 'सर्वधर्म सन्मान' हा सेक्युलॅरिझमचा अर्थ आहे.

अर्थात सेक्युलॅरिझम ही एक व्याप्त संकल्पना आहे. भारतामध्ये सेक्युलॅरिझमला धर्मनिरपेक्ष या अर्थाने जास्त ओळखले जाते. परंतु सेक्युलॅरिझम साठी धर्मनिरपेक्षतेपेक्षा जास्त जवळ जाणारा मराठी शब्द 'इहवाद' आहे. 'इह' म्हणजे पृथ्वी. म्हणजेच ही संकल्पना पृथ्वीवरील जीवनाशी निगडित असलेली दिसते, पृथ्वीवरील सर्व मनुष्य हे एकसमान आहेत, हे या संकल्पनेचा सार आहे. म्हणजेच याचा संबंध पारलौकिक जगाशी नाही.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मान्य असलेली सेक्युलॅरिझमची संकल्पना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित आहे. मूळ संकल्पनेमध्ये राज्य आणि धर्म यांचा एकमेकांमध्ये हस्तक्षेप नसावा असा विचार मांडला गेला. परंतु बाबासाहेबांना धर्माने राज्यामध्ये हस्तक्षेप करू नये, हा विचार तर मान्य होता;

परंतु राज्याने जर धर्मामध्ये हस्तक्षेप नाही केला तर धर्मातील अनिष्ट, शोषित आणि अन्यायी रूढी-परंपरा कशा दूर होतील ? हा प्रश्न त्यांना पडल्यामुळे त्यांनी मूळ संविधानामध्ये सेक्युलॅरिझम हा मूळ शब्द न घेता त्या संकल्पनेतील मूलभूत वैशिष्ट्यांचा समावेश केला होता असे दिसते.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ हा इस्लाममधील जातीयवादी विचारांच्या विरोधात लढत असल्याने राज्याच्या पाठिंब्याशिवाय या जातीयवादी, सनातनी, परंपरागत विचारांविरुद्ध लढणे अशक्य आहे. या विचारांना दाबण्यासाठी राज्याचा आणि कायद्याचा हस्तक्षेप मंडळाला गरजेचा वाटतो.

समान नागरी कायदा

भारतीय राज्यघटनेच्या कलम ४४ मध्ये दिलेल्या राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वांमध्ये राज्य समान नागरी कायदा लागू करण्याचा प्रयत्न करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. समान नागरी कायद्याची पार्श्वभूमी ही वसाहतवादी भारतातील १८३५ मध्ये आलेल्या ब्रिटिश रिपोर्टमध्ये दिसून येते. ज्यामध्ये गुन्हा, साक्ष आणि करारासंबंधी खटल्यांमध्ये प्रत्येक धर्मातील लोकांसाठी त्यांच्या धर्माच्या अनुषंगाने असलेला कायदा बाजूला ठेवून एकसमान कायदा निर्माण करावा, अशी गरज व्यक्त करण्यात आली. संविधानामध्ये असलेला समान नागरी कायदा म्हणजे लग्न, वारसा हक्क, उत्तराधिकारी आणि दत्तक घेण्यासाठी विविध धर्मात असलेल्या जटिल कायद्यांना बाजूला ठेवून यांसाठी प्रत्येक नागरिकासाठी एकसमान कायदा. आतापर्यंत मुस्लीम सत्यशोधक मंडळाने समान नागरी कायदा, त्याची गरज आणि परिणाम मुस्लीम समाजापर्यंत पोहोचावेत यासाठी अनेक कार्यक्रम, परिषदांचे आयोजन केले आहे. समान नागरी कायद्याचे महत्त्व लोकांना कळावे यासाठी २५ मार्च १९७३ रोजी एक परिषद घेण्यात आली होती. या परिषदेमध्ये डॉ. मोईन शाकीर यांनी सांगितले की, शरियत कायद्यात बदल केला तर आपले इस्लामी व्यक्तिमत्त्व नष्ट होईल, अशी जातीयवाद्यांनी लोकांची समजूत करून दिली आहे. त्यासाठी त्यांनी ऑल इंडिया मुस्लीम मजलीस-ए-मुशावरत संघटना स्थापली. तिच्याविरुद्ध सुधारणावाद्यांना झगडावे लागत आहे. मुस्लीम स्त्रियांनादेखील इतर धर्मातील स्त्रियांप्रमाणे हक्क आणि अधिकार मिळावेत आणि त्यांचा वापरही करता यावा यासाठी मंडळाने समान नागरी कायद्याचा हट्ट धरलेला आहे. जेव्हापर्यंत मुस्लीम स्त्रियांचे समाजामधील स्थान बदलत नाही तोपर्यंत मुस्लीम समाज आधुनिक होणे अशक्य आहे. सामाजिक परिवर्तन होणे ही समाजाची गरज असते; परंतु

मुस्लीम समाज हा आतापर्यंत त्याच चौकटीमध्ये बंदिस्त राहिलेला दिसतो, जी चौकट इस्लामच्या सुरुवातीला होती. उलट त्या काळातील परिस्थितीपेक्षा जास्त बिकट आणि गुंतागुंतीची सामाजिक रचना काळानुरूप इस्लामचा भाग बनलेली दिसून येते. या चौकटीतून भारतीय मुस्लिमांना बाहेर काढण्यासाठी समान नागरी कायदा हा एक चांगला उपाय होऊ शकतो, ही भूमिका हमीद दलवाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पटल्यामुळे त्यांनी या कायद्याला अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसून येते.

लोकसंख्या नियंत्रण

कुटुंब नियोजन करून लोकसंख्या नियंत्रण करणे, हे भारतीय नागरिकांसमोरील सध्याचे सर्वात महत्त्वाचे आव्हान आहे, असे मुस्लीम सत्यशोधक मंडळ मानते. भारत हा लोकसंख्या नियंत्रणासाठी योजना आखणारा जगातील पहिला देश आहे, असे असतानाही विविध कारणांमुळे यात अनेक अडथळे येत गेले आणि स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांनंतरही ही समस्या समाधानकारक पद्धतीने सोडवणे शक्य झाले नाही. यास धार्मिक, सांस्कृतिक, प्रादेशिक वैविध्य, आर्थिक विषमता तसेच समाजाभिमुख सर्वसमावेशक धोरणाचा अभाव हे घटक कारणीभूत आहेत. भारतामध्ये असलेली संसाधने आणि भारताची लोकसंख्या यांच्यामध्ये ताळमेळ नसल्याने दारिद्र्य, बेरोजगारी, भुखमरीची समस्या अधिक तीव्र होत आहे. यावर आळा घालण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण करणे गरजेचे आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने फक्त लोकसंख्या नियंत्रणाचा प्रचारच केला नाही तर मंडळाच्या १८ कार्यकर्त्यांनी १९७२ मध्ये कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करून घेतली आणि लोकांना कुटुंब नियोजनाचे फायदे कळावेत यासाठी १९७२ नंतर दरवर्षी कुटुंब नियोजनासंदर्भात लोकजागृती करण्यासाठी मंडळाच्या वतीने शिबिरांचे आयोजन करण्यात आले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने कुटुंब नियोजनाचा विषय मुस्लीम समाजात लोकप्रिय बनवून लोकांना त्यासाठी प्रोत्साहित केले आहे.

आधुनिक शिक्षण

शिक्षण ही मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक आहे. मुस्लीम समाजाच्या मागासलेपणाचे आणि दुःखांचे मूळ हे त्यांच्या शिक्षणापासून असलेल्या अलगतेमुळे आहे. फक्त शिक्षण घेऊन फायदा नाही तर आधुनिक मूल्यांवर आधारित असलेले शिक्षण घेणे गरजेचे आहे. मुस्लीम समाजातील मुलांना आधुनिक

शिक्षणापेक्षा धार्मिक शिक्षण घेण्यावर जास्त भर दिला जातो. त्यामुळे मुस्लीम मुला-मुलींचा नोकरी मिळवण्याच्या स्पर्धेत निभाव लागत नाही आणि बेरोजगारी, गरिबी या समस्यांना त्यांना आयुष्यभर तोंड द्यावे लागते. जर त्यांना चांगल्या पद्धतीचे शिक्षण भेटले तर या सर्व समस्यांना मुळापासून संपवणे शक्य आहे, ही गोष्ट मुस्लीम सत्यशोधक मंडळाने समजून घेऊन मुस्लीम समाजामध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रसार केला आणि करत आहे.

समाजातील तरुण-तरुणींमध्ये शिक्षणाविषयी जागृती निर्माण व्हावी यासाठी वेगवेगळ्या शैक्षणिक परिषदा घेऊन त्यामार्फत प्रादेशिक भाषेतून शिक्षण, विज्ञानवादी शिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण, रोजगाराच्या संधी इत्यादी गोष्टींसंदर्भात मार्गदर्शन मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे केले जाते. मुस्लीम समाजाला सुशिक्षित बनवून अंतिमतः आधुनिक विचारांवर आधारित भारतीय समाजाची निर्मिती करणे हे या प्रयत्नांमागील ध्येय आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन

प्रत्येक धर्माप्रमाणे इस्लाममध्येदेखील अनेक अंधश्रद्धा आहेत. लोकांमध्ये बुवाबाजीचे असलेले जास्त प्रमाण आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा असलेला अभाव हे अंधश्रद्धेचे मुख्य कारण आहे. या अंधश्रद्धेचे मूळ हे अज्ञानात आहे. याचे निर्मूलन करायचे असेल तर लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे गरजेचे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी आधुनिक शिक्षण हा मुख्य उपाय आहे.

समाजामध्ये असलेल्या अंधश्रद्धेचे निर्मूलन करायचे असेल तर सगळ्यात अगोदर लोकांना हे पटवून देणे आवश्यक आहे की ती गोष्ट अंधश्रद्धा आहे. समाजामधील जास्त भाग हा अडाणी असल्यामुळे या गोष्टी समजणे कठीण आहे परंतु मुस्लीम सत्यशोधक मंडळाने जनजागृती या मार्गाने लोकशिक्षण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुस्लीम समाजाला आधुनिक बनविण्यासाठी केलेले हे सर्व कार्य उल्लेखनीय आहे. सर्व सामाजिक समस्यांच्या मुळावर आघात करून सामाजिक बदल घडविण्याची ही पद्धत मंडळाच्या 'सत्यशोधक' नावावरूनच अभिप्रेत होते. जर मुस्लीम समाज आधुनिक झाला तर याचा सगळ्यात मोठा तोटा वर्षानुवर्षे मुस्लीम समाजावर आपले वर्चस्व निर्माण केलेल्या मुल्ला-मौलवींना होईल. त्यामुळे हे लोक शांत राहून मंडळाला विरोध न

करता राहतील आणि काम करू देतील याची शक्यताच नाही. मुस्लीम सत्यशोधक मंडळाला बदनाम करण्याचे अनेक प्रयत्न या धर्माच्या ठेकेदारांनी केलेले दिसतात. मुस्लीम सत्यशोधक मंडळ कसे धर्मविरोधी आहे आणि हमीद दलवाई हे कसे धर्माचे शत्रू आहेत असे चित्र रंगविण्याचे अनेक प्रयत्न या लोकांकडून करण्यात आले. तरी या गोष्टींना दुर्लक्षित करत मुस्लीम समाज सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न मुस्लीम सत्यशोधक मंडळ न थकता करत आहे, यासाठी मंडळाचे जितके उपकार मानावे तितके कमीच आहे.

संदर्भ साधने

पुस्तके :

१. दलवाई हमीद, 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', साधना प्रकाशन, चौथी आवृत्ती, २०२२, पुणे.

२. डॉ. तांबोळी शमसुद्दीन, 'मुस्लीम समाज प्रबोधन आणि विकास', नवीन उद्योग प्रकाशन, मार्च २०१०, पुणे.

३. मुस्लीम सत्यशोधक मंडळ : उद्देश व भूमिका, २०१७.

४. मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, सुवर्ण महोत्सव विशेषांक, २०२०.

५. मुस्लीम सत्यशोधक पत्रिका विशेषांक १९७७.

लेख :

१. डॉ. तांबोळी शमसुद्दीन, 'मुस्लीम सत्यशोधक के ४५ साल इतिहास वर्तमान और भविष्य', मिळून साऱ्याजणी, मार्च २०१५.

२. डॉ. तांबोळी शमसुद्दीन, 'धर्मनिरपेक्षता आणि जमातवादी राजकारण', सत्याग्रही विचारधारा, सप्टेंबर २०१७.

वृत्तपत्र :

१. महाराष्ट्र टाईम्समध्ये २२ एप्रिल १९६६.

२. संचार, १६ जानेवारी १९७२.

३. सकाळ, २७ मार्च १९७३.

संकेतस्थळे :

१. https://weeklysadhana.in/view_article/shamsuddin-tamboli-on-first-decade-of-muslim-satyashodhak-mandal

२. https://marathi.thewire.in/the-population-myth-islam-family-planning-and-politics-cook-by-s-y-quraishi

३. https://fee.org/articles/the-wall-of-separation-between-church-and-state/
४. shorturl.at/lmpqV

(लेखक गरवारे महाविद्यालय, पुणे येथे इतिहास विषयाचे प्राध्यापक आहेत.)

■ ■

वे तारें नहीं बनते

अब तो आंगन में
यहां वहां घास उगी है
तन्हा सा नीम का पेड़ खामोश हैं
अपने आपमे खोया हुआ
गुमसुम
आखरी सांसे लेती झोपडी
और टूटी हुई पुरानी खटिया
झुर्रियोंभरी दादी और
मासूम सी, नाजुक पोती
आसमाँ का एक एक तारा
देखती हुई पोती पूछती है,
दादी अम्मा, दादी अम्मा
जो लोग खुदा के पास जातें
वे तारें बनकर सदा चमकते !
तो फिर बताओ,
अम्मा-अब्बु कहाँ दिखतें ?

दादी का झुर्रियों भरा
कांपता हुआ बुजुर्ग हाथ
आसमाँ के जानिब उठता है
बगैर कोई इशारा किए,
बगैर किसी तारे पर रुके
धड़ाम के साथ नीचे गिरता हैं
अंदर गई हुई बुझती आंखों से
पूरा आसमाँ पीती हुई
दादी भारी आवाज में बताती है,
बेटा, जो लोग दंगो में
बेमौत मरते हैं
वे तारें भी नहीं बनते
वे तारें भी नहीं बनते....

- जावेद कुरैशी
(‘लाव्हाळ’ नज़्म का मराठी से
तर्जुमा : संजय मेश्राम)

विवेकवाद व धर्म

• सलीम दस्तगीर मोमीन

मानवाची (सृजनशील) सर्जनशीलता ही त्याच्या आसपास घडणाऱ्या घटनांवरच आधारित असते. नवनवीन निरनिराळ्या कथा, शोध, जे लोकांना पटेल असे विषय त्यांचे विचार प्रेरित करून जातात. प्रत्येक व्यक्तीला चिकित्सक असण्याचा गुण जन्मतः अवगत असतोच; परंतु समाजमान्य असलेल्या मानवी मूल्यांच्या नियमावलीस आव्हान देणे हे व्यक्तीगणिक शक्य असतेच असे नाही. यात काही व्यक्तीनीं मांडलेली मते ज्या वेळी सार्वमतांनी मान्य केली जातात, त्यास विरोध होत नाही, त्यांचे अनुकरण होत जाते आणि प्रस्थापित विचारशृंखला तयार होते.

बऱ्याच व्यक्तींकडे अंगभूत वैशिष्ट्ये असतात. जसे संवाद कौशल्य, संघटन, विचार संघटन, लोकांना संघटित करणे आणि प्रेरीत करण्याचा हातखंडा असतो. अशा व्यक्ती काही नैतिकतेच्या किंवा त्यावेळेस असणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेतून समाजभान निर्माण करण्यासाठी नवनवीन क्लृप्त्या निवडतात. त्यास अनुसरून विविध दाखले दिले जातात आणि ते यशस्वीसुद्धा होते. असंच काही घडलेलं असावं धर्म ही व्यवस्था अस्तित्वात आणण्यासाठी ! नवनवीन ज्या त्या वेळेच्या परिस्थितीस सुसंगत कथा, तर्क, समाजभान किंवा सामाजिक नैतिकतेच्या मूल्यांसाठी अशा (त्या कृतिशील प्रगत ?) धर्मांची स्थापना झाली असावी. विशिष्ट लोकसमूह, प्रांत, ज्या त्या वर्गाच्या कार्यकुशलेतून धर्म, जात अशा व्यवस्था निर्माण झाल्या असाव्यात ! हासुद्धा एक तर्कच आहे कारण ज्या ज्या धर्मग्रंथाधारे धर्म स्थापले गेले आहेत, ते सामाजिक एकोप्यासाठी समाजरचनेच्या विशिष्ट वातावरणास अनुसरून किंवा त्या वेळेच्या तथ्य, तर्कनिष्ठ चालीरितींचा धर्म हा जुन्या चालीरितींचा नवा प्रारंभिक अध्यायच म्हणावा लागेल. काही शतकांपूर्वीच अस्तित्वात आलेल्या धर्मांबाबतचा हाच दाखला असेल. धर्म या शब्दाला अनुसरून विचार केल्यास याची उत्पती मानवी मूळ वंशवादावरच मांडता येईल. तसेच त्या त्या भौगोलिक, प्रांतिक, प्रचलित व्यवस्थेवर धर्मांची मांडणी करण्यात आली आहे असेच दिसून येईल. धार्मिक विकसित विवेकवाद असेच लिहावे

लागेल.

समूहप्रिय मानव जसजसा उत्क्रांत होत गेला, त्याची बौद्धिक सुधारणा होत गेली. गरजेचे रूपांतर शोधात, शोधाचे रूपांतर विज्ञानात होऊ लागले. तरी समूहाने राहणाऱ्या मानवाने नैतिकतेचे, नीतिमत्तेचे नियम एका रचनेसह (ग्रंथ) एकमेकांवर आचार विचार संहितेसह लादले असतील. अशा सूचीबद्धतेवर, धार्मिक प्रस्थापित व्यवस्थेवर लिहण्या-बोलण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले असेल. बुद्धिप्रामाण्यवादाच्या युगाची सुरुवात असेच म्हणावे लागेल.

प्रत्येक व्यक्ती आपआपल्या सोयींनुसार विवेकवादाचा पुरस्कार करीत असतेच, परंतु व्यक्त होण्याचे मार्ग वेगवेगळे असतात. अशा वेळी धार्मिक ठरविलेल्या गेलेल्या व्यक्तींकडून होणाऱ्या नवीन विचारांचे महत्त्व, लिहिलेल्या किंवा प्रचलित व्यवस्थेला आव्हान देत असतील तर त्याचे प्रायश्चित्त घ्यावे लागले असेल, असो. इथेच तर तर्कशुद्ध विवेकवादाची सुरुवात झाली असे लिहावे लागेल. मानवीशास्त्रांच्या धर्मांचा आधार फक्त ५००० ते ६००० वर्षांचाच मिळतो आणि मानवाच्या खुणा लाखो वर्षांपासून अस्तित्वात आहेत. मात्र विज्ञानाने (मानवानेच) मानवी वर्तनांचे नवनवीन शोध लावलेत. संपूर्ण पृथ्वीतलावरील कोणत्याही मानवी प्रजातींचा मानवी मेंदू अजूनही त्याच अवस्थेचा आहे. काळे, गोरे, खंड, ध्रुवीय सर्व मानवांचे विचार व तो ज्या खंडामध्ये विभागला गेला त्याच पद्धतीचे खानपान त्या वातावरणाशी मिळतेजुळते स्वभाव वैशिष्ट्ये आहेत. हेच मानवी मूलभूत प्राथमिक शोध, गरज आणि विज्ञान काळानुसार रोज नवनवीन निर्माण होणाऱ्या गरजा, तोकडी साधन संपत्ती, त्यातून होणाऱ्या स्पर्धा, मानवी स्वभावाला आनंद देणाऱ्या प्रवृत्त्या किंवा सामूहिक आनंद नियमित करण्याचे भौतिक मार्ग म्हणजे यांचे (धार्मिक) कार्यक्रम सामूहिकपणे साजरा करण्याचे प्रारंभिक स्वरूप उत्सव, सण असावेत असेच म्हणावे लागेल.

अशाच गरजांनुसार किंवा मानवी स्वभावातील वर्तनातील वर्चस्ववादांचा मानवी किंवा स्वार्थी, स्वहित, स्वसंरक्षणार्थ आणि लालसी किंवा रंजक सुखांच्या शोधापायी ज्या वर्गाने आक्रमणे केलीत त्यांची कारणे भौतिक सुख, गूढ व अनाकलनीय आध्यात्मिक नावाचं देव, धर्म, पाप, पुण्य अशा धर्मकल्पनांची अशाश्वत कारणे लोकांना आकर्षित करून राहिली असतील आणि एकसंघ राहणाऱ्या मानवाच्या टोळींचे रूप धर्मव्यवस्थेने घेतले असेल. धर्मव्यवस्था बळकट होत गेल्या असतील. ज्या व्यवस्था ज्या मानव समूहाने स्वीकारल्या असतील

त्याच धारणांवर तो इतरांवर कोणत्याही मार्गाने(साम, दाम, दंड, भेद) थोपविण्याचा प्रयास करू लागला असेल. बऱ्याच अंशी अशा गोष्टी रक्तरंजितसुद्धा झाल्या असतील. परंतु काही वेळा काही मानवी समूहाला आकर्षित करण्यासाठी द्रष्टा विवेकसुद्धा वापरला गेला असेल. आणि मानव त्या धारणा स्वीकारीत गेला हेसुद्धा नवीन मूल्यांचा सामाजिक विवेकी प्रयत्न असावा. (भविष्यातील घटनांचा तर्कशुद्ध विचार करू शकणाऱ्या व्यक्तीला द्रष्टा असे म्हणतात.)

या ठिकाणी विवेकवादसुद्धा धर्म या व्यवस्थेला धरूनच मांडावा लागला आहे. ग्रह-ताऱ्यांचा आपण जसे (५००० वर्षांपासून) सर्वधर्मीय दाखला देतो असा दाखला स्वीकारणे किंवा तथ्य शोधणे हासुद्धा त्या धर्मव्यवस्थे बरोबर केलेला विरोधच होता. परंतु अशा कितीतरी व्यक्तींना आपल्या जीवाशी जाऊन सिद्ध करावं लागले आहे. त्यांची सिद्धता सिद्ध करावी लागली. त्यासाठी होणारे सामाजिक ताण-तणावातून उद्ध्वस्त झाले आहेत. अनेक शास्त्रज्ञांचे शोध, विचार आज आपण त्यांची उपलब्धता योग्य होती त्याचे विचारशोध आजच्या विज्ञान युगात योग्य आहेत, हे आपण मान्य करीत आहोत हाच आपला सृजनशील - विवेक असे म्हणता येईल.

धर्म ही संपूर्ण मानवी व्यवस्थेची रचना आहे, हे मान्य करावयास कित्येक वर्ष मानव जातीला खर्ची घालावी लागली आहेत. आज नवनवीन अस्तित्वाला येणारे शोध, त्यांची उपलब्धता आपण जेवढ्या वेगाने स्वीकारत आहोत, विज्ञानाच्या अस्तित्वाला आव्हान देणारासुद्धा तार्किक विज्ञानांचा दाखला देत असतो. परंतु असे अतार्किक काळाच्या कसोटीवर न टिकून राहणारे असंबद्धीय विज्ञान फसवे असते. कोणत्याही शोधाला जुने अतार्किक पुरावे (धर्मरचनेच्या प्रभावासाठी किंवा धर्मव्यवस्थेला न दुखवता) मांडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे याला - पाखंडवाद म्हणावा लागेल.

या सर्व व्यवस्थेवर घाणाघाती टीकाटिपण्णी करणे, सत्य मांडण्याच्या संदर्भात लिहिलेल्या खोट्या धर्मव्यवस्थेतील कथांना आव्हान देणारे; परंतु धर्म या व्यवस्थेतूनच त्यांच्यावर टीका किंवा सुधारणा करण्याचा असामान्य प्रयत्न कित्येक व्यक्तींकडून केला गेला. यात चार्वाकांपासून कित्येक संत-महात्मे (बाबा, बुवा, मौलवी सोडून) यांच्याकडून सतत होत गेला. प्रस्थापित व्यवस्थेबरोबर राहून त्याच धर्मांची काव्यरचना करून, धर्मांतील अनिष्ट प्रथा, कालबाह्य झालेलं विज्ञान, सुधारणांचा टीकात्मक किंवा सुधारणांचा सुसंगत प्रयत्न केला गेला. हा संपूर्ण

विवेक होता,विवेकवादावार मी संत कबीरांची काही मते विचारात घेतोय. विवेकशील वर्तन धर्माशी सुसंगत असावे किंवा नसावे असे नाहीच.

संत कबीर

संत कबीरांच्या बद्दल सर्व समाजात, सर्व धर्मांतसुद्धा अतिशय आदर भाव होता, आजही सर्व समाजधारणांमधून 'कबीर मूल्ये' अभिप्रेत होत असतात. संत कबीर धार्मिक धारणांवर प्रघात करताना समाज प्रचलित देव धर्मांतील चुकांवर टीकाटिप्पणी करावयाचे; परंतु असे करताना सामाजिक मूल्ये नैतिकतेच्या कल्पना, तसेच सुधारणांसाठी काव्यें, दोहें रचीत असत. संत कबीर निर्गुणी होते म्हणजेच देव या कल्पनेच्या मूर्त स्वरूपाला त्यांचा विरोध होता. त्यांच्या विचारांमध्ये देव, धर्म, चालिरिती या तत्सम मानवी-भावना प्रकट करण्याचे मार्ग होते.

संत कबीरांनी धर्म, प्रेम यावरसुद्धा टीकाटिप्पणी मांडताना आपल्या विचारांमधून विवेकवादाचा जगन्मान्य धर्म व मानवी मूल्यांचा, नैतिकवादाचा विवेकी सिद्धांत दिला गेला आहे. प्रत्येक व्यक्तीचा विवेक तो ज्याप्रमाणे हाताळतो किंवा ज्या प्रकारामध्ये अनुभव करून देत असेल ते इतरांना विवेकशील वाटतीलच असे नाही. प्रत्येक व्यक्तीगणीक त्यांचे वर्तन, त्यांचा विवेकवाद लोक कोणत्या प्रकारामध्ये स्वीकारतील किंवा कोणता बोध घेतील व का ? हे अनुभवणे थोडे अवघडच आहे. आपल्याकडे स्वहिताला प्राधान्य देणारे (डिप्लोमेटीक व्यक्तिमत्त्व) धार्मिक, आस्तिक, नास्तिक अशा व्यवहार चातुर्य व्यक्तींना, विवेकवादी मानणे धाडसाचेच असेल. आपल्या ज्ञानाचा यथायोग्य वापर करणारी व्यक्ती विवेकी असेलच असे नाही. एकदा पूर्ण धार्मिक असणारे व्यक्तिमत्त्व जर सत्य, समाजाभिमुख, व्यवहारक्षम समाजात सुसंगत प्रमाण देऊन विवेकवाद बाळगत असेल तर तो समाजमान्य सुसंगत विवेकवाद मानावा लागेल.

आपण रुजवलेला विवेक इतरांच्यासाठी साजेसा सुसंगत असेल असे नाहीच. संत कबीर जो विवेक आपल्या वर्तनात असा काही रुजवायला सांगतात, जसा तो निसर्गरूप असेल, प्रत्येक व्यक्तीसापेक्ष एकसारखा असू शकेल असे नाहीच.

संत कबीर दोह्यांच्या मधून धर्मसापेक्ष राम-रहीम या शब्दांचा अलंकारिक उपयोग करून सर्व धर्मांतर्गत टीका, सुधारणा, अनेक प्रश्न व त्यांची चिकित्सा करणे गरजेचे असल्याचे त्यांनी लिहिले आहे. संत कबीर स्वतः निर्गुणी पंथाचे, भौतिकवादी समजतात जर त्याच्यावर अभ्यास करणारे मात्र वैष्णव आणि हरी

गुणी समजतात. हे सर्व जर संत कबीरांच्या ज्या विचारांशी साधक-विचार किंवा अर्थबोध घेत असतील तरीसुद्धा त्यांचा विवेक योग्य समजावा का हे अजूनही वादातीत आहे.

संत, समाजसुधारक गाडगेबाबा यांनी तर कधीच देवळात न जाताच 'देवकीनंदन गोपाळा' या रचनेसह धार्मिक अनिष्ठ रूढींवर हल्ला चढविला होता. असेच संत तुकाराम, संत तुकडोजी महाराज सर्व समकालीन संत-महात्मे यांचे मार्गदर्शन म्हणजेच विवेकी जागर म्हणावा लागेल. प्रबोधनात्मक विवेकी जागरच म्हणावा लागेल.

मानवी स्वभावाची वैशिष्ट्ये राग, क्लेष, घृणा, इर्षा, हेवा, मत्सर ह्या स्वभावांचा मानवी समूहसुद्धा एकमेकांच्या सोयीनुसार विवेकी असतोच ना.

सर्व अभ्यासामधून मग विवेक कसा असावा ? यासाठी कोणती तत्त्वे, अभ्यास, नियम,नियोजन करावे लागते ?

नाही, असे कोणतेही समीकरण विवेकवादाशी सुसंगत नसेलच. पुरोगामी, नास्तिक असणं म्हणजे किंवा त्यांना विवेकी मानणं काही घाईच होईल. कारण अशा व्यक्ती विवेकशील असतीलच अशा निष्कर्षाप्रती अजूनही सिद्ध झालेले नाही. काही प्रमाणात बदल असू शकतो इथंपर्यंत ठीक असू शकेल. जी व्यक्ती आपल्या ज्ञानातून, अभ्यासातून निर्णय घेते तो योग्य, शहाणपूर्वक असतो. चांगल्या-वाईटांचे ज्ञान, प्रतिकूल परिस्थितीत संयम आणि धैर्य हेही विवेक बुद्धीनेच शक्य आहे. प्रत्येक व्यक्ती जर विवेकाच्या वर्तनातून चालला तर बुद्धीने निर्णय घेण्यास यशस्वी होतोच. चुकांची शक्यता कमी करून शंका नाहीशा होतात. शहाणपण आणि ज्ञान यात विवेक असतोच असेही नाही; पण विवेकवाद जोपासता येतो हे नक्कीच. नैतिकता आणि विवेकाची सांगड घालून आपण केलेले ज्ञानार्जन, सत्कृत्य, सौहार्द यातून समज घेऊन जी मूल्ये वापरतो आणि त्याचा वापर सहजपणे होऊ लागतो. हीच विवेकी वर्तणूक !

प्रत्येक देव, धर्म हे विश्वव्यापी स्वरूपाचे कथाकथन असल्याचे करीत असतात. देव ही संकल्पना (गॉड, अल्लाह, ईश) विश्वाच्या आत आहे का बाहेर ? यदाकदाचित हा जर विश्वाच्या बाहेर असेल तर तो आपल्यात कसा सामावलेला असेल ? जर तो सर्वव्यापी असेल तर त्याची व्याप्ती हवा, पाणी, प्रकाश यामध्ये का दिसून येत नाही......?

नवीन बदलांचा, विज्ञानाचा रोजच्या धर्म आचरणातसुद्धा वापर असावा.

नवी मानवी मूल्ये योग्य पद्धतीने मांडावी लागतील. धर्मसिध्दांत व विज्ञान यांची सांगड घालावी लागेल. अमानवी प्रथा, अवैज्ञानिक अंधश्रद्धा यांच्याशी फारकत घ्यावी लागेलच.

नैतिकतेच्या किंवा प्रगत समाज व्यवस्थेसाठी लिहिलेल्या कथा काही धर्मग्रंथांमध्ये रचल्या असतील तर असेही समजू ते त्या काळातील व्यवस्थेला एका विशिष्ट -धर्म या- संकल्पनेत व्यापून केलेला तो विवेकी प्रयत्न असेच म्हणावे लागेल, असो. आजचे नवनवीन शोध जे कालबाह्य होतंय ते न टाळणे, नव्या धारणांचा चिकित्सापूर्वक अवलंब न करणे, त्याच त्या गोष्टींना कवटाळून बसणे, त्याची तथ्यहीन मिथके बनविणे, असुसंगत भूमिका मांडणे म्हणजे अंधानुकरण करणे असेच म्हणावे लागेल. तथ्यहीन असलेल्या विचारांची फारकत घ्यावी लागेल. काळानुसार बदल स्वीकारावेच लागतील. काळाच्या वैज्ञानिक दृष्टीकोन-कसोटीवर तपासून स्वीकारावीत. (धर्मांचा उगम ज्या ज्या देशांमध्ये झाला त्यामध्ये त्याच भौगोलिक परिस्थितीशी मिळता-जुळता धर्मग्रंथ लिहिला गेलेला आहे. आपण ज्या समाजरचनेतून जन्मतो, ती जात, धर्म आपसूकच आपणास मिळून जाते.)

आपण आपले विचार मांडताना विवेकी तारतम्य ठेवूनच बोलावं लिहावं लागतं. समाजाशी निगडित असणाऱ्या चुकीच्या जाती प्रथा, रितीरिवाज, पुरुषसत्ताक पद्धतीला विरोध, स्त्री-सन्मान या सर्वांना नवीन प्रवाहात आणण्याची जबाबदारी घेण्याचं काम पेरियार, हमीद दलवाई आणि नरेंद्र दाभोळकर यांनी सामाजिक ऋणानुबंध राहावेत, नवीन प्रगतशील समाज व्यवस्था निर्माण व्हावी यासाठीच विज्ञानाचे प्रमाण घेऊन नवीन समाज व्यवस्थेसाठी प्रयत्न केला. हा संपूर्ण प्रयत्न नवीन समाजभान निर्माण करणे, मानवीमूल्ये मानवतावादी म्हणून वापरावी लागतील. ज्यांना धर्मरचनेशी विसंगत राहावयाचे असेल त्यांना समाजभान राखून मानवी मूल्यांचा प्रभाव स्वीकारावा लागेल. धर्म मानणे, न मानणे किंवा नास्तिक असणे यांचा अर्थ समाजव्यवस्थेला विस्कळीत ठेवून अलगवादी असणे असा होत नाही. आपण ज्या व्यवस्थेत राहतो त्यामध्ये तुमची मते मांडावयाचे धारिष्ट्य असावेच लागेल. तुमची मते काळानुपरत्वे मांडावी लागतील. धर्माशी फारकत घेणं सोपं असतं; पण व्यवस्थेशी थोडे अवघड, कारण धर्मरहित समाज प्रस्थापित होईपर्यंत आपण आपल्या सोबत असणाऱ्यांना यातून नवीन दिशा देण्याचे काम अहेतूपूर्वक करावेच लागेल. सर्जनशीलता, बुद्धिप्रामाण्यवाद,

विवेकवाद या प्रमाणाचा धोरणात्मक वापर करावा लागेल.

ज्या ज्या वेळी विरोध करणे सहन होत नाही किंवा एखाद्याचा विरोध, मते सहजपणे स्वीकारायची आपली मानसिक तयारी नसते, तोपर्यंत कधी कधी आपणसुद्धा समाजभान विसरून चुकीचे तरी व्यक्त होत नाही ना, याचे भान असणे गरजेचे आहे. नाहीतर अशा वेळी विवेकवाद त्या काळापुरता किंवा त्या विषयापुरता भावण्याची/चुकीचा व्यक्त होण्याची शक्यता असते.

परंतु आपण आपला विवेक जेवढा सहजपणे रुजवतो तेवढ्याच पद्धतीने आपल्या चुका सुधारून घ्यावयाच्या असतील. हे विवेकवादाचे एक महत्त्वाचे बुद्धिवादीप्रामाण्य असेल.

मानवी मेंदूचा, मनोव्यापारांचा अभ्यास प्रगत शास्त्र नक्कीच करेल.

माझ्या मते हाच विवेक व विवेकवाद !

Kabir.firasta@gmail.com


(लेखक सांगली येथील मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते आहेत.)

■ ■

स्वागत नव्या पुस्तकांचे...







अंक विशेष

प्रबोधनकार हमीद दलवाई

• मुकेश बामणे

आज भारतीय प्रबोधनकार, हमीद दलवाई यांचा स्मृतिदिन आहे. हमीद दलवाईंचा स्मृतिदिन हा सामान्य व्यक्तीचा स्मृतिदिन नव्हे.

आजकाल दारुगुत्त्यात पिऊन मरणाऱ्यालाही पोकळी निर्माण झाली हे शब्द वापरतात, इतके ते गुळगुळीत झालेले आहेत; पण ज्यांना प्रबोधन म्हणजे काय हे ठाऊक आहे, त्यांना हमीद दलवाईंच्या निधनाचं मोल समजून येईल. हमीद दलवाई यांच्या निधनानं, केवळ सत्यशोधक मंडळाचीच हानी झाली नव्हती, तर भारतीय समाजाचीच फार मोठी हानी झाली होती. ती आजतागायत भरून निघालेली नाही. कारण हमीद दलवाई हा जन्माला येतानाच प्रबोधनकार म्हणून जन्माला आला होता. हमीद जन्मजात, ओरिजनल प्रबोधनकार होता. अक्करमाशी, पार्टटाईम प्रबोधनकार नव्हता.

आणि जेव्हा एखाद्या तळमळीच्या प्रबोधनकाराचं निधन होतं, तेव्हा एक वैचारिक, परिवर्तनवादी प्रकल्प बंद होतो आणि जेव्हा एखादा वैचारिक प्रकल्प बंद होतो, तेव्हा हजारो मानवी मेंदू बेरोजगार होतात. हेच बेरोजगार मेंदू मानवी मनाला जेथे आहे तेथेच थांबवतात. पुढं निपजणाऱ्या पिढ्यांची मेंदू गतीही थांबलेली असते.

दशके जातात, शतके लोटतात; पण आम्ही राजाराम मोहन रॉय यांच्या काळाजवळच थांबलेलो असतो. कारण १९८७ साली राजस्थानात रूपकुँवर सती गेलेली असते आणि तिचं मंदिर बांधलंही जातं. त्याचं समर्थन एक वैदिक समूह करतो. सतीबंदीच्या कायद्यानंतर, एकशे साठ वर्षे होऊनही, सतीचं समर्थन करताना आम्हाला शरम वाटली नव्हती. एक प्रबोधनकार देशाला वळण लावतो. हे महात्मा फुल्यांनी दाखवून दिलं होतं. आणि प्रबोधनकार जन्माला येणं म्हणजे गिरणीतलं दळण नव्हे टाकले दाणे, काढले पीठ. प्रबोधनकार किती मोलाचे असतात हे समाजाचं मानसिक वय पाहिल्यावर ध्यानात येतं. महात्मा फुल्यांनी चपखल शब्द वापरले होते, 'विद्येविना मती गेली, मतीविना गती गेली, गतिविना वित्त गेले......'

हमीद दलवाईंच्या निधनानं एक मोठा समूह डोकेबंद अवस्थेत थांबलेला आहे. समूहातील जे लोक शिकलेले आहेत, ते तर जास्त धोकादायक ठरतात. कारण ते जरी उच्चशिक्षित असले, तरी त्यांचा मेंदू सर सय्यद अहमद यांच्या युगातच रेंगाळत आहे. त्यांचं शिक्षण हे परिवर्तनासाठी नसून, खोटी प्रतिष्ठा आणि चंगळवादासाठी घेतलं गेलेलं आहे.

एखाद्या समाजात साक्षरता जास्त आहे, उच्चशिक्षित आहेत, धनाढ्य आहेत म्हणून तो समाज सांस्कृतिक आणि वैचारिक क्रांती झालेला आहे, असं समजणं सर्वथा चूक आहे. ज्या समाजाचा मेंदू मध्ययुगात घुटमळत आहे, तो समाज कितीही शिक्षित असला, धनवान असला, तरी वैचारिक दारिद्र्य असेल तर तो गतिहीन समजला जातो.

हमीद दलवाईंच्या निधनानं काय हानी झाली आहे, हे वरील विवेचनावरून ध्यानी येईल. खुद्द हमीद दलवाईंच्या सग्यासोयऱ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल काय भावना आहेत ?

र. धो. कर्वेंना मुलगा म्हणवून घ्यायला, धोंडो केशव कर्वेंना जड जात होतं. वैदिक समाजाला कोडं पडलं होतं की, श्रीधर टिळकांना लोकमान्य टिळकांचा मुलगा कसा मानावा ? कारण त्यांनी गायकवाड वाड्यात दलितांबरोबर सहभोजन आयोजित केलं होतं. तुकारामांना जाऊन चारशे वर्षे होत आली आहेत; पण त्यांच्या दहाव्या-बाराव्या पिढीला बंडखोर तुकाराम नको आहेत. ते अजूनही मंबाजीच्या पायाशी घुटमळतात. यावरून प्रबोधनकारांचा मार्ग किती खडतर असतो, हे ध्यानात येईल.

त्यामुळंच आम्ही म्हणतो की, हमीद दलवाईंचं निधन एक परिवर्तनाचा प्रकल्प ठप्प झाल्याची दुःखद घटना होती. हमीद दलवाईंचं अकाली निधन हे भारतीय समाजाची मोठी हानी करणारं ठरलं होतं. जेव्हा सगळा समाज विकासाच्या रस्त्यावून मार्गक्रमण करीत असतो, तेव्हा आख्खा देश प्रगती करतो. पण देशातील एखादा समूह मागं राहतो, तेव्हा त्या देशाच्या प्रगतीला काही अर्थ नसतो. कारण मागं राहिलेला समूह, समाजाचंच अंग असतो. एक अवयव मागं ठेवून शरीर पुढं कसं पाठवता येईल ?

दोन धर्मांतील कट्टर पंथियांना असं वाटतं की, दुसऱ्या धर्माला परिवर्तनाची गरज आहे. म्हणून त्या धर्मातील प्रबोधनकार आम्हाला वंदनीय आहेत. कारण त्या सुधारणांची झळ आमच्यापर्यंत येत नाही. म्हणून वैदिक धर्मियांना दलवाई

वंदनीय वाटतात; पण तेच कार्य करणारे डॉ. दाभोलकर निंदनीय वाटतात. नव्हे तर खून करण्याच्या लायकीचे वाटत होते.


हमीद दलवाईंनी प्रेरणा महात्मा फुल्यांपासून घेतली होती. त्यांच्यावर लोहियांचाही प्रभाव होता कारण समाजाचा प्रवाह प्रबोधनाकडं वळवणं, हे प्रबोधनकारांनाच शक्य आहे. ते सामर्थ्य महात्मा फुलेंमध्ये आणि लोहियांमध्ये होतं. भारतीय मुस्लीम समाजात दलवाई पहिले सत्यशोधक मानले जातात; परंतु दलवाईंना मुस्लीम म्हणणं मला मंजूर नाही. दलवाई मानवतेचे सत्यशोधकच होते. ते भारतीय होते. जगात एकच धर्म होता - निसर्गधर्म !

आज ज्यांना धर्म म्हटलं जातं, ते धर्म नव्हेत. तर रानटीपणातून मानवाला जीवनवळण लावणारा संस्कृती मार्ग होता. त्याचंच रूपांतर धर्मात झालं होतं. पुढं Spiritual Industry बनली. आता तर, धार्मिक स्थळांच्या स्पर्धा सुरू झाल्या आहेत. उत्पन्नांच्या चवडच्या चवड रचल्या जात आहेत. त्याच्यावर पोसल्या जाणाऱ्या ऐतखाऊंच्या टोळ्या माजल्या आहेत. अनुत्पादक मनुष्यबळाच्या गँग्स तयार झाल्या आहेत. जगातील निकृष्ट समाजाचं बेट म्हणजे भारत. अशा लौकिकाकडं आपण जाऊ नये. यासाठीच हमीद दलवाईंची धडपड होती. पण अवघ्या पंचेचाळीस वर्षांची जिंदगी लाभलेल्या हमीदनं जे केलं, ते भारताच्या हजार वर्षांच्या इतिहासात आधी कोणी केलं नव्हतं.

आज हमीद दलवाईंच्या स्मृतिदिनानिमित्त सिंहावलोकन केलं तर, मुस्लीम सत्यशोधक मंडळाची वाटचाल ही समारंभी होतेय काय ? याचं मनन करायला हवं. कारण समाज शिक्षित झाला, उच्चशिक्षित झाला, पण मेंदू सर सय्यद अहमद यांच्या काळातच रेंगाळतो काय ? याचं मनन व्हायला हवं, ही अपेक्षा आहे.

(लेखक पुणेस्थित सामाजिक कार्यकर्ते आहेत.)

■



स्वागत नव्या पुस्तकांचे...

समान नागरी विधेयकाचे स्वागत !

● डॉ. शमसुद्दीन तांबोळी

मुस्लीम समाज प्रबोधन आणि हिंदू-मुस्लीम समस्या या दोन प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी समान नागरी कायदा अस्तित्वात आला पाहिजे, ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाची आरंभापासूनची मागणी आहे. समान नागरी कायदा हा प्रामुख्याने समान नागरीहक्क, स्त्रियांना समानतेची वागणूक आणि संविधानात्मक कर्तव्याचा भाग आहेत. भारतीय समाजाला धर्मनिरपेक्ष बनवण्यासाठी आणि परस्परांतील मतभेद, गैरसमजांचे निवारण करण्यासाठी समान नागरी कायदा महत्त्वाची भूमिका करू शकतो. या विषयाकडे राजकीय आणि धार्मिक नेत्यांनी सकारात्मकपणे पाहण्याऐवजी धृवीकरण व राजकीय लाभाच्या दृष्टीने पाहिले. परिणामी या विषयाकडे अल्पसंख्याक समुदायांनी नकारात्मक दृष्टीने पाहिले. आजही हा विषय राजकीय गणित म्हणून पाहण्यात येतो म्हणूनच २०२४ ची निवडणूक समोर आली असताना हा विषय पटलावर आणला गेला आहे, हे कोणाही सजग नागरिकाच्या लक्षात येईल. अर्थात राजकीय हेतू डोळ्यांसमोर ठेवून लोकांना आकर्षित करणे हा काही नवा प्रकार नाही. जवळपास सर्वच राजकीय पक्षांचे वर्तन असेच असल्याने भाजपला यासाठी दोष देण्याचे काही कारण नाही. आम्ही मुस्लीम सत्यशोधक याकडे 'देर आए दुरुस्त आए' अशाच दृष्टीने पाहतो. अन्य राजकीय नेत्यांनी किंवा धर्मवादी नेत्यांनी या विषयाला विरोधासाठी विरोध न करता येऊ घातलेला कायदा हा सर्वसमावेशक, निकोप, निर्दोष आणि सर्वमान्य कसा होईल या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. भारताच्या अमृतमहोत्सवी वर्षात 'समान नागरी कायदा' अस्तित्वात यावा, अशी अनेक समाजवादी पुरोगामी नागरिकांची इच्छा आहे. हा कायदा राज्य, केंद्र आणि समवर्ती सूचीत असल्याने तो प्रायोगिक पातळीवर भाजप शासीत राज्यांत अस्तित्वात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. त्या दृष्टीने उत्तराखंडात जोरात हालचाली सुरू झाल्या आहेत. तथापि काही राज्यांत समान नागरी कायदा आणि काही राज्यांत समान नागरी कायदा नाही ही स्थिती बरोबर नाही. त्यातून काही नव्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्या टाळण्यासाठी संपूर्ण भारतीय भूभागासाठी एक समान नागरी कायदा

केंद्र शासनाने आणणे हेच हिताचे आहे.

जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात विधी व न्याय आयोगाने समान नागरी कायद्यासंदर्भात जनतेकडून सूचना मागवल्या आहेत. साधारणपणे जुलैच्या १४ तारखेपर्यंत अशा सूचना पाठवण्याचे आवाहन विधी व न्याय आयोगाने कळवले आहे. जनतेकडून येणाऱ्या सूचनांचे प्रतिबिंब कायद्याच्या मसुद्यात दिसून आले तर ते निश्चितच स्वीकारार्ह ठरू शकेल; परंतु सूचना मागवणे आणि औपचारिकता फक्त पूर्ण करणे हे धोरण असू नये.

हिंदुत्ववादी गटांनी समान नागरी कायद्याची मागणी करताना काही गैरसमजुतीचे गाठोडे सोबत बाळगले असल्याने त्यातून सामाजिक पातळीवर धार्मिक तणाव वाढल्याचे लक्षात येते. जसे - समान नागरी कायदा आणि लोकसंख्या वाढ यांचा काहीही संबंध नसताना, मुस्लिमांची वाढती लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी समान नागरी कायदा असायला हवा, असे प्रतिपादन करण्यात येणे. याला आधार म्हणून मुस्लीम पुरुष चार बायकांशी विवाह करतो, तसेच बालविवाहांचे प्रमाण जास्त आहे, अशी काही मांडणी होत असते. वास्तविक बहुपत्नीत्व आणि बालविवाह याचे प्रमाण मुस्लिमेतरांमध्ये अधिक असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. मुस्लिमांसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या व्यक्तिगत कायद्यात अशा तरतुदी असताना वापर करणारे कमी आहेत आणि मुस्लिमेतर काही धार्मिक समुदायांत कायद्याने बंदी असतानाही बहुपत्नित्व आणि बालविवाह होताना दिसून येतात. अलीकडे प्रकाशित झालेल्या आकडेवारीनुसार मुस्लीम समाजातील जन्मदर घटत असून लवकरच तो अन्य समुदायांच्या जन्मदरा एवढाच होणार आहे. त्यामुळे २०५० पर्यंत भारतात मुस्लीम बहुसंख्य होतील आणि भारत हा इस्लाम देश होईल, अशा बातम्या तद्दन खोट्या, निराधार आणि दिशाभूल करणाऱ्या आहेत.

मुस्लीम समुदायाचाही काही गैरसमज झाला आहे. समान नागरी कायदा म्हणजे हिंदूंचा कायदा मुस्लिमांवर लादण्यात येणार आहे, आपल्या 'निकाह' तथा विवाह समारंभात मुस्लीम रितीरिवाज पाळण्यात येणार नाही आणि इतरही काही गोष्टी डोक्यात आहेत. वास्तविक समान नागरी कायदा हा सांस्कृतिक बाबींवर कोणताशी परिणाम करणार नाही. हा केवळ कौटुंबिक कलह, भांडणे, वाद होतील तेव्हा समान अधिकार मिळवून देण्यासाठी असेल - तेही विवाह, घटस्फोट, पोटगी, मूल दत्तक घेणे, वारसा संपत्ती हक्क या विषयांपुरता मर्यादित असणार आहे. मुस्लीम

बांधवांचा असाही एक गैरसमज करून दिला आहे की आज अस्तित्वात असलेला मुस्लीम व्यक्तिगत कायदा हा शरियतवर आधारित आहे आणि शरियत ही दैवी किंवा अल्लाह निर्मित आहे. त्यामुळे ती काळ्या दगडावरची रेघ आहे, ती पुसता येणार नाही किंवा बदलता येणार नाही. वास्तविक भारतातील मुस्लीम व्यक्तिगत कायदा हा १९३७ मध्ये इंग्रजकाळात अस्तित्वात आला आहे, तसेच १९३९ मध्ये इंग्रजांनीच मुस्लीम विवाह विच्छेद कायदा अस्तित्वात आणून मुस्लीम महिलेस 'तलाक- घटस्फोट मिळवण्यासाठी न्यायालयीन तरतूद करण्यात आली. वास्तविक 'तलाक'चा अधिकार फक्त पुरुषालाच होता; परंतु १९३९च्या कायद्याने विवाहित मुस्लीम महिला न्यायालयात फिर्याद दाखल करून नवऱ्याकडून होणारा छळ, मानसिक त्रास, नपुंसकत्व, मानसिक आजार आणि इतर काही कारणे दाखवून न्यायालयाकडून 'घटस्फोट' मिळवू शकते. त्याच पद्धतीने शहाबानो प्रकरणानंतर पोटगीसंदर्भात १९८६ मध्ये जो नवा कायदा अस्तित्वात आला (मुस्लीम महिला सुरक्षा कायदा १९८६) त्या नुसार काही बदल घडवून आणले. तसेच अगदी अलीकडे २०१८ मध्ये तलाकबंदी विधेयक अस्तित्वात आणून 'तलाक-ए-बिद्दत' म्हणजेच एकतर्फी, तोंडी, एकाच वेळी तिनदा तलाकचा उच्चार करून दिलेला तलाक 'गुन्हा' ठरवण्यात आला. या बदलां व्यतिरिक्त असेही लक्षात येते की, जर 'शरियत' दैवी असेल, अपरिवर्तनीय असेल तर जगातील विविध मुस्लीम देशांतील शरियत वेगवेगळी कशी असू शकेल ? मुस्लीम देशांतील कायदे एकसारखे नाहीत. त्यात भिन्नता आणि विविधता आहे. शिया आणि सुन्नी यांची शरियत वेगळी आहेत. याचाच अर्थ शरियत ही दैवी, अपरिवर्तनीय आहे असे समजणे हीच एक मोठी अंधश्रद्धा आहे.

शरियत ही काही फक्त विवाह, घटस्फोट, मूल दत्तक घेणे, पोटगी, हलाला, वारसा हक्क अशा कौटुंबिक बाबींपुरतीच मर्यादित नसते. भारतात जर शरियत हवी असेल तर गुन्हेगारी कायदाही शरियतवर आधारित हवा, नागरी कायदे, साक्षीपुराव्याचे कायदे तसेच अन्य कायदे आपल्याकडे शरियतवर आधारित आहेत का ? तर तसे नाही.

ब्रिटिश काळात भारतात गुन्हेगारी कायदा सर्वांसाठी एक समान आला, साक्षीपुराव्याचा कायदा एक समान आला, तसेच जमीन व्यवहाराचा कायदा आला असे अनेक कायदे आज जे अस्तित्वात आहेत, ते काय शरियतवर आधारित आहेत काय ? येथे मुस्लीम समुदायाने बदललेल्या शरियत पासून भिन्न असलेले

कायदे स्वीकारले. त्यामुळे ना शरियत खतरे मे आली, ना इस्लाम खतरे में आला ! मग कौटुंबिक कायदे सर्वांसाठी एक समान, समान आधिकार देणारे आणले जात असतील तर त्याला विरोध करण्यामागचे तर्कशास्त्र कोणते ?

आज अनेक युरोपियन देशांत मुस्लीम समाज वास्तव्यास आहे, तिथे स्थानिक कायदे आहेत. ज्याला 'लॉज ऑफ द लँड' म्हणतात. अगदी मुस्लीम देशांत पूर्वीचे कायदे बदलून कालसापेक्ष कायदे आणले आहेत, अस्तित्वात आहेत. मग भारतातच शरियतवर आधारित नसलेला पण शरियत कायदा समजण्यात येत असलेल्या कायद्याचा दुराग्रह कशासाठी करण्यात येत आहे ? यामुळे समाजाचे कोणते हित साधले जात आहे ? भारतातील गोवा राज्यात पोर्तुगीजांनी तयार केलेला समान नागरी कायदा आजही अस्तित्वात आहे. हा कायदा स्थानिक मुस्लिमांनाही लागू आहे. मग समानतेवर आधारित असा समान नागरी कायदा भारतात अस्तित्वात येणार असेल तर त्याला विरोध कशासाठी ?

आज भारतात विशेष विवाह कायदा (१९५४) ऐच्छिक स्वरूपात आहे. अलीकडे या नोंदणी विवाहास प्राधान्य देणात येते. काही मुस्लीमसुद्धा आपले विवाह या कायद्यात नोंदवतात. समान नागरी कायद्यास फक्त मुस्लिमांचा विरोध आहे, हासुद्धा एक गैरसमज आहे. सरसंघचालक गोळवलकर गुरुजींनीही याचा विरोध केला होता. ख्रिश्चन समुदायांनीही केला होता. तेव्हा समान नागरी कायद्याला मुस्लीमच विरोध करतात, ही अंधश्रद्धासुद्धा पुसून टाकली पाहिजे.

अलीकडे असा एक प्रवाह आहे की, जो म्हणतो 'समान नागरी कायदा' हे आरंभी ऐच्छिक स्वरूपात ठेवावे. काही वर्षांनंतर ते अनिवार्य करावे. परंतु या म्हणण्याला काही अर्थ नाही. आपण गुन्हेगारी कायदा ऐच्छिक स्वरूपात ठेवला होता का ? तसेच १९५४ पासून आस्तित्वात असलेला Special marriage Act जो आजही ऐच्छिक आहे, तो अनिवार्य का करता आला नाही ? आजचे ऑपरेशन उद्यावर ढकलल्याने आजार बरा होतो का ? काही उपाय त्या त्या वेळी आवश्यक ती काळजी घेऊनच करणे इष्ट असते.

आज आणखी एक दृष्टिकोन समोर येतो आणि तो म्हणजे व्यक्तिगत कायद्यात असणारी विषमता दूर करणे किंवा व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करून त्यातील अन्यायी तरतुदी दूर करणे. असे केल्याने अल्पसंख्याकांना संविधानाने दिलेला सांस्कृतिक हक्क जपला जाईल, तसेच लोकशाहीला अपेक्षित असणारी विविधता जपली जाईल असा एक मुद्दा मांडण्यात येतो; परंतु आपणास

आजतागायत कल्पना आलेली आहेच की, व्यक्तिगत कायद्यात बदल करणे तेवढे सोपे नाही. कुराण, इस्लाम आणि इस्लामिक देशात अस्तित्वात नसलेला, परंतु मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात समावेश असलेला त्रिवार तलाक 'तलाक-ए-बिद्दत' रद्द करताना किती विरोध झाला ? हे असे असेल तर व्यक्तिगत कायद्यात सुधारणा, त्यावरील वाद-प्रतिवाद, धृविकरण करण्यापेक्षा भारतातील सर्वधर्म समुदायांसाठी 'समान नागरी कायदा' अस्तित्वात का असू नये ?

समान नागरी कायदा हा ऐहिक जीवनाचे कौटुंबिक व्यवहाराचे नियमन करण्यासाठी आणि अस्तित्वात असणाऱ्या व्यक्तिगत कायद्यात वेळोवेळी विषमतावादी अन्यायी तरतुदी रद्द करण्यासाठी आहे. जवळपास सर्वच धर्मांच्या ग्रंथांत आणि कायद्यात विषमताजन्य तरतुदी होत्या. विशेषत: पुरुषप्रधान मानसिकतेतून हे पारंपरिक कायदे अस्तित्वात होते. तथापि भारतातील अशा व्यक्तिगत कायद्यात वेळोवेळी सुधारणा करणे हे संविधानिक समतावादी मूल्यांशी अनुकूल करण्यात आले. याला अपवाद हा मुस्लीम व्यक्तिगत कायदा आहे. आज सर्वाधिक बदलाची गरज याच कायद्याला आहे. याचा अर्थ इतर धर्मांच्या व्यक्तिगत कायद्यात आजमितीला बदल करावा लागणार नाही असे नाही. उदा., आजच्या हिंदू कोड मध्ये म्हणजेच हिंदूंना लागू असणाऱ्या कायद्यात 'हिंदू अविभक्त कुटुंब' ही संकल्पना आहे. ही स्वतंत्र करपात्र वैध अस्तित्व (लीगल एन्टीटी) समजली जाते, ज्याचा फायदा फक्त हिंदूंना होतो. हिंदू अविभक्त कुटुंबास करपात्र उत्पन्नातून काही खास वजावटीची सवलत मिळते; परंतु समान नागरी कायदा अस्तित्वात आल्यास हिंदूंना ही सवलत मिळणार नाही. हा तोटा त्यांनी सहन करायला पाहिजे. त्यासाठी हिंदू समुदाय समान नागरी कायद्यास विरोध करणार नाहीत हे कशावरून ?

इस्लामच्या न्यायशास्त्रात कायदे कालसापेक्ष करण्याबाबत लवचिकता दाखवली आहेच. इज्मा (इस्तेहाद) आणि कियास या तरतुदींचा वापर करून तज्ज्ञ, अनुभवी, अभ्यासकांच्या सल्ल्याने तसेच विवेक-तर्कशुद्ध पद्धतीने अस्तित्वात असलेल्या कायद्यात सुधारणा करण्यास इस्लाम खुद्द परवानगी देते. अशा वेळी बदल करणारे, सुधारणा करणारे हे मुस्लीम नाहीत, येथे मुस्लीम राज्य नाही अशी बतावणी करणे हे दांभिकपणाचे लक्षण ठरणार आहे. 'इबादत' म्हणजे श्रद्धा आणि प्रार्थनेच्या बाबी तर 'आदत' म्हणजे दैनंदिन व्यवहार ! जे कालसापेक्ष करण्यास धर्मतत्त्व विरोध करीत नाही. उलट तशी अपेक्षाच करते. येथे श्रद्धा

आणि अंधश्रद्धा समजून घेतली पाहिजे. दैनंदिन जीवनात अनुकूल बदल करण्यास धर्मा आधार घेणे ही अंधश्रद्धा आहे !

मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड आणि तथाकथित धर्मवादी संघटनांचे असे म्हणणे आहे की, संविधानाने दिलेल्या धर्मस्वातंत्र्य आणि अल्पसंख्याकाच्या अधिकाराप्रमाणे समान नागरी संहिता लादता येणार नाही. वास्तविक समान नागरी कायदा हा संस्कृती, परंपरा, धर्म यांच्या विरुद्ध नाही. तो कौटुंबिक कलह सोडवण्याचा, अन्याय निवारणाचा, समता प्रस्थापित करण्याचा कायदा आहे. धर्मस्वातंत्र्याचे पालन करताना संविधानाच्या मूलभूत हक्कांचे हनन होणार नाही ही अपेक्षा आहे. धर्मस्वातंत्र्याचा व्यक्तिगत कायदे हा भाग नाही. म्हणून भारतीय संविधानाच्या भाग तीनमध्ये उद्धृत केलेले मूलभूत अधिकार कलम ३७ मध्ये सांगितल्याप्रमाणे समान नागरी कायद्यासाठी प्रयत्न करणे, कलम ४४ अस्तित्वात आणणे आणि कलम ५१ प्रमाणे नागरिकांनी अशा सुधारणांस अनुकूल प्रतिसाद देणे हे नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे. आपण भारतीय नागरिक म्हणून त्याचा सन्मान, स्वीकार आणि स्वागत केले पाहिजे.

■ ■

विचामंथन

परंपरा आणि आधुनिकता यात सापडलेल्या मुस्लीम महिला

• असगर अली इंजिनिअर • अनु. - डॉ. बेनझीर तांबोळी

अलीकडेच सौदी अरेबियातील टी. व्ही.वर एका काव्यवाचनादरम्यान मुस्लीम कवयित्री हिसास हिलालने तिच्या देशातील महिलांसाठी असलेल्या जाचक बंधनांच्या आणि नियंत्रणाच्या विरोधात आवाज उठवला. तो कवितेच्या माध्यमातून व्यक्त केलेला अतिशय निर्भीड असा निषेधाचा स्वर होता. कडव्या शिस्तीची चौकट लादणाऱ्या तिच्या समाजात कदाचित याची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. तिने बुरख्याखाली झाकलेल्या चेहऱ्यानेच इस्लामिक प्रचारक आणि धर्मोपदेशकांबद्दल सांगितले की जे सत्तेच्या पदावर बसतात, ते फतवे काढून लोकांना भयभीत करतात आणि शांततेच्या शोधात असणाऱ्या सामान्य लोकांची लांडग्यासारखी शिकार करतात.

महत्त्वाचे म्हणजे तिला प्रेक्षकांकडून जोरदार आणि जल्लोषपूर्ण प्रतिसाद मिळाला आणि तिने स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान पटकावले. याचबरोबर तिला अनेक दहशतवादी स्वरूपाच्या वेबसाईटवरून जीवे मारण्याच्या धमक्याही मिळाल्या. 'सलाफी' या कट्टरपंथीय उलेमांच्या नियंत्रणाखाली असलेली सौदी राजवट धार्मिक बाबतीत इस्लामिक परंपरांच्या नावाखाली महिलांवर कडक नियंत्रण ठेवण्यावर ठाम आहे. स्त्रियांना त्यांच्या विवेकबुद्धीनुसार निवडीचे व जगण्याचे स्वातंत्र्य आणि त्यांचे न्याय्य हक्क नाकारले जातात. सर्व इस्लामिक देशांमध्ये ही स्थिती असेलच असे नाही; परंतु पारंपरिक मुस्लीम समाजात स्त्रियांवर अनेक निर्बंध लादले जातात आणि त्यांना कोणतीही सूट देण्यास समाज सहसा तयार होत नाही. अनेक मुस्लीम महिला ज्या पद्धतीचे हिजाब घालतात आणि आपले चेहरे झाकून जगाकडे फक्त दोन डोळ्यांच्या संकुचित फटीतून पाहतात, तो प्रश्न मुस्लीम विद्वान, आधुनिक बुद्धिजीवी आणि धर्मपंडित यांच्यामधील वादग्रस्त मुद्दा आहे. प्रश्न आहे तो या समस्येचे काय करायचे याचा.

जागतिकीकरणाच्या प्रचंड प्रभावाखाली असलेल्या जगात जलदगतीने होणारा बदल कोणीही नाकारू शकत नाही आणि पारंपरिक समाजात आढळणारे स्त्रियांवरील सध्याचे नियंत्रण टिकवून ठेवणे हे दिवसेंदिवस आव्हानात्मक होत

आहे. १९ व्या शतकापासून जेव्हा आधुनिकता अधिक प्रकर्षाने पुढे येऊ लागली तेव्हापासून हा वाद सुरू आहे.

कित्येक मुस्लीम देशांमध्ये अनेक सुधारणा झाल्या आहेत आणि स्त्रियांना काही प्रमाणात स्वातंत्र्य अनुभवता येत आहे. तथापि, विसाव्या शतकाच्या शेवटचा काही काळ आणि एकविसाव्या प्रगतिशील शतकाच्या प्रारंभी पारंपरिक इस्लामचा, विशेषतः सलाफी पंथीय इस्लामचा पुन्हा उदय झाला. कोणताही समाज एका सरळ पद्धतीने कधीच प्रगत होत नाही. त्यासाठी केले जाणारे उपाय हे त्या बदल्यात कधीकधी अधिकच आव्हानात्मक ठरतात. या घडीला ज्या कारणांचा इथे उहापोह करण्याची गरज वाटत नाही ती कारणे फक्त सामाजिक आणि सांस्कृतिक नसून आर्थिक आणि राजकीयसुद्धा आहेत.

परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील तणावाचे जटिल स्वरूप हे आव्हान आणि संधी दोन्हीही आहे. या वादविवादात ज्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते, त्यामध्ये महत्त्वाची गोष्ट म्हणजे इस्लामच्या नावाखाली आपण जे आचरण करतो ते धार्मिक किंवा पवित्र ग्रंथावर आधारित असण्यापेक्षा अधिकतर सांस्कृतिक स्वरूपाचे असते. महिलांवर घातल्या जाणाऱ्या किंवा अस्तित्वात असणाऱ्या निर्बंधांचे समर्थन किंवा विरोध करताना आपण मोठ्या प्रमाणात पारंपरिक बाबींवर अवलंबून राहतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे या विषयावर पाकिस्तानातून अलीकडेच प्रकाशित झालेले प्रा. खुर्शीद आलम यांनी संकलित केलेले 'चेहरे का परदा वाजिब या गैर वाजिब' (चेहऱ्यावरील बुरखा - योग्य की अयोग्य) हे पुस्तक. एक बुरख्याचे समर्थन करणारा आणि एक बुरखा पद्धतीचे खंडन करणारा अशा दोन पराकोटीच्या विद्वानांमधील ही एक अतिशय विद्वत्तापूर्ण चर्चा किंवा वादविवाद म्हणता येईल. तथापि, हे पुस्तक संपूर्णपणे ज्याचा उल्लेख कित्येक मध्ययुगीन विद्वानांनी केला आहे अशा प्रेषित (PBUH) आणि त्यांच्या साथीदारांच्या परस्परविसंगत परंपरांवर अवलंबून आहे.

बुरख्याचा आग्रह धरणाऱ्या किंवा बुरखा गरजेचा नाही असा विचार करणाऱ्या दोन्ही प्रकारच्या परंपरा (हदीस) आपल्याला आढळतात आणि दोन्ही बाजूचे विद्वान आपला दावा मजबूत करण्यासाठी या परंपरांचा वापर करताना दिसून येतात.

हा दृष्टिकोन केवळ पारंपरिक सांस्कृतिक इस्लामला बळकटी देतो. आपल्याला ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. बहुतेक परंपरा नैतिक किंवा इबादतशी संबंधित (श्रद्धेच्या बाबी वगळता) एकीकडे अरब संस्कृती आणि

दुसरीकडे मध्ययुगीन पश्चिम आशियाई किंवा मध्य आशियाई संस्कृतीचे प्रतिबिंब आहेत. अनेक कायदेतज्ज्ञदेखील असे म्हणतात की, रितीरिवाज आणि परंपरा (Arabiadat) हे शरीया कायद्याचा भाग बनू शकतात आणि अनेक शरीया कायद्यांमध्ये रितीरिवाज आणि परंपरा (Arabiadat) समाविष्ट आहेत.

असगर अली इंजिनीअर ज्या पुस्तकाचा संदर्भ देत आहे, त्यात कुराणातील प्रत्यक्ष संदर्भ किंवा कुराणातील संबंधित आयतांवर कालानुरूप नवीन चिंतन फारच कमी आहे. मुस्लीम कायदेतज्ज्ञ आणि विद्वानांनी हे समजून घेणे आवशयक आहे की, रितीरिवाज आणि परंपरा (Arabiadat) दूरदूरपर्यंत दैवी असू शकत नाहीत आणि शरीया कायद्याच्या मूलभूत रचनेमध्ये त्यांचा समावेश होऊ शकत नाही.

महिलांशी संबंधित असलेल्या कुराणातील वचनांचे नवीन समजूतीप्रमाणे सखोल मनन करून आपण हा सांस्कृतिक आधार बदलला पाहिजे. यामुळे महिलांना प्रतिष्ठाही मिळेल आणि निवडीचे स्वातंत्र्य मिळेल. विवेकाचे स्वातंत्र्य आणि व्यक्तिप्रतिष्ठा ही एक कुराणची महत्त्वाची शिकवण आहे. पारंपरिक मध्ययुगीन सांस्कृतिक पद्धतींपेक्षा कुराण मानवी सन्मान आणि स्वातंत्र्य यांचा नेहमीच ठोस पुरस्कार करते.

हा दृष्टिकोन कोणत्याही प्रकारे शरीयाच्या तथाकथित दैवी स्वरूपाला इजा पोहोचवणार नाही. त्याचबरोबर कुराणच्या दैवी गाभ्याऐवजी अरब संस्कृतीतील पितृसत्ताक मूल्यांचा समावेश असलेल्या शरीयाची त्याच्याच पारंपरिक सांस्कृतिक स्वरूपातून मुक्तता होईल. यामुळे मुस्लीम महिलांना मुक्ती मिळेल आणि परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील तणाव कमी करून त्यांना सन्मान आणि स्वातंत्र्य देता देईल. आपण ही संधी अजिबात गमावता कामा नये. ती संधी गमावणे म्हणजे महिलांसाठी अधिकाधिक क्लेशकारक आणि दुविधाजनक ठरेल. बहुतेक मुस्लीम महिलांना त्यांच्या धर्माचे, धार्मिक बाबींचे पालन करायचे असते आणि आधुनिकतेचे काही फायदेदेखील उपभोगायचे असतात. मुस्लीम विद्वान आणि जाणकारांनी महिलांची ही दुविधात्मक व्यथा संपवली पाहिजे.

(असगर अली इंजिनीअर यांच्या २०१३ मध्ये प्रकाशित झालेल्या 'Jihad and Other Essays' या पुस्तकातील 'Muslim women between tradition and modernity' या लेखाचा मुक्त अनुवाद)

(अनुवादक मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्या आणि सत्यशोधक फातिमाबी शेख मुस्लीम महिला मंचच्या प्रमुख आहेत.)

■ ■

विचारमंथन

मुस्लीम लोकसंख्या हिंदूंपेक्षा जास्त होईल काय ?

● जगदीश काबरे

केवळ भारतातच नव्हे तर जगभरात मुसलमान समाज प्रगतीपासून वंचित राहण्यामागचे कारण म्हणजे त्या धर्मातील सुधारणांचा अभाव. धर्म कोणताही असो, त्यातील सुधारणांचा रेटा हा सामान्य धर्मपालकांकडून येणे आवश्यक असते. त्यासाठी धर्मगुरूंकडून प्रयत्न होतातच असे नाही; परंतु परंपरेचे कालबाह्य बोचके डोक्यावर घेऊन जगणाऱ्या मुसलमान समाजास धर्मातील सुधारणांची उसंत कधीच मिळाली नाही. तरीही ज्यांनी आहे त्या अवकाशात तसा प्रयत्न केला त्यांचे काय झाले ते दिवंगत हमीद दलवाई या उदाहरणावरून समजून घेता येईल.

या संदर्भात आवर्जून लक्षात घ्यावी अशी आणखी एक बाब म्हणजे सर्वच धर्मांतील मागासतेचा जाच हा सर्वाधिक नेहमी महिलांनाच सहन करावा लागतो. मुसलमान महिलाही यास अपवाद नाहीत. आधीच मुळात आपल्यासारख्या सरंजामशाही नसानसात मुरलेल्या देशात तसेही महिलांना हक्कांसाठी झगडावेच लागते. त्यातही मुसलमान महिलांची अवस्था तर त्याहून बिकट. महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अल्प असल्यामुळे मुलांना जन्म देणे ही अल्लाची मर्जी असते, असं त्या समजतात आणि बरेचदा कुटुंबनियोजन करण्याचे टाळतात; पण हल्ली मुसलमानांतही शिक्षणाचे प्रमाण हळूहळू वाढू लागलेले आहे. त्यामुळे शिक्षित मुसलमान कुटुंबनियोजन करू लागलेले आहेत. परिणामी १९९२च्या तुलनेत २०१५ मध्ये लोकसंख्या वाढीचा वेग मुस्लिमांत कमी आहे आणि सगळ्यात जास्त शिखांचा आहे. यावरून सगळा देश इस्लामिक होऊ घातलेला आहे, हिंदू धर्म खतरे में आहे, या हाकाट्या किती भंपक आहेत आणि या पिपाण्या कश्या पिचक्या आहेत, हेच यावरून सिद्ध होत नाही काय ? तरीही भविष्यकाळात मुस्लिमांची लोकसंख्या हिंदूंपेक्षा अधिक होऊ शकेल, असा भयगंड भागवत आपल्या प्रचारकी भाषणातून निर्माण करत असतात; पण हा प्रचार व ही भूमिका सर्वस्वी खोटी आणि एकांगी आहे.

भागवतांच्या कथित आक्षेपाची समीक्षा केली असता, जे सत्य नजरेसमोर येते, ते पुढीलप्रमाणे -

१. फाळणीपूर्वी १९४१ साली जनगणनेनुसार भारतात एकूण लोकसंख्येपैकी हिंदूंचे प्रमाण ६९.५% होते, तर मुसलमानांचे प्रमाण २४.३% होते.

२. फाळणीनंतर १९५२ मध्ये हिंदूंचे प्रमाण ८५%, तर मुसलमानांचे ९.९% झाले.

३. १९८१ साली (म्हणजे ३० वर्षांच्या अवधीत) हिंदूंचे प्रमाण ८२.६% झाले, तर मुसलमानांचे प्रमाण ९.९ टक्क्यांवरून ११.४ टक्क्यांवर गेले. म्हणजे ते दीड टक्क्याने वाढले.

मुसलमानांचे हे प्रमाण वाढले त्याची कारणे कोणती होती ? मुसलमानांच्यातील बहुपत्नीकत्व हे त्याचे कारण आहे, या समजुतीला काही आधार आहे काय ?

मुसलमानांमधील १९५१ ते १९६१ या दशकातील एकूण विवाहांपैकी ४.३१ टक्के लग्नांत एकाहून अधिक बायका होत्या, तर हिंदूंमधील लग्नांपैकी ५.०६ टक्के लग्नांत एकाहून अधिक बायका होत्या. याच दशकात आदिवासींच्या लग्नांपैकी १७.९८ टक्के लग्नांत, तर बौद्धांपैकी ८.१३ टक्के लग्नांत एकाहून अधिक बायका होत्या. 'रिपोर्ट ऑफ द कमिटी ऑन द स्टेटस् ऑफ विमेन इन इंडिया', प्रकाशक भारत सरकार, १९७५ या अहवालात नोंदवण्यात आलेल्या वरील माहितीवरून असे आढळते की, मुसलमानांपेक्षा हिंदूंमध्येच १९४१ ते १९५१ आणि १९५१ ते १९६१ या दोन्ही दशकांत बहुपत्नीकत्वाचे प्रमाण अधिक आहे. म्हणून बहुपत्नीकत्वाचे प्रमाण मुसलमानांच्यात अधिक आहे, या समजुतीला काही आधार नाही. हा फक्त हिंदुत्ववाद्यांनी सामान्य हिंदू लोकांना घाबरवण्यासाठी केलेला कावा आहे.

म्हणून आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, लोकसंख्या नियंत्रणाचा आणि एखाद्या धर्माचादेखील काही संबंध नाही. मुस्लीम समाज हा मुद्दाम जास्त अपत्यांना जन्म देऊन आपल्या समाजाची लोकसंख्या वाढवत आहे, इस्लाम कुटुंबनियोजनाच्या विरुद्ध आहे, हा गैरसमज आहे. उलट मुस्लीम धर्माच्या लोकांनीही कुटुंबनियोजनाच्या साधनांचा वापर करून आपल्या समाजातील जन्मदर पूर्वीच्या तुलनेत कमी केला आहे. या सर्व गोष्टी भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांनी आपल्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'द पॉप्युलेशन मिथ-इस्लाम, फॅमिली प्लॅनिंग अँड पॉलिटिक्स इन इंडिया' या पुस्तकात आकडेवारीसह नमूद केल्या आहेत. केरळच्या मुस्लीम धर्मीयांच्या लोकांचा जन्मदर

हा बिहारच्या हिंदूंपेक्षा कमी आहे. गरीब, अज्ञानी आणि अशिक्षित लोक प्रत्येक धर्मात आहेत. या घटकांमुळे लोकसंख्या नियंत्रणाला खीळ बसते. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांमध्ये लोकसंख्या नियंत्रणाची आणि मुलांच्या सकस वाढीची माहिती पोहोचवली पाहिजे.

यावरून असे स्पष्ट दिसते की हिंदू जन्मदर, मुस्लीम जन्मदर किंवा ख्रिश्चन जन्मदर असा धर्माधिष्ठीत जन्मदर ठरवणे आणि त्याचे सार्वत्रिकरण करणे निराधार ठरू शकते. असे असतानाही मुस्लीम समाजातील कुटुंबनियोजन हा वारंवार वादाचा, चिंतेचा आणि चिंतनाचा विषय केला जातो. मुस्लीम समाजाला लोकसंख्या वाढीस कारण ठरवून बळीचा बकरा करण्यात येतो. शास्त्रशुद्ध विश्लेषण आणि माहितीच्या अभावामुळे घातले जाणारे वाद विपर्यास्त आणि प्रतिमेचे विद्रुपीकरण करणारे असतात.

२००५-०६ च्या राष्ट्रीय कुटुंब आणि आरोग्य पाहणी (एनएफएचएस) नुसार सर्व समुह गटात आधुनिक साधनांचा वापर करून कुटुंबनियोजन करणाऱ्यांचे प्रमाण सातत्याने वाढले आहे. तसेच हिंदूंच्या तुलनेत मुस्लिमांचे कुटुंबनियोजनाचे प्रमाण जास्त आहे. तथापि दोन्ही समुदायात २०१५-१६मध्ये कुटुंबनियोजनाचे प्रमाण घटले. मुस्लिमांच्या तुलनेत हिंदूंचे कुटुंबनियोजन जास्त घटले. हेच चित्र मागील पाच दशकांच्या आकडेवारीत दिसून येते. उत्तर प्रदेश आणि बिहारमधील हिंदूंच्या कुटुंबनियोजनाच्या प्रमाणापेक्षा देशातील २२ राज्यांतील मुस्लिमांचे कुटुंबनियोजनाचे प्रमाण जास्त असल्याची माहिती आकडेवारीतून पुढे येते. बिहार आणि मणिपूरमधील हिंदू-मुस्लिमांची सामाजिक, आर्थिक स्थिती सारखीच असल्याने या दोन्ही समुदायातील कुटुंबनियोजनाचे प्रमाण सारखेच आहे. यावरून पुन्हा हे अधोरेखित होते की, धर्मापेक्षा सामाजिक-आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती कुटुंबनियोजनाचे प्रमाण ठरवण्यात जास्त कारणीभूत आहेत.

(लेखक सांगलीस्थित पुरोगामी लेखक आणि कार्यकर्ते आहेत.)

Email : jetjagdish@gmail.com

■ ■

हिंदूंनाही हमीद दलवाईंची गरज का आहे ?

• डॉ. शमसुद्दीन तांबोळी

मुस्लीम समाज प्रबोधक हमीद दलवाई यांचे ३ मे, १९७७ रोजी वयाची पंचेचाळीसी गाठण्यापूर्वीच निधन झाले. या प्रसंगी तत्कालीन परराष्ट्रमंत्री मा. अटलबिहारी वाजपेयी आपल्या शोक संदेशात म्हणाले होते, 'Hindus too Needed Hamid Dalwai.' आजमितीस या विधानाचे महत्त्व अधिक तीव्रतेने अधोरेखित होताना जाणवते. हिंदूंनाही दलवाई विचारांची गरज आहे, असे मा. वाजपेयी यांना का वाटले ? हे दलवाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त समजून घेतले पाहिजे. दलवाई म्हणतात, 'हा देश समर्थ व्हावा, जगातील शक्तिमान राष्ट्रांच्या पंक्तीला बसावा असे आपणास वाटत असेल तर या देशातील समाज हा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनावर आधारलेला, भौतिक श्रद्धा बाळगणारा आणि चैतन्यशील बनला पाहिजे यावर कुणाचे दुमत होईल असे वाटत नाही. याकरता ज्या धर्मश्रद्धा समाज आधुनिक आणि प्रगतिकारक बनविण्याच्या आड येतात त्या दूर सारण्याची प्रक्रिया पुढे चालवणे म्हणजेच आपण धर्मनिरपेक्षतेकडे वाटचाल करणे आहे.'

भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलन काळातच उदारमतवादी, आधुनिकतावादी विचारांना चालना मिळाली. स्वतंत्र भारताला आधुनिक चेहरा देणारी राज्यघटना निर्माण करण्यात आली. तसेच देशाला आधुनिकतावादी राजकीय नेतृत्वही लाभले. धर्मनिरपेक्ष एकात्म समाज निर्माण करण्याच्या प्रयत्नात मुस्लीम जमातवादी मानसिकता, मुस्लीम समाज प्रबोधनाचा अभाव आडकाठी ठरू नये, भारतीय समाजप्रबोधनाची चळवळ प्रबळ करण्यासाठी मुस्लिमांचे प्रबोधन झाले पाहिजे हा विचार दलवाईंच्या केंद्रस्थानी होता.

'मी सर्वप्रथम माणूस आहे, त्यानंतर भारतीय आहे आणि शेवटी मी मुसलमान आहे.' अशी ठाम भूमिका घेणाऱ्या समाजसुधारक दलवाई यांचा समावेश डॉ. रामचंद्र गुहा यांनी त्यांच्या 'मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया' या ग्रंथात केला आहे. 'शेवटचे आधुनिकतावादी' असे एक स्वतंत्र प्रकरण त्यांनी दलवाई यांच्यावर लिहिले आहे. ते म्हणतात, '१५ वर्षांपूर्वी (आता २५ वर्षांपूर्वी) मुंबईच्या एका फुटपाथवर 'मुस्लीम पॉलिटिक्स इन इंडिया' हे दलवाई यांचे जुने पुस्तक २० रुपयांत

मिळाले आणि त्यानंतर अर्धा डझनवेळा मी ते वाचले आहे. दलवाई यांची आधुनिकता लढाऊ आणि तडजोड न करणारी होती. हमीदनी सुरुवातीला आपले क्रांतिकारी विचार बेधडक मांडण्यास सुरुवात केली व लोकांचे लक्ष वेधून घेतले.'

साहित्यिक आणि पत्रकार म्हणून प्रतिमा तयार होत असतानाच त्यांचा संपर्क भारतातील बुद्धिजीवी वर्गाशी आला. भारतीय समाज प्रबोधन हा त्यांच्या आकर्षणाचा विषय ठरला. बहुतेक समाजप्रबोधकांनी त्यांच्या कार्याचा आरंभ महिला समस्याकेंद्री आणि महिलामुक्ती विचारांतून केल्याचे दलवाईंच्या लक्षात आले. राजा राममोहन राय यांच्या संघर्षातून बंद झालेली सतीची परंपरा आणि महात्मा फुल्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने दलवाईंना मुस्लीम महिलांच्या समस्यांकडे अंतर्मुख होऊन पाहण्याची प्रेरणा दिली. परिणामी १८ एप्रिल, १९६६ रोजी हमीद दलवाई यांनी सात मुस्लीम महिलांचा मोर्चा विधानसभेवर काढला. इस्लामिक जगतातील हा एक ऐतिहासिक मोर्चा ठरला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर राज्यघटना अस्तित्वात आली. ही राज्यघटना म्हणजे प्राचीन भारताचे आधुनिक राष्ट्रात रूपांतर करण्यासाठी दीपस्तंभ आहे. संविधानात्मक मूल्ये आणि आधुनिकतावादी विचारांचा प्रभाव भारतीय समाजात वाढवणाऱ्या व्यक्ती आणि चळवळी हिंदू समाजात आहेत. मात्र काही निवडक उदारमतवादी मुस्लीम विचारवंत सोडले तर मुस्लीम समाजात अशा चळवळीचा अभाव आहे हे निरीक्षण दलवाईंना अस्वस्थ करणारे होते. या काळात दलवाईंची मैत्री काही सेक्युलर आणि बुद्धिप्रामाण्य विचारवंतांशी झाली आणि १९६८ मध्ये प्रा. अ. भि. शहा आणि दलवाई यांच्या पुढाकाराने इंडियन सेक्युलर सोसायटीची उभारणी झाली आणि आधुनिकतावादी विचारांचा प्रभाव वाढवण्यासाठी ध्येयवादी वादळ निर्माण झाले. जात आणि धर्म यांचा प्रभाव, यातून निर्माण झालेली विषमतावादी परंपरा, पोथीनिष्ठ संकुचित वर्तन आणि विविध प्रकारच्या अंधश्रद्धांवर हल्ले करीत असताना दलवाई यांच्या लक्षात आले की, हे प्रश्न मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहेत. तसेच देशाच्या फाळणीच्या निमित्ताने उभे राहिलेल्या धर्मवादी राजकारणाचाही समाजावर मोठा प्रभाव आहे. धर्मनिरपेक्ष एकात्म समाजाच्या उभारणीत सर्वधर्म समुदायात प्रेरणा निर्माण झाल्या पाहिजे. मात्र मुस्लीम समाजात तसे फारसे प्रयत्न होत नाहीत. हिंदू-मुस्लीम समाजात सामाजिक प्रबोधनाची दरी निर्माण झाल्यास अनेक अनर्थ घडतील. मुस्लीम समाज प्रबोधनाच्या प्रवाहापासून पतीत होईल, तो या देशाचा सन्माननीय घटक होऊ

शकणार नाही. मुस्लीम या देशावरील ओझे आहेत अशी त्यांची ओळख निर्माण होईल. आधुनिक राष्ट्राच्या उभारणीत मुस्लीम समाज योगदान देण्यास असमर्थ ठरेल. मुस्लीम समाजाला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मुस्लीम समाज प्रबोधनाला वाहून घेणाऱ्या चळवळीची आवश्यकता आहे. या विचारांतून दलवाई यांनी २२ मार्च, १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली.

मुस्लीम जमातवादी राजकारणाची चिकित्सा करून समाजात धर्मनिरपेक्षता रुजावी, मुस्लीम व्यक्तिगत कायद्यामुळे मुस्लीम महिलांना संविधानिक आधिकार उपभोगता येत नाहीत, मुस्लीम महिलांना तलाक, बहुपत्नीत्व, हलाला सारख्या अवमानकारक पद्धतींचा सामना करावा लागतो, व्यक्तिगत कायद्यांमुळे सर्वधर्मीय महिलांवर कमी अधिक प्रमाणात अन्याय होतो म्हणून संविधानास अपेक्षित असणारा समान नागरी कायदा अस्तित्वात यावा. लोकसंख्यावाढ नियंत्रित ठेवण्यासाठी शासनाने आखलेल्या धोरणास विरोध न करता कुटुंब नियोजनाचे उपक्रम मुस्लीम समाजाने अंगिकारावेत, यासंदर्भात मुस्लीम धार्मिक आणि राजकीय नेते जी दिशाभूल करतात त्यास समाजाने बळी पडू नये. मदरसा शिक्षण मुस्लीम समाजाच्या मागासलेपणास कारणीभूत आहे. या तथाकथित अस्मिता समाजाच्या प्रगतीआड येत असल्यामुळे मुस्लीम समाजाने प्रादेशिक किंवा इंग्रजी माध्यमातून शिक्षण घ्यावे. समाजातील विविध कालबाह्य अंधश्रद्धा, पुरुषप्रधान परंपरांचे निर्मूलन करून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब करावा, यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने विविधांगी उपक्रमांचे आयोजन केले. दलवाईंना मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपूर्वी आणि नंतर असा एकत्रित फक्त एका दशकाचा कालावधी लाभला. मात्र या कालावधीत लोकप्रबोधनाचे प्रत्यक्ष कार्य, कार्याचे वैचारिक अधिष्ठान केवळ मुस्लीम कल्याणासाठी नव्हते तर ते भारतीय समाजाच्या उद्धारासाठी आणि पर्यायाने वैश्विक मानवी मूल्यांच्या संवर्धनासाठी होते.

ग्रंथप्रामाण्य न मानता त्याची चिकित्सा करणारे दलवाई हे मुस्लीम समाजातील पहिले सुधारक होते. दलवाईंची ही चिकित्सा मुस्लीम नेतृत्वाला परवडणारी नव्हती म्हणून त्यांनी दलवाईंना विरोध केला, त्यांच्याविषयी गैरसमज पसरवले. मुस्लीममानस धर्मचिकित्सेला अनुकूल नव्हते आणि आजही नाही. दलवाई निरीश्वरवादी, निधर्मी आणि अश्रद्ध जरी असले तरी मुस्लीम समाजाने अश्रद्ध झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह नव्हता. हा समाज सामाजिक सुधारणेस तयार व्हावा यासाठी त्यांचे प्रयत्न होते. ते संविधानाने दिलेल्या धर्मस्वातंत्र्याचे

समर्थक तर होतेच शिवाय निकोप धर्मस्वातंत्र्याची कोणी गळचेपी करीत असेल तर त्या विरोधात उभे राहणारे होते. भारतातील हिंदुत्ववाद हा मुस्लीम जमातवादाची प्रतिक्रिया आहे आणि मुस्लीम जमातवाद नष्ट झाला की आपल्या देशात हिंदू जातीवाद शिल्लक राहणार नाही, असे दलवाईंचे प्रतिपादन होते. मुस्लिमांचा सुधारणेस प्रतिकार आजचा हिंदुत्ववाद आक्रमक होण्यास कारणीभूत आहे हे वास्तव शहाबानो प्रकरणापासून ते तलाकबंदी कायदा अस्तित्वात येण्यापर्यंत आणि नंतरच्या हिजाब क्रिया-प्रतिक्रियेच्या वादंगात दडल्याचे लक्षात येते. दलवाई यांचे दुसरे तर्कशुद्ध निरीक्षणही फार महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, 'ज्या हिंदूंना मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार करायचा आहे ते हिंदूंना सनातनी बनवण्याचा प्रयत्न करीत आहेत, आणि ज्या हिंदूंना हिंदू समाजाला आणि पर्यायाने देशाला आधुनिकतेच्या रस्त्यावर न्यायचे आहे ते मुस्लीम जातीयवाद्यांना मिठ्या मारीत आहेत !' हे दृश्य बदलले पाहिजे. हे निरीक्षण आजही जसेच्या तसे पाहायला मिळते. तलाकबंदी, हिजाबबंदी, अजानबंदी वगैरे विषय जेव्हा पटलावर येतात तेव्हा मुस्लीम जमातवाद्यांच्या पाठीशी अनेक हिंदू पुरोगामी उभे राहतात. अलीकडे तथाकथित लव्ह जिहादचा मुद्दा पुढे करून हिंदुत्ववादी संघटना जनआक्रोश मोर्चे काढत आहेत. मुस्लीम विरोधी विखारी वक्तव्यांना ऊत आला आहे. धार्मिक धृवीकरण वाढवण्याचे प्रयत्न वाढत आहेत. हे सर्व देशाची एकात्मता धोक्यात आणणारे अनुचित प्रकार आहेत. याच पद्धतीने जमातवादी मुस्लीम भगवा लव्ह जिहादचा नारा देऊन मुस्लीम मुलींना एकट्या घराबाहेर पडू देऊ नका, त्यांना मोबाईल देऊ नका, त्यांच्यावर डोळ्यांत तेल घालून नजर ठेवा वगैरे भाषा करीत आहेत. आपल्याकडे आजपर्यंतच्या सुधारकांनी आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांचे समर्थन करून त्यास प्रोत्साहन दिले आहे. आज मात्र असे विवाह रोखण्यासाठी शासन समिती स्थापन करीत आहे. अशा अनेक विसंगतीतून मानवतेचे भवितव्य धोक्यात आणले जात आहे. या पार्श्वभूमीवर दलवाई म्हणतात, 'मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार करणाऱ्या हिंदूंच्या मी बाजूचा आहे आणि हिंदूंना सनातनी बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा विरोधक आहे. त्याचबरोबर हिंदूंना आधुनिक बनवणारांना माझा पाठिंबा आहे; परंतु मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार न करण्याच्या त्यांच्या धोरणांचा मी विरोधक आहे.'

आज मुस्लीम समाजात आधुनिक शिक्षण घेणारी अनेक मुले-मुली पुढे येत आहेत. मराठी भाषेचा स्वीकार वाढत आहे, मुस्लीम समाजात लोकसंख्या

नियंत्रणाला गती आली आहे. मुस्लीम जन्मदर कमी झाला आहे. न्यायासाठी पीडित महिला न्यायालयाची दारे ठोठावत आहेत, दर्ग्यात-मशिदीत सन्मानाने प्रवेश मिळावा यासाठी आंदोलन करीत आहेत. एनआरसी विरोधी आंदोलनात अनेक मुस्लीम महिला पुढे आल्या आहेत. असे सकारात्मक बदल निश्चितच स्वागतार्ह आहेत. तथापि मुस्लीम समाज प्रबोधनाचे विषय सुटले आहेत असे म्हणण्यासारखी स्थिती आजतरी नाही. मुस्लीम समाज प्रबोधनाचे विषय घेऊन मुस्लीम विरोधी वातावरण निर्माण करण्याची प्रत्येक संधी हिंदुत्ववादी संघटना घेतात. त्यामुळे मुस्लीम समाज प्रबोधनाचे विषय अधिक जटिल बनवले जातात. समान नागरी कायदा हा संविधानिक कर्तव्याचा, समता प्रस्थापित करण्याचा, धर्मनिरपेक्ष एकात्म समाज निर्माण करण्याचा विषय आहे. मात्र आज हा विषय मुस्लीम विरोधाचा ठरला आहे. भारत लोकसंख्येच्या बाबतीत जगातील सर्वात मोठा देश झाला आहे हा एक सामाजिक आणि राष्ट्रीय विषय आहे. अलीकडे मुस्लीम समाज लोकसंख्या नियंत्रणाला अनुकूल झाला आहे. तरीही हा विषय घेऊन मुस्लिमांना लक्ष्य करण्यात येते. समान नागरी कायदा, लोकसंख्या नियंत्रण हे सर्व समाजहिताचे विषय आहेत. यासंदर्भात लोकशिक्षण करण्यासाठी धोरणात्मक प्रयत्नांची गरज आहे. मात्र राजकीय हितासाठी या मुद्यांचा वापर करण्यात येत आहे. समाज आणि राष्ट्रहित विचारात घेऊन केवळ लोकानुनय न करता नेत्यांनी आपल्या लोकप्रियतेचा वापर करून लोकशिक्षण केले पाहिजे. लोकानुनय, लोकशिक्षण, लोकप्रियता याबाबत विवेकी समतोल राखून समान नागरिकत्वाच्या पायावरच राष्ट्रीय एकात्मतेची इमारत उभी राहू शकेल यावर दलवाईंचा विश्वास होता म्हणून ते महत्त्वाचा संदेश देतात, 'मुस्लिमांचे आधुनिकीकरण आणि भारतीयकरण जसे महत्त्वाचे आहे तेवढेच हिंदूंचेही भारतीयकरण झाले पाहिजे.' सर्वसमावेशकता, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, सेक्युलॅरीझम, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि उतर संविधानात्मक मूल्यांच्या बाबतीत जे प्रश्न निर्माण झाले आहेत या पार्श्वभूमीवर मा. अटलबिहारी वाजपेयी यांचे विधान महत्त्वाचे ठरते.

(दि. ३ मे २०२३ रोजी हमीद दलवाई यांच्या स्मृतिदिनी
दै. लोकसत्तामध्ये प्रकाशित झालेला लेख.)
लेखक मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष आहेत.)

■

(डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी लिहिलेल्या 'हिंदूंनाही हमीद दलवाईची गरज का आहे ?'... या दि. ३ मे २०२३ रोजी 'दैनिक लोकसत्ता'मध्ये प्रकाशित झालेल्या लेखावर तरुण भारतमध्ये ***प्रकाशित झालेले लेख आणि काही प्रतिक्रिया****)*

हे अटलबिहारी वाजपेयी यांचे विधान घेऊन आपण त्याचा यथोचित विस्तार केला आहे. वाजपेयी यांचे हे विधान फार चुकीचे आहे, असे म्हणता येत नाही. कारण हिंदूधर्मातही अनेक अनिष्ट चालीरीती आहेत. आणखी बऱ्याच सुधारणा होणे आवश्यक आहे. कारण सुधारणा ही अखंड चालणारी प्रक्रिया असते, कारण कालौघात कुठल्याही गोष्टीत दोष निर्माण होत असतात.

अटलबिहारी वाजपेयी यांची आणखीही काही मार्मिक विधाने आहेत. जेव्हा बेनझीर भुट्टो म्हणाल्या होत्या, 'कश्मीरबिना पाकिस्तान अधुरा हैं।' त्यावर उत्तर देताना वाजपेयी म्हणाले होते, 'पाकिस्तानबिना हिंदुस्तान अधुरा हैं....'

जेव्हा, १९७१ साली इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वात बांगलादेश युद्ध भारताने जिंकले. पाकिस्तानचा दारुण पराभव झाला. तेव्हा इंदिराजींचे अभिनंदन करताना, अटलबिहारी वाजपेयी संसदेत म्हणाले होते, 'इंदिराजी आप तो दुर्गा का अवतार हैं...' पण पुढे असे झाले की, जेव्हा कधी वाजपेयी इंदिराजींवर टीका करत, तेव्हा त्या वाजपेयींना आठवण करून देत, 'आपनेही मुझे दुर्गा का अवतार कहा हैं,' त्यावर वाजपेयींना शांत बसावे लागे.

मुस्लीम सुधारणावाद हा मोठा विषय आहे, त्या सुधारणा होतील, पण या देशातील मुस्लिमांनी आपण पूर्वाश्रमीचे हिंदूधर्मीय आहोत हे लक्षात घेऊन या देशाच्या भल्यात आपले भले आहे, हे लक्षात घ्यायला हवे. वेगळे राहण्यात आपले हित नाही, हे त्यांच्या लक्षात यायला हवे. कारण अलिप्ततावादाने मुस्लिमांचे मोठे नुकसान केले आहे.

याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'अखंड भारतात राहण्यातच या देशातील मुस्लिमांचे हित आहे. फाळणी करून वेगळ्या देशात राहून नाही.' आज आपल्याला पाकिस्तानची स्थिती पाहिल्यावर बाबासाहेबांचे विचार पटतील.

आज पाकिस्तानातील सामान्य मुस्लीम लोक कपाळावर हात मारून म्हणत आहेत, 'क्या इसिलिये बना था पाकिस्तान ?'

– जयवंत राणे

■

Arun Manorkar
asmarun22gmail.com
अकोला
दि. ७ मे २०२३

डॉ. तांबोळी सर,

सप्रेम नमस्कार,

दिनांक ३ मे रोजी लोकसत्तामध्ये प्रदर्शित झालेला आपला लेख 'हिंदूंनाही दलवाई यांची गरज आहे का ?' हा लेख वाचला आणि आवडलाही.

मुस्लीम समाजातही दलवाई यांच्यासारखे समाज सुधारक होऊन गेले, हे वाचून फार चांगले वाटले.

त्यांनी स्थापन केलेल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे आपण अध्यक्ष आहात म्हणजेच त्यांचे कार्य अजूनही पुढे चालू आहे असे दिसते.

मी अकोला जिल्हा येथे राहतो; पण मला स्वतःला मुस्लीम सत्यशोधक समाज, संघटनेचे अकोल्यात कोणतेही अस्तित्व जाणवले नाही.

मुस्लीम सत्यशोधक समाजाचे कोणकोणते कार्य आणि कुठे कुठे सुरू आहेत याविषयीचे सविस्तर लेख जर आपण लोकसत्ता मधून प्रसिद्ध केले तर त्यांचा हिंदूंच्या मानसिकतेवर बराच चांगला परिणाम होईल असे वाटते.

१. मुस्लिमांचा सुधारणेस प्रतिकार हिंदुत्ववाद आक्रमक होण्यास कारणीभूत आहे हे वास्तव शहाबानू प्रकरणापासून ते तलाकबंदी कायदा अस्तित्वात येण्यापर्यंत आणि नंतरच्या हिजाब क्रिया-प्रतिक्रियेच्या वादंगात दडल्याचे लक्षात येते, ही गोष्ट अगदी खरी आहे.

२. दलवाई म्हणतात, ज्या हिंदूंना मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार करायचा आहे ते हिंदूंना सनातनी बनवायचा प्रयत्न करीत आहेत आणि ज्या हिंदूंना, हिंदू समाजाला आणि पर्यायाने देशाला आधुनिकतेच्या रस्त्यावर न्यायचे आहेत ते मुस्लीम जातीयवाद्यांना मिठ्या मारीत आहेत, हे दृश्य बदलले पाहिजे.

हे हमीद दलवाई सर यांचे मत मात्र नरेंद्र मोदी यांच्या काळात, सरसकट खरे आहे असे म्हणता येणार नाही.

बीजेपीच्या काळात हिंदुत्ववादी अस्मिता जागृत झाल्याने, त्यातील काहीजण चेकाळले आहेत हे नक्की; परंतु बहुसंख्याकांच्या अतिक्रमणापासून अल्पसंख्याकांचे रक्षण होण्याकरता अतिशय सक्षम राज्यघटना भारतात उपलब्ध

आहे ही आपल्या सर्व अल्पसंख्याकांसाठी फार मोठी गोष्ट आहे की जी पाकिस्तानमध्ये उपलब्ध नाही.

गुजरातचे मुख्यमंत्री व २०१४ पासून भारताचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांना आपण पाहत आहोत. मी स्वतः मोदी अंधभक्त नाही; परंतु मला स्वतःला असे वाटते की, मोदी हे मूलतत्त्ववादी फंडामेंटल हिंदुत्ववादी नाहीत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासोबतही त्यांचे फारसे सख्य नाही आणि विश्व हिंदू परिषदेसोबतही त्यांचे सख्य दिसत नाही. मुस्लिमांमधील कोणत्या समाजास मोदी भाव देतात हे जर पाहिले तर एवढे नक्की दिसते की, काँग्रेस सारखे मोदी, मुस्लीम मूलतत्त्ववाद्यांना तर मुळीच थारा देत नाहीत हे नक्की.

२०१४ नंतर सतत बीजेपीची सत्ता केंद्रात असूनही आज मुस्लीम समाजाची मानसिकता कुठेही दबल्यासारखी वाटत नसून त्यांचे आवाज जास्त मोठ्याने येणे सुरू झाले आहे.

आज पाकिस्तानात हिंदूंची संख्या, स्वातंत्र्यानंतर कमी नव्हे नगण्य होते व भारतात मुस्लिमांची संख्या वाढते. यावरूनच हे दिसते. हिंदू जागा होत आहे त्यामुळे कट्टर मूलतत्त्ववादी मुसलमानांच्या मनात धडकी भरत आहे हे खरे आहे व ती तशी बसणे फार जरुरी आहे, कारण एकटे मुस्लीम धर्मसुधारक, कट्टरतावाद्यांच्या विरोधात लढा देऊ शकत नाहीत.

आज मुस्लीम समाज सुधारकांना, धर्मनिरपेक्ष हिंदू डोक्यावर घेतील, सत्ताधारीही घेतील व मुस्लीम कट्टरतावादापासून त्यांचे रक्षण करतील, अशी परिस्थिती आहे, त्यामुळे आपले कार्य खूप जोमाने होण्याची गरज आहे.

मला असं वाटते की, हमीद दलवाई यांचे कार्य मुस्लीम समाजात फार मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. हिंदूंचा कट्टरतावाद वाढत आहे यासाठी घाबरून जाऊन, 'मुस्लीम समाज सुधारण्या'चे काम धिमे न करता ते पुढे चालू ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष या नात्याने आपण मोदी यांच्याशी चर्चा करून एकदा आपल्या सर्व शंकांचे निरसन करून घ्यावे हे योग्य.

बहुसंख्य समाजात कोणत्याही अल्पसंख्याकांना वावरताना, बहुसंख्य समाजाच्या अरेरावीस काही प्रमाणात सामोरे जावे लागण्याचे गृहित धरलेच पाहिजे,

(जेव्हा आपण अमेरिकेत जातो, अरब कंट्रीजमध्ये जातो, युरोपमध्ये जातो तेव्हा हे सर्व मान्य करतोच. तसे हेही मान्य केले पाहिजे म्हणजे गुलामगिरी

पत्करली पाहिजे असे नव्हे. खूप हिंदू-मुस्लीम भारतीय परदेशात अत्यंत गुण्यागोविंदाने नांदत आहेत.)

हे सर्व करताना आम्ही बहुसंख्य समाजास काहीच मानत नाही, गिनत नाही, अशी वृत्ती ठेवून वागणे मात्र कोणत्याच अल्पसंख्य समाजाच्या फायद्याचे नाही.

हे भारतातच अल्पसंख्याक लोक करू शकतात, कारण भारतात अजूनही कायद्याचे राज्य आहे. आणि हिंदू समाज जाती-जातीत विभागल्यामुळे, अजून योग्य प्रमाणात जागृत नाही, एकत्रित नाही आणि कायदा मोडून फार काही करण्याची हिंमत ठेवत नाही. तसेच भाषावार प्रांतरचनेमुळे, अल्पसंख्याकांचे रक्षण करण्याकरता बहुसंख्याकांमधील काही पक्ष व नेते राज्य व केंद्रीय पातळीवर उपलब्ध आहेत, अन्यथा बहुसंख्य समाजासमोर इतर अल्पसंख्याक समाज कसे काय अरेरावीने वागू शकतो, ह्याचे जगातील इतर लोकांना आश्चर्य वाटले नसते.

सर्व धर्मीयांनी जाती-धर्माच्या वर उठून भारतीय होणे व स्वतःचे अंगी वैज्ञानिक, धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी दृष्टिकोन अंगीकारून जीवनयापन करण्यास सर्वात जास्त महत्त्व देणे हीच बाब सर्वांच्या हिताची आहे.

मुस्लीम सत्यशोधक समाजाचे, सध्या कुठे कुठे आणि काय काम सुरू आहे, याबद्दलचे आपले लेख लवकरात लवकर प्रदर्शित करावे, अशी मी आपणास परत विनंती करून व आपल्या पुढील कार्यास शुभेच्छा देऊन मी येथेच थांबतो.

- अरुण मानोरकर

७.५.२०२३

■

आज ३ मे सच्चा पुरोगामी विचारवंत, प्रख्यात समाज सुधारक आणि पुरोगामी विचारांचे पुरस्कर्ते हमीद दलवाई यांचा स्मृतिदिन. याचे स्मरण ठेवून आपण डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचा लेख प्रसिद्ध केलात याबद्दल लोकसत्ताचे मन:पूर्वक अभिनंदन.

हमिदची अनेक भाषणे ऐकण्याचे, प्रसंगी त्याच्याबरोबर चर्चा करण्याचे भाग्य आमच्या पिढीस लाभले. पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेतील त्याचे भाषण खूप गाजले होते. न्यू इंग्लिश स्कूलचे मैदान तर तुडुंब भरले होतेच; पण मैदानाच्या भिंतीवर आणि बाहेरही लोक थांबले होते.

हमीद सर्वांगाने बोलत असे.त्याचे विचार स्पष्ट होते. मुस्लीम समाजाने

पुरोगामी दृष्टिकोन स्वीकारावा, स्त्रियांना योग्य ते स्वातंत्र्य द्यावे, अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांच्या विळख्यातून त्यांना बाहेर काढून त्यांना शिक्षणाची संधी द्यावी, असे त्याचे प्रामाणिक मत होते. आणि ते तो मुद्देसूद रीतीने मांडत असे. स्त्रियांवरील अत्याचारांविषयी बोलताना तो लालीलाल होत असे. आणि त्याच्या प्रतिपादनास गारांचा पाऊस पडावा असा टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद मिळत असे. त्याने चाळीस वर्षांपूर्वी व्यक्त केलेले विचार आजच्या परिस्थितीस किती तंतोतंत लागू होतात हे पाहिल्यावर त्याच्या दूरदृष्टीची कल्पना येते.

'मी सर्वप्रथम माणूस आहे, त्यानंतर भारतीय आहे आणि शेवटी मुस्लीम आहे,' असे रोखठोक प्रतिपादन करणे त्या काळात सहजसाध्य नव्हते आणि आजही नाही. याची किंमत त्याला चुकवावी लागली. प्रतिगामी विचारांच्या मंडळींनी त्याच्यावर कायम कडवट टीका केली. पण ती त्याने सहज पचविली. या टीकेला द्वेषभावनेने कधीही उत्तर दिले नाही.

जागतिकीकरण, उदारीकरणाच्या आजच्या गतिमान युगातसुद्धा ओवेसी बंधू, आझम खान यांचे विचार ऐकल्यावर हमीदचे प्रतिपादन किती मूलगामी होते याची कल्पना येते.

काही वर्षांपूर्वी चिपळूणमध्ये साहित्य समेलन आयोजित केले होते, या संमेलनात ग्रंथ दिंडी हमीद दलवाईंच्या घरापासून सुरू करावी, अशी आयोजकांची इच्छा होती. दुर्दैवाने गल्लीतील लोकांनी त्यांना नकार दिला. ही नकारात्मक भावना विलक्षण क्लेशदायी आहे. श्रीमती मेहरून्निसा भाभींनी आपल्या 'मी भरून पावले आहे' या आपल्या पुस्तकात हमिदने जे कार्य केले, जे भोगले याचा संयत उल्लेख केला आहे. हे पुस्तक सर्वांनी जरूर वाचावे.

हमीद यांच्या प्रेरक स्मृतीस नम्र अभिवादन !

- अशोक आफळे

कोल्हापूर

०३/०५/२०२३

■

दि. २४/०५/२०२३

प्रिय शमसुद्दीन तांबोळी,

सप्रेम नमस्कार,

नेहमीप्रमाणेच आपला आजच्या लोकसत्तेतील हिंदूनाही दलवाईंची गरज

का आहे ? सर्वांगसुंदर आहे. आपल्या सर्वच विचारांशी कुठलाही विचारी व धर्मनिरपेक्ष माणूस सहमत होईल. हमीद दलवाई यांचे निरीश्वरवादी, निधर्मी आणि अश्रद्ध या भूमिकेशी मी सहमत आहे. कुठलाही धर्म माणसा माणसात भेद करतो. भांडण लावतो. लढाया होतात. त्यामुळे माणसाला धर्माची गरजच नाही, असे मला वाटते.

- निशिकांत मुपीड

मोबा. : ९९६९०१२१६२

■

२४/०५/२०२३

नमस्कार,

आज आपला लोकसत्तामधील अप्रतिम लेख वाचण्यात आला.

मन प्रसन्न झाले, एवढेच नव्हे तर मी माझ्या मुलीला व पत्नीला, जिथे गरज होती, तेवढे इंग्रजीत भाषांतर करून समजाविले.

आपल्या लेखातील परखड विचार आणि आजच्याच पेपरमध्ये आलेल्या एका हिंदू संघटनेविषयीचे परस्पर विरोधी वक्तव्य करणाऱ्या दोन राजकीय पक्षांना हे लक्षात येत नाही का ? या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे; पण हे सर्व आपली राजकीय स्वार्थाची भाकरी भाजण्यात व्यस्त आहेत. असो.

पण आपल्यासारखे काही मोजके अजून शिल्लक आहेत, हीच समाधानाची बाब आहे.

आपल्या कार्यास शुभेच्छा !

आपला,

शरद पाटील

■

२४/०५/२०२३

डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचा 'हिंदूंनाही दलवाईंची गरज आहे का ?' हा लेख (३ मे) वाचला. भारत एक अतिशय विचित्र देश आहे. जिथे लोकांना बारमाही द्वेषातून कधीच स्वातंत्र्य मिळत नाही आणि लोकसंख्येच्या मोठ्या भागाला हे स्वातंत्र्य नकोच आहे. हिंदू-मुस्लीम यांच्यात संघर्ष का निर्माण होऊ नये, या चिंतेने अनेकांना रात्रंदिवस ग्रासले आहे. जिथे हिंदू-मुस्लीम संघर्षाला फारसा वाव नाही, तिथे लोकांना हिंदू-ख्रिश्चन संघर्ष दिसतो, जिथे हेही नाही तिथे त्यांना

उच्चवर्णीय आणि दलित संघर्ष दिसतो, शहरी लोकांना त्यांचा आदिवासींशी संघर्ष दिसतो. हे चक्र कधीच संपत नाही आणि आता सोशल मीडियामुळे या द्वेषाला आगीप्रमाणे धगधगता ठेवणे सोपे झाले आहे. देशाला अशा अवैज्ञानिक धर्मांधतेत ढकलले जात आहे की त्यातून सावरायला खूप वेळ लागेल. प्रक्षोभक विधानांच्या प्रभावाखाली अनेक समजूतदार आणि शिकलेले लोकसुद्धा हिंसक बनले आहेत. या लोकांकरिता त्यांच्या धर्म आणि जातीचा अभिमान उन्मादाच्या मर्यादेपर्यंत वाढला आहे. एक शेजारी देश, स्वतःमधले काही धर्म, काही जाती किंवा महिलांसारख्या असुरक्षित गटांवर कट्टरपंथी राष्ट्रवादाचे लक्ष्य म्हणून हल्ले चढवत आहेत आणि या सर्व गोष्टींना अशा इतिहासाशी जोडले जात आहे जो कधीही अस्तित्वातच नव्हता. प्रत्येक राज्याच्या निवडणुकांबरोबर अशा हिंसाचारात आणखी इंधन ओतले जात आहे. धर्मांधता आणि सांप्रदायिक द्वेष किती हिंसक होऊ शकतो हे अफगाणिस्तानपासून इराक आणि सीरियापर्यंत दिसून येते. महान परंपरा असलेल्या या देशात ज्या प्रकारे धार्मिक आणि जातीय आधारावर लोकांची विभागणी केली जात आहे, प्रथम श्रेणीचे नागरिक आणि द्वितीय श्रेणीचे नागरिक ठरवले जात आहेत, ते भयंकर आहे. द्वेषाने भरलेला एकटा माणूस करत असलेली हिंसा, ती रेकार्ड करून धमक्या आणि इशाऱ्यांसह समाज माध्यमांवर पसरवणे भयावह आहे. अशा प्रत्येक हिंसेमध्ये देशातील लोकांमध्ये फूट पाडण्याची भरपूर ताकद आहे. आज या देशाने आंतरराष्ट्रीय आर्थिक आव्हाने आणि शक्यता लक्षात घेऊन धार्मिक आणि सामाजिक सलोखा राखला पाहिजे आणि देशातील जनतेच्या शक्तीचा उपयोग प्रगतीसाठी केला पाहिजे. कोणत्याही देशातील बहुसंख्य वर्ग ज्या पद्धतीने वागतो, इतर वर्गही त्याप्रमाणे वागतात, त्यामुळे आज केवळ हिंदू समाजालाच नाही तर संपूर्ण भारतीय समाजाला अनेक हमीद दलवाईंची गरज आहे हे अगदी खरे आहे.

- तुषार अशोक रहाटगावकर

डोंबिवली पूर्व

■

दि. २४/०५/२०२३

साहेब,

नमस्कार,

आपला लेख वाचला आणि हमिद दलवाईजींच्या विषयी मनात संमिश्र

भावना उठल्या. आपण भारतियांनी या महामनवाला, विचारवंताला जो न्याय व सन्मान द्यायला पाहिजे होता तो दिला नाही, ही सल मनात राहते.

आपल्या लेखात नमूद केलेले दलवाईजींचे विचार आज तंतोतंत लागू पडतात. साहेब, मला मुस्लीम सत्यशोधक समाजाचे काम करण्याची ईच्छा आहे. आपणास भेटण्याची ईच्छा आहे. कृपया आपला फोन नंबर व पत्ता मिळाल्यास आभारी आहे.

आज जरी मी सेवानिवृत्त असलो तरी कॉलेज जीवनापासून मला दलवाईंच्याबद्दल नितांत आदर राहिलेला आहे. नमस्कार !

- शहाजी सावंत

■

हिंदू समाजाला वेगळ्या हमीद दलवाईंची गरज आहे ?

हमीद दलवाई हे मुस्लीम समाजातील एक थोर विचारवंत, प्रबोधनकार व समाजसुधारक होते. त्यांनी धर्माच्या नावाखाली कुंठित झालेल्या मुस्लीम समाजाला आधुनिक विचाराने जागृत करण्याचे अथक प्रयत्न केले. या धर्मातील धर्मांधता, अनिष्ठ चालीरिती व रूढी, संकुचित भाषाभिमान या विषयांतील दृष्टिकोनावर मात करण्यासाठी प्रामाणिक परिश्रम घेतले. आपली ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांनी दि. २२ मार्च, १९७० रोजी 'मुस्लीम सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली.

मुस्लीम समाजातील व धर्मातील टाकाऊ भाग काढून टाकून व समाजाचा पारंपरिक दृष्टिकोन बदलून तो सर्वाधिक आधुनिक व समृद्ध व्हावा, तसेच या समाजाचे प्रबोधन घडवून त्याला राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष बनवावे, त्याच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, ही या समाजाची व्यापक बैठक होती.

मात्र, या कार्याला मूर्तरूप देऊन व्यापक चळवळ उभी करण्यासाठी दलवाईंना केवळ सात वर्षांचा असा काळ मिळाला. कारण, दि. ३ मे, १९७७ रोजी त्यांचे वयाच्या ४५व्या वर्षी निधन झाले. त्यांनी आपल्या कार्यकाळात पुणे, दिल्ली व कोल्हापूर येथे सामाजिक परिषदा भरवल्या. तलाकपीडित मुस्लीम स्त्रियांची परिषद भरवून कालबाह्य शरियतच्या कायद्याविरुद्ध आवाज उठवला. परंतु त्यांच्या या कार्याला मुस्लीम मुल्ला-मौलवींनी तीव्र विरोध केला. त्यांच्या या विधायक कार्याला फारसे जनसमर्थनही लाभले नाही. त्यामुळे जनजागृतीच्या चळवळीचे स्वरूप मिळू शकले नाही. त्यांचे या चळवळीतील बहुतेक सहकारी हिंदूधर्मीय

होते. मुंबई-पुण्यातील व त्यांच्या समाजातील मोजक्या मंडळींनी वैचारिक पातळीवर दलवाईंचे कार्य पुढे चालू ठेवले. परंतु, मुस्लीम समाजातून त्याला झपाटलेले व समाजकार्याच्या ध्येयाने प्रेरित झालेले धडाडीचे नेतृत्व वा कार्यकर्ते मिळाले नाहीत. त्यामुळे प्रबोधनाच्या या लढाईत ते एकाकी पडले. या जमिनीवरील वास्तवाची काही कारणे आहेत, ती अशी-

१) मुस्लीम समाज हा अतिशय धर्मनिष्ठ व पोथीनिष्ठ आहे. २) या समाजात प्रबोधनाची वा परिवर्तनाची परंपरा सातत्याने निर्माण होऊ शकली नाही. ३) मुल्ला-मौलवींचा शरियत बाहेरील सुधारणांना सक्त विरोध आहे आणि बहुसंख्य मुस्लीम समाज आजही त्यांच्या प्रभावाखाली आहे. ४) सत्तेच्या राजकारणासाठी राजकारण्यांना मुस्लीम समाजाची 'जैसे थे' परिस्थिती ठेवणे एकगठ्ठा मतासाठी आवश्यक वाटते. ५) मुस्लीम समाज धार्मिक व राजकीय पुढाऱ्यांच्या प्रभावाखाली स्वतःला सुरक्षित समजतो. ६) मुख्य म्हणजे, धार्मिक व भाषिक स्वातंत्र्य राज्यघटनेने दिल्यामुळे व आमच्या कायद्याचा उगम धर्मातच असल्यामुळे शासनाला आमच्या कायद्यात बदल करण्याचा अधिकारच नाही, अशी मुस्लीम धर्ममार्तंडांची व राजकारण्यांची भूमिका असल्यामुळे समान नागरी कायद्याला त्यांचा विरोध आहे.

परिणामतः मुस्लीम व्यक्तिगत कायद्यामुळे मुस्लिमांना विशेषत: मुस्लीम महिलांना संविधानिक अधिकार उपभोगता येत नाहीत. तलाक व बहुपत्नीत्व अशा अपमानकारक पद्धतींचा स्वीकार करावा लागतो. मुस्लीम समाज कुटुंब नियोजनाचे उपक्रम हाती घेत नाही. मदरशांमधील शिक्षण हे मुस्लीम समाजाच्या मागासलेपणास कारणीभूत आहे. मुस्लीम समाजाने प्रादेशिक भाषेतून वा इंग्रजी भाषेतून शिक्षण घ्यावे. पण तसे होताना दिसत नाही. अंधश्रद्धा निर्मूलन वा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब या संदर्भात मुस्लीम जनमानस मागासलेलेच आहे. या दोषांची कबुली लेखकाने स्वतःच आपल्या लेखात दिली आहे. त्यामुळे हमीद दलवाईंसारख्या प्रबोधनकारांची व समाजसुधाकांची साखळी निर्माण होणे, हे मुस्लीम समाजासाठीच अत्यावश्यक आहे, असे वाटते.

या तुलनेत हिंदू समाजात समाजसुधारणेची चळवळ फार प्राचीन काळापासून सुरू आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. त्याचे स्वरूप असे १) हिंदू धर्म हा पोथीनिष्ठ नाही. प्राचीन काळातील वेद, उपनिषदे शाश्वत चिंतन असली तरी स्मृती या स्थळ-काळ परिस्थितीनुसार परिवर्तनीय होत्या. समाजधारणेसाठी

आवश्यक त्या परिवर्तनासह अनेक स्मृती हिंदू समाजात निर्माण झाल्या व त्यांनी समाजाचे सुव्यवस्थित संचालन केले. आधुनिक भारतीय राज्यघटना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीच्या सहकार्याने निर्माण केलेली स्मृतीच आहे.

२) इस्लामी आक्रमणाच्या कालखंडात म्हणजे मध्ययुगीन काळात समाजप्रबोधन व सुधारणेची धुरा भारतीय संतांनी वाहिलेली दिसते. सामाजिक कुप्रथा व अनिष्ट चालीरीतींवर आपल्या काळात संतांनी कठोर प्रहार केले. धर्मसुधारणेचे कार्य केले. साकळलेले व बंदिस्त समाजजीवन प्रवाही व स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ, गुजरात, राजस्थान, पंजाब, उत्तर भारत, काश्मीर, बंगाल, आसाम असे संपूर्ण देशभर संतांनी केलेल्या प्रबोधनाचे जाळे विणलेले दिसते. महाराष्ट्रात तर ज्ञानेश्वरांपासून रामदास, तुकारामांपर्यंत अठरापगड जातील संतांनी समाजमन जागृत केले. या सर्वात स्त्रीसंतांचाही महत्त्वाचा वाटा होता. धर्म व समाज यांच्यात परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य (Silent Revolution) संतांनी केले. ३) अव्वल इंग्रजी आमदनीत समाजप्रबोधन व परंपरांची हीच परंपरा विचारवंत, प्रबोधनकार व समाजसुधारकांनी चालू ठेवली. राजा राममोहन रॉय यांच्यापासून डॉ. आंबेडकरांपर्यंत समाजातील प्रत्येक वर्गात / घटकांत विचारवंत व समाजसुधारक होऊन गेले. आपल्या प्रखर लेखणीने, वाणीने व प्रत्यक्ष कार्याने त्यांनी समाजातील व धर्मजीवन शुद्ध ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला. ४) स्वातंत्र्योत्तर काळात श्री श्री रविशंकर, आठवलेशास्त्रींची स्वाध्याय चळवळ, नानासाहेब धर्माधिकारींची सामाजिक चळवळ, स्वामिनारायण चळवळ, विश्व हिंदू परिषदेचे धर्मजागरण कार्य व रा. स्व. संघाची सामाजिक समरसता चळवळ यांनी समाजजीवन निकोप ठेवण्याचे कार्य केले. ही सर्व मंडळी, महानुभाव हिंदू समाजातील 'हमीद दलवाई'च आहेत, हे डॉ. तांबोळी यांनी लक्षात घ्यावे.

- प्रा. श्याम अत्रे
मोबा. : ९३२४३६५९१०

■

मुस्लीम समाजाला शेकडो हमीद दलवाईंची गरज !

जो समाज गतिशील असतो, तो समाज जिवंत समाज समजला जातो. समजाची गतिशीलता म्हणजे जसजसा काळ बदलत जातो, तसतसा समाजही

आपल्यात बदल करून घेतो. बदलाचे हे काम सोपे नसते. यथास्थितीवादी लोकांचा बदलास विरोध असतो. परंपरेने चालत आलेल्या रूढी आणि परंपरा जर काल कायदेशीर होत्या, तर त्या आज का नाही, असा विचार समाजातील काही लोक करतात. बदल का आवश्यक आहेत, हे समाजातील थोर आणि कर्ते पुरुष सांगतात त्यांना प्रथम विरोध होतो; परंतु नंतर त्यांचे म्हणणे लोक स्वीकारतात, असा आपल्या हिंदू समाजाचा अनुभव आहे.

राजा राममोहन रॉय ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी समाजसुधारकांची दीर्घ परंपरा हिंदू समाजाला लाभली आहे. महाराष्ट्राचा विचार करता, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, लोकहितवादी महात्मा फुले, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वा. सावरकर, सावित्रीबाई फुले, डॉ. आनंदीबाई जोशी, महर्षीकर्वे, बाया कर्वे अशी शेकडो नावे घ्यावी लागतात. या सर्वांच्या कामामुळे आज आपण जे आहोत, ते घडलो आहोत आणि समाजाने आपल्या भावविश्वात या सर्वांना मानाचे स्थान दिले आहे.

भारतातील मुस्लीम समाज हा स्थितीवादी समाज आहे. त्यात बदल घडवून आणणे अतिशय कठीण काम आहे. 'मुस्लीम सत्यशोधक समाजा'ची निर्मिती करून हमीद दलवाई यांनी मुस्लीम समाज सुधारण्याचे काम सुरू केले. त्याची काही तात्त्विक मांडणी त्यांनी केली. ती अतिशय महत्त्वाची आहे. त्यांचा वसा पुढे चालविण्याचे काम शमसुद्दीन तांबोळी यांच्यासारखे समाजसुधारक करताना दिसतात, त्याचे स्वागतच केले पाहिजे. पण त्यांनी लेखात लिहिलेले 'हिंदू समाजाला हमीद दलवाई सारख्यांची गरज आहे,' हे वाक्य मात्र पचनी पडणे कठीण आहे. शेकडो हमीद दलवाई हिंदू समाजाने यापूर्वी निर्माण केले आणि आजही निर्माण होत आहेत. अण्णा हजारे, पोपटराव पवार, जलक्षेत्रात काम करणारे दिवंगत साळुंखे, शेतकरी आंदोलन करणारे शरद जोशी, सिंधुताई सपकाळ अशी या पिढीतील अनेकांची नावे घेता येतात. या सर्वांचा सन्मान हिंदू समाजाने आपली परंपरा राखत केला आहे. हिंदू समाजाला हमीद दलवाईंच्या गरजेपेक्षा मुस्लीम समाजाला शेकडो हमीद दलवाईंची गरज आहे. मुस्लीम समाजसुधारकांची गरज आहे. राज्यघटनेचा उच्चविचार आणि मूल्यविचार हा मुस्लीम परंपरेतून आलेला नाही. त्यांची मुळे भारतीय दर्शनात, चिंतनात आणि मूल्यव्यवस्थेत आहेत. मुसलमानांनी प्रथम भारतीय होणे गरजेचे आहे. स्वतःला सोयीचे असेल तेव्हा राज्यघटना आणि गैरसोयीचे असेल तेव्हा पवित्र कुराण आणि हदीसचा आधार,

अशी दुटप्पी कृती चालणार नाही. राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानता, जातीभेदास नकार, विचार, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, उपासना स्वातंत्र्य सर्वांना दिले आहे. मुस्लीम समाजाने ही मूल्ये स्वीकारली आहेत का ? 'मुस्लीम सत्यशोधक समाजा'ने ती स्वीकारली आहेत, एवढे म्हणून पुरेसे नाही. ज्या मुस्लीम मुल्ला-मौलवींचे प्रमुख मुस्लीम समाजावर आहे, त्यांनी ही मूल्ये स्वीकारली का ? आणि ती त्यांनी स्वीकारावीत म्हणून 'मुस्लीम सत्यशोधक समाज' कोणते प्रयत्न करीत आहे, हा लाखमोलाचा प्रश्न आहे.

हिंदू समाज झपाट्याने विज्ञाननिष्ठ बनत चालला आहे. संविधान साक्षरतेचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहे. कालचे स्त्रियांचे प्रश्न आज अस्तित्वहीन होत चालले आहेत. जातीयता आणि अस्पृश्यता समाजजीवनातून संपली पाहिजे, या बाबतीत बहुसंख्य हिंदूंचे मत सारखेच असते. या संदर्भात मुस्लीम समाजाशी तुलना केली असता, परिस्थिती अंधकारमय आहे हे लक्षात येते. मुंबईसारख्या उकाड्याच्या शहरात काळ्या बुरख्यात फिरणाऱ्या मुस्लीम माता-भगिनी बुरख्यातून कधी बाहेर पडणार, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. हे काम मुस्लीम समाजातील समाजसुधारणा करू इच्छिणाऱ्या सत्यशोधक मुस्लीम बांधव आणि भगिनींनी केले पाहिजे. त्यांनी जोरदार जवळ सुरू केली, तर सुजाण हिंदू त्यांना मोठ्या संख्येने पाठिंबा देतील.

- रमेश पतंगे

मोबा. : ९८६९२०६१०१

■

हिंदूंसाठी मुस्लीम समाजामध्ये अधिकाधिक 'हमीद दलवाई' निर्माण होणे अत्यावश्यक

आज पूर्ण समाजाच्या स्वास्थ्यासाठी मुस्लीम समाजात अनेक हमीद दलवाई निर्माण होण्याची हिंदू समाजाला आत्यंतिक गरज आहे. ग्रंथप्रामाण्य किंवा ग्रंथ आदेश यांना महत्त्व न देता, कालसुसंगत इहवादी आणि विवेकाने विचार करण्याची परंपरा हिंदू धर्मात आहेच. हिंदू धर्मातील उदारमतवादाने हिंदूंना संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य दिले. हिंदू धर्माने केवळ उपासना सांगितली नाही, तर जगण्याचा मार्ग सांगितला आणि त्यामध्ये स्थळ-काळ परिस्थिती अनुरूप परिवर्तन होत गेले. इथे वेळोवेळी विद्वतजनांनी विविध दर्शने, विविध मते मांडली आणि समाजव्यवस्था त्यावर विकसित होत गेली. निर्गुण

निराकार वेदकाळाला सामान्यांसाठी पुराणकथांनी जोडले. रामायण, महाभारत आदि काव्ये ही जीवनमूल्ये सांगणारी होती. हिंदूंचा एक असा ग्रंथ नाही, तर विविध स्मृतींमधून, शास्त्रांमधून जगण्याची तर्कशुद्ध पद्धत आणि नियम सांगण्यात आले. एकातून दुसरा विचार निर्माण होताना तो वादविवाद, चर्चा याद्वारे होत गेला. एकमेकांचे विचार आत्मसात केले गेले आणि समाजासाठी त्या त्या परिस्थितीत जे जे उत्तम ते वेचले गेले. इथे हजारो साधू-संतांनी समाजाच्या एकोप्यासाठी समता, स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा, करुणा ही मूल्ये आपापल्या साहित्यातून रुजवली. पूर्ण ऐहिक विचार करणारे गौतम बुद्ध भारतातच जन्मास आले. इथेच महावीर, गुरुनानक, संत बसवेश्वर अशा अनेकांनी समाजाच्या त्या काळातील प्रश्नांना उत्तरे दिली. बहुसंख्य समाजाने त्यांना स्वीकारले, त्यांना पाखंडी मानले नाही. एका अर्थाने हिंदू युग हे अव्याहत प्रबोधनपर्वच आहे. कारण, सुधारणावादी विचार हाच हिंदू मार्ग आहे. इस्लामी आक्रमणांनंतर धर्माचे चाक फिरते ठेवण्यात असंख्य अडचणी येत गेल्या. मात्र, ब्रिटिशकाळात आधुनिक मूल्यांचा इथल्या समाजसुधारकांनी तत्काळ अंगीकार करून समाजाला त्यासाठी तयार केले. समाजानेही जलद गतीने सुधारणांना स्वीकारले. स्त्री-पुरुष समता, अस्पृश्यता निवारण, सतीबंदी, बहुविवाहबंदी, बालविवाहबंदी, स्त्रियांना मिळकतीत समान हक्क, घटस्फोटांचे हक्क हे बदल समाजाने तुलनेने लवकर स्वीकारले. स्वातंत्र्यानंतर संविधानिक मूल्ये स्वीकारतानाही सुधारक नेत्यांमुळेच नाही, तर सुधारणावाद हिंदूंच्या नसांमध्ये असल्याने आज ७५ वर्षे संविधानाधारित भारत उत्तम वाटचाल करत आहे. या हजारो वर्षांच्या काळात प्रस्थापित विचारांहून वेगळा विचार मांडणारे आणि मूल्ये रुजवणारे 'हमीद दलवाई' हजारोंच्या संख्येने प्रत्येक काळात, प्रत्येक पायरीवर होते.

मात्र, मुस्लीम समाजाला हे एकमेव नाव वगळता दुसरे नाव नाही. त्यामुळे हमीद दलवाईंनी धर्मचिकित्सा करून मानवतावादी आणि सेक्युलर भूमिकेने अनेक प्रश्नांची हाताळणी केली. समान नागरी कायद्यासाठी त्यांनी पंतप्रधानांपर्यंत निवेदने दिली, जागृती कार्यक्रम आखले. मुस्लीम महिलांचे प्रश्न, लोकसंख्या नियंत्रण, तोंडी तलाक, हलाला, बहुपत्नीत्व, मुस्लीम महिलांना मूल दत्तक घेण्यास आडकाठी या विषयांना वाचा फोडली. त्यांचे कार्य थोरच होते; पण त्यांना फार कमी अवधी मिळाला आणि आज त्यांच्यानंतर या प्रश्नांची काय अवस्था आहे ? तिहेरी तलाक केवळ न्यायालयाच्या हस्तक्षेपाने बेकायदेशीर झाला. मात्र, समाजाने या मध्ययुगीन


प्रथा सोडाव्या, यासाठी हमीद दलवाईंच्या आधी आणि नंतर कोणीही जन्मास आला नाही. मुस्लीम समाजातील या मानहानीकारक प्रथा संविधानिक मूल्यांच्या पूर्णतः विरुद्ध आहेत आणि आजच्या युगातही चालूच आहेत.


'हमीद दलवाईंचे वैचारिक वारसदार' म्हणवणाऱ्यांनी आज त्यांनी मुस्लीम समाजासाठी सुरू केलेल्या कामांपैकी कोणती कामे पूर्ण झाली ? त्यांची फलश्रुती काय ? मुस्लीम समाजात परिवर्तन होण्यासाठी नक्की कोणत्या अडचणी आहेत ? कोणत्या गोष्टींमुळे कालबाह्य विचार हा समाज सोडून द्यायला तयार नाही ? आणि या परिवर्तनासाठी हमीद दलवाईंना अपेक्षित असलेली मुस्लीम समाजाने अंगीकारावी, अशी सेक्युलर विचारधारा किती आवश्यक आहे ? अशा प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे. प्रत्येक युगात प्रत्येक समाजाला इहवादी विचार करून प्रश्नांची उकल करणाऱ्या हमीद दलवाईंची गरज असतेच ! ती प्रत्येक दशकात, प्रत्येक वर्षांतही असते आणि हिंदू समाजात 'परंपरेने' असे हजारो 'दलवाई' जन्म घेत असतात, मुस्लीम समाजाच्या कट्टरतेने प्रतिक्रिया म्हणून आज हिंदूंनाही सहिष्णुता, सर्वसमावेशकता आदी मूल्यांवर विचार करावा लागतोय. त्याने हिंदू समाजाची प्रवाहीपणाची वीण हळूहळू उसवतेय. मुस्लीम समाजातील जिहादी तत्त्वे, त्याने होणारी धर्मांतरे, सक्तीचे विवाह आणि धर्मांतरे, भारताच्या बाहेरील निष्ठा आणि फुटीरतावाद, राष्ट्रीयतेचा अभाव अशा गोष्टी हिंदूंना कट्टर होण्यास भाग पाडत आहेत. अशा वेळेस हिंदू समाजासाठी मुस्लीम समाजामध्ये अधिकाधिक 'हमीद दलवाई' निर्माण होणे अत्यावश्यक आहे.

- विभावरी बिडवे

vibhabidve@gmail.com

■ ■





स्वागत नव्या पुस्तकांचे...

'द केरळ स्टोरी.....' निमित्ताने

● बेनझीर काझी

शंभर टक्के साक्षर राज्य म्हणून केरळची ओळख आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून हे राज्य राजकीय अपप्रचारांचा बळी ठरत आला आहे. 'द केरळ स्टोरी' सिनेमाच्या निमित्ताने केरळ पुन्हा चर्चेत आले आहे. गेल्या काही वर्षांपासून देशातील मुस्लिमांविषयी भीती वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. त्याचसाठी २६ टक्के मुस्लीम लोकसंख्या असलेल्या केरळला मुद्दाम टार्गेट केले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून 'द केरळ स्टोरी' नावाच्या चित्रपटातून केरळ चर्चेत आहे. देशातील अनेक राजकीय पक्ष, नेते आणि कलाकार या चित्रपटाच्या बाजूने आणि विरोधात उभे आहेत.

तर दुसरीकडे केरळमधील एका मशिदीत हिंदू जोडप्याचे हिंदू रितीरिवाजानुसार लग्न लावून दिले जात असल्याचे व्हिडिओ व्हायरल होत आहे. तर ही गोष्ट अशी आहे, जानेवारी २०२० मध्ये केरळ येथे राहणाऱ्या अंजू आणि शरद यांचे लग्न ठरले होते. मात्र अंजूच्या आईची आर्थिक परिस्थिती फारशी बरी नव्हती. मुलीचे लग्न जवळ आले होते, हाताशी पैसे नव्हते. त्यांनी आपल्या शेजारील मस्जिद कमिटीकडे आर्थिक मदत मागितली. कमिटीने आनंदाने मदतीचे आश्वासन दिले. उलट ते दोन पाऊल पुढे गेले. त्यांनी मस्जिदमध्येच लग्नाचा मंडप सजवला. इतकेच नव्हे तर हा विवाह हिंदू रितीरिवाजाने संपन्न झाला. लग्नात आलेल्या हजारएक पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्थाही मस्जिदच्या प्रांगणात करण्यात आली होती. असे विषय घेऊन का सिनेमे बनवले जात नाहीत ?

महिलांच्या संरक्षणासाठी, त्यांना योग्य मार्ग दाखविण्यासाठी, त्यांच्या भल्यासाठी खास करून हिंदू महिलांसाठी हा सिनेमा आहे. तर हिंदू महिलांनी नक्की हा सिनेमा पाहावा तसेच मुस्लिमांशी मैत्री करू नये, कोणतेही व्यवहार करू नये, असे बरेच गैरसमज पसरवले जात आहेत, तसेच स्टेटस फोनवर ठेवले जात आहेत. आपण शिक्षित असून आपल्याला हे पटते ? तेही आत्ताच्या काळात ? आश्चर्यकारक....!

'द केरळ स्टोरी' हा सिनेमा आधी सत्यघटनेवर आधारित आहे तसेच

त्यात ३२ हजार हिंदू महिला गायब होऊन त्यांचे धर्मांतरण झाले वैगेरे वगैरे बोलले गेले; पण आता जेव्हा हे खरे की खोटे ? ३२ हजार हा आकडा कोठून आला ? याचा पुरावा काय ? ३२ हजार महिला गायब होईपर्यंत सरकार काय करत होते, एकही तक्रार दाखल का नाही झाली ? असे प्रश्न उपस्थित झाले तेव्हा ३२ हजार हा आकडा बदलून ३ वर आला आणि सिनेमा सत्यघटनेवर आधारित नसून काल्पनिक आहे व मनोरंजनासाठी बनवला आहे असे सांगितले जात आहे कारण त्यात तथ्य असलेला एकही पुरावा सादर करू शकले नाहीत. काही नाही हो, सिनेमाचे निमित्त साधून फक्त आणि फक्त गैरसमज आणि नकारात्मकता पसरवली जात आहे कारण सिनेमांचा जनमानसावरील प्रभाव आपल्याला नवा नाही. सिनेमे बघून त्यातल्या नायक-नायिकांच्या वेशभूषा-केशभूषा कॉपी करणारे, वैयक्तिक आयुष्यात आत्महत्या करणारे, पळून जाऊन लग्न करणारे किंवा अगदी पोटच्या मुलांना जीवे मारणारे अशीही उदाहरणं आढळतात. सिनेमाचा हा चांगला-वाईट परिणाम आतापर्यंत व्यक्तिगत पातळीपुरता मर्यादित होता. मात्र आता काही ठरविक सिनेमे त्यातील नकारात्मक परिणामाला सामूहिक बळ देण्याचं काम करू लागलेत. त्याला लव्ह जिहाद जोडायचं आणि गैरसमज वाढवत राहायचं, किती तरी हिंदू मुस्लीम जोडी लग्न करून सुखाने संसार करत आहेत. माझे आईवडील ४० वर्षांपासून सुखाने संसार करत आहेत, तसेच नेहा-अझलान, प्रणिता-एहजाज, विशाल-आरजू, शाहरूख-गौरी अशी बरीच उदाहरणे आहेत. त्यांना तर कधीच 'लव्ह जिहाद'चा अनुभव नाही आला बरं !

आपल्याकडे लग्न झालं की नवरा ज्या जातीचा आहे, ती जात बायकोही लावते अशी परंपरा आहे. एक मैत्रीण पंजाबी तर तिचा नवरा मराठा आहे, एक मैत्रीण रजपूत तर तिचा नवरा बौद्ध आहे, तर ह्या महिलांनी स्व-इच्छित धर्मांतर करून घेतले ते आपल्याला चालते; पण हिंदू महिलेने मुस्लीम पुरुषाशी लग्न करून स्व-इच्छित धर्मांतर करून घेतले तर लगेच आपण 'लव्ह जिहाद' नाव देऊन मोकळे होतो, का ? तर आपल्या मनात घातली गेलेली नकारात्मकता, गैरसमज. आपल्याकडे असं काही लव्ह जिहाद, महिला गायब, जबरदस्तीनं धर्मांतर होत असल्याचं तुम्हाला जाणवतं का ? या समाजाविरुद्ध सतत विखारी नॅरेटिव्ह का मांडावं लागत आहे ? कशासाठी ही एवढी उठाठेव ? बहुसंख्य हिंदू समाज असलेल्या या देशात अल्पसंख्य मुस्लीम समजाविषयीची भीती का ? देशात इतके प्रश्न आ वासून उभे असताना सतत मुस्लीम समाजच शत्रू म्हणून का चितारला जातोय ?

नेमक्या प्रश्नांपासून लक्ष भरकटवण्याचा हा प्रकार नाही का ? या सगळ्यांची उत्तरं तातडीने शोधण्याची वेळ आली आहे. बहुतांश भारतीयांच्या मुस्लिमांविरुद्धच्या भावना गढूळलेल्या असताना अशा प्रकारचा प्रचारकी सिनेमा त्यांच्या भावना आणि प्रतिक्रिया उद्दीपित करण्याचं काम करतो, हे चित्र चिंताजनक आहे. भारतीय प्रेक्षक सिनेमा पाहताना कॅमेऱ्याची नजर विसरतो आणि पडद्यावरील कथा हेच त्याचं वास्तव असल्याचा विश्वास ठेवू लागतो; पण हा विश्वास खोट्या कथानकांबद्दल निर्माण झाल्यास काय करायचं ? घरातलं लहान मूल खोटं बोललं तरी आपण त्याला दटावतो, कधी शिक्षा करतो; पण खोटी नॅरेटिव्हज् राजरोसपणे मांडणाऱ्या सिनेकर्त्यांना कुणीच जाब विचारत नाही. मग त्या खोट्या माहितीला सत्य मानून त्याला प्रक्षोभक प्रतिसाद देणाऱ्या लोकांच्या कृतीची जबाबदारी कुणाची ? हे सगळंच बेलगाम आहे का ?

या सगळ्यांपेक्षा किती तरी महत्त्वपूर्ण प्रश्न आहेत. महिलांचे प्रश्न जसे की, शिक्षण, नोकरी, बालविवाह, हुंडाबळी जे सोडवणे खूप जरूरी आहेत. अजूनही बऱ्याच वेळेस मुलींना शिक्षण व नोकरी पासून वंचित ठेवले जाते, आजही हुंडाबळीच्या बातम्या आपण पाहतो. आजही १८ वया पेक्षा कमी वय असलेल्या मुलींचे विवाह होतात. गंभीर बाब ही आहे की, बालविवाहात आपला महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. त्यातही सोलापूर जिल्हा हा पहिल्या क्रमांकावर आहे. सोलापूर जिल्ह्यात सगळ्यात जास्त प्रमाणात बालविवाह होतात, ही सोलापूरकरांसाठी किती गंभीर बाब आहे. हे सर्व प्रश्न आपण एकत्र येऊन सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, आपण निवडून आणलेल्या राजकीय नेत्यांनी पाच वर्षांत किती विकास घडवून आणला, किती आणि काय काय कामे पूर्ण केलीत, तसेच बालविवाह व हुंडाबळी सारखे गंभीर विषय सोडवण्यासाठी काय प्रयत्न केलेत याचा आढावा घेतला पाहिजे, ते सोडून आपण अजूनही हिंदू-मुस्लीम करत बसलो आहोत.


(लेखिका या सोलापूरस्थित शिक्षिका आणि
मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्या आहेत.)

■ ■

आदरांजली

प्रो. राम ताकवले सरांना आदरांजली

● डॉ. बेनझीर तांबोळी



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, दिल्ली आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरू राहिलेले, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे Founder Director राहिलेले प्रोफेसर राम ताकवले सर यांचे १३ मे ला रात्री वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

शिक्षणक्षेत्रात विविध पातळीवर कार्य करणाऱ्या सर्वांनाच मार्गदर्शक असणाऱ्या ताकवले सरांच्या निधनामुळे तयार झालेली पोकळी भरून काढणे आपल्याला अतोनात कठीण जाणार आहे. सर्वसामान्यांना संगणकाचे शिक्षण मिळावे म्हणून महाराष्ट्र ज्ञान महामंडळाची (MKCL) स्थापना हा सरांचा विचार होता. समाजविकासकेंद्री शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या ताकवले सरांनी गांधींजींच्या नई तालिम संकल्पनेचा सातत्याने पाठपुरावा केला. राम ताकवले हे द्रष्टे समाजशिक्षक होते. ताकवले सरांसारख्या ऋषितुल्य व्यक्तीचे विचार ऐकायला मिळाले, त्यांचे मार्गदर्शन मिळाले आणि त्यांचा सहवास लाभला हे माझे भाग्यच म्हणावे लागेल.

MKCL मध्ये सरांची आणि माझी पहिली भेट झाली आणि ती आजही माझ्या लक्षात आहे. समोरच्या माणसाला अजिबात दडपण येणार नाही; पण अपेक्षित असलेली माहिती नकळतपणे मिळेल असा सरांचा संवाद होता. त्यानंतरच्या प्रत्येक भेटीत नेहमीच मला काही ना काही शिकायला मिळाले आणि सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू हळूहळू मला उलगडत गेले. प्रसन्न हसणे, अत्यंत नम्रपणे बोलणे, सर्वांची आपुलकीने चौकशी करणे, लहानात लहान गोष्ट असली, तरी सविस्तर समजावून सांगणे आणि समजून घेण्याची तयारी असणे हे सरांशी बोलताना नेहमीच जाणवले. प्रखर बुद्धिमत्तेचे धनी, कर्तव्यदक्ष ताकवले सर मितभाषी आणि मृदुभाषीही होते. जेवढा सरांचा सहवास लाभला त्यात त्यांना

कधीही कुणावरही रागावलेले पाहिले नाही.

तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचावे ही सरांची तळमळ होती. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कसे काम करावे, विद्यार्थी समाजाचाच एक भाग असल्यामुळे समाजाच्या एकूण प्रगतीसाठी शिक्षकांनी कोणती भूमिका घ्यावी याबाबतही सरांचे विचार मार्गदर्शक होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाजविकास हा सरांचा मूलभूत विचार होता. विद्यार्थी, शाळा, संस्था आणि हे सर्व ज्या समाजाचा अविभाज्य भाग आहेत त्या आजूबाजूच्या समाजात शिक्षणाच्या माध्यमातून सुधारणा व्हाव्यात असेच सरांना अपेक्षित होते. यासाठी ते सतत नवनव्या संकल्पना मांडत असत आणि त्याचा पाठपुरावाही करत असत. जीवनशिक्षण, मूलोद्योग, ग्रामसाक्षरता, ज्ञानविस्तार इत्यादी अनेक उपक्रम राबण्यासाठी सरांनी सर्वोतोपरी प्रयत्न केले. उच्चशिक्षणाचा परीघ विस्तारावा; परंतु त्यासाठी प्राथमिक शिक्षणाचा पाया पक्का असावा ह्यासाठी भरघोस प्रयत्नांची गरज सरांनी वेळोवेळी अधोरेखित केली होती.

आपल्या उंबरठ्यावर येऊन ठाकलेल्या डिजिटल युगाच्या आगामी काळात अनेक पारंपरिक नोकऱ्या कालांतराने नाहीशा होतील. आपली बहुतांशी किंवा सर्वच कामे यंत्राद्वारे किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे केली जातील. अशा परिस्थितीत प्रत्येकाने स्वतःसाठी स्वतःची नोकरी म्हणजेच अर्थार्जनाची व्यवस्था निर्माण केली पाहिजे. यासाठी आवश्यक ते ज्ञान मिळवणे; आपण यंत्रांद्वारे re-place होणार नाही यासाठी भावात्मक कौशल्ये मिळवणे हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे असे सर नेहमी सांगत असत.

सरांच्या सोबत MKCLच्या कामानिमित्ताने प्रवास करण्याचाही योग आला. एकदा मी, माझ्या सहकारी आसावरी आंबेकर आणि ताकवले सर राजगुरूनगर येथे एका मिटिंगसाठी जाणार होतो. सकाळी लवकरच निघायचे होते, कारण दहा वाजता ती मीटिंग होती. आसावरी मॅडम आणि मी सरांच्याकडे जाऊन पुढे जायचे असे ठरले होते, त्याप्रमाणे आम्ही निघालो. नाशिक फाट्याच्या थोडं पुढे गेल्यानंतर सरांनी दोन मोठे डबे आमच्या हातात ठेवले. एका डब्यामध्ये व्यवस्थित तुकडे केलेला चॉकलेट केक आणि दुसऱ्या डब्यामध्ये भोपळ्याचे घारगे ! आम्ही दोघीही नि:शब्द......

सरांनी पुढे जे सांगितलं ते कधीही न विसरता येणारं होतं. सर म्हणाले,

(कृपया पान ६५ पाहा....

अभिवादन

परमवीर चक्र विजेता : अब्दुल हमीद



भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झालीत; पण मातृभूमीच्या संरक्षणासाठी बलिदान देणाऱ्या अनेकांची म्हणावी तशी इतिहासाने नोंद घेतलेली नाही. इतिहासातील असंच एक दुर्लक्षित; पण १९६५ च्या भारत- पाकिस्तान युद्धामधील भारतमातेचा सुपुत्र अशी ज्यांची ओळख सांगता येईल ते व्यक्तिमत्त्व म्हणजे अब्दुल हमीद. अब्दुल हमीद यांना टँक डिस्ट्रॉयर या नावाने ओळखले जाते. त्यांनी पाकिस्तानचे ८ टँक्स नेस्तनाबूत केले होते. भारतीय सैन्याच्या हातबॉम्ब फेकणाऱ्या सैन्याच्या चौथ्या बटालियनमध्ये कंपनी क्वॉर्टरमास्टर हवालदार म्हणून अब्दुल हमीद कार्यरत होते. याच पदावर असताना १९६५ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धामध्ये अब्दुल हमीद यांनी शत्रूला न जुमानता आपल्या मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी शौर्याने लढा दिला. अब्दुल हमीद हे सुरुवातीपासूनच तरबेज नेमबाज होते. त्यांना पोहणे, कुस्ती करणे, शिकार करणे, गटक खेळणे (शिख समाजातील तलवारीचा एक खेळ) यासारख्या खेळांची खूप आवड होती. अँटी टँक गन्सवरील त्यांचे कौशल्य कुशल अधिकाऱ्यांच्या उत्कृष्टतेप्रमाणे होते, त्यामुळे त्यांना अँटी टँक रिकॉइललेस (RCL) गन्स राखण्याची जबाबदारी दिली होती आणि त्यांनी आपली ही जबाबदारी इतकी उत्तमरित्या सांभाळली की त्यामुळे भारत-पाक युद्धाचे चित्र पालटले. त्यांनी काही क्षणात शत्रूचे तीन टँक उडवले. चौथा टँक तर त्यांनी अचानक पण अचूक नेम लावत एका झटक्यात उडविला. शत्रू मागे हटला; पण पुढच्याच दिवशी पुन्हा समोर आला आणि अब्दुल हमीद यांनी पाकिस्तानी सैन्याचे अजून दोन टँक्स नष्ट केले. पाकिस्तानी सैन्याने त्यांना हेरले आणि त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला, पण अब्दुल हमीद यांनी न डगमगता आपला लढा मोठ्या शौर्याने सुरूच ठेवला. सरतेशेवटी त्यांनी

आपला मोर्चा शेवटच्या ८ व्या टँककडे वळविला आणि आपल्या अचूक निशाण्याने तोही उडवला; पण दुर्दैवाने त्याचवेळी त्या टँकमधून निघालेल्या गोळ्याने अब्दुल हमीद यांच्या जीपला लक्ष्य केले आणि आपले कार्य पूर्ण करून अब्दुल हमीद शहीद झाले. त्यांच्या या कामगिरीची संपूर्ण देशाने दखल घेतली आणि १९६६ मध्ये त्यांना मरणोत्तर परमवीर चक्र प्रदान करण्यात आले. त्या युद्धामध्ये पुढे भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य गाजवत पाकिस्तानवर विजय मिळवला.

जय हिंद.... जय भारत....!


(मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते **प्रा. अमर तांबोळी,** कराड यांनी Inmarathi.com या वेबसाईटवरून माहिती घेतली आहे.)

.....पान ६३ वरून)

'तुम्हाला घरातलं सगळं आणि सगळ्यांचं करून सकाळी लवकर निघावं लागलं असेल, नाश्ता करायला वेळ मिळाला असेलचं असं नाही, जेवायलाही वेळ होईल म्हणून ही व्यवस्था. खाऊन घ्या....' वास्तविक सरांचं वय असं होतं की आम्ही त्यांची काळजी घ्यायला हवी; पण सर आमचा विचार करत होते. मोठी माणसं मोठी असतात ती ह्यामुळेच. इतरांच्या भूमिकेत जाऊन त्यांचा विचार करायचा आणि आपल्याला शक्य असेल ते त्यांच्यासाठी करायचे हे सरांनी त्यादिवशी प्रत्यक्ष कृतीतून आम्हाला शिकवले. सरांची ही शिकवण कृतीतून प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करणे हीच सरांना खरी आदरांजली ठरेल !

(लेखिका मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्या आणि सत्यशोधक फातिमाबी शेख मुस्लीम महिला मंचच्या प्रमुख आहेत.)

■ ■



स्वागत नव्या पुस्तकांचे...

अहवाल

मुस्लीम सत्यशोधकचा ५३ वा वर्धापनदिन

● समिना पठाण-जाधव

आधुनिक भारताचे शिल्पकार आधुनिकतावादी हमीद दलवाई यांनी स्थापन केलेल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळास २२ मार्च २०२३ रोजी ५३ वर्षे पूर्ण झाले. दरवर्षी मंडळाचा वर्धापनदिन परिसंवाद/व्याख्यान, प्रकाशन आणि विविध पुरस्कार प्रदान करून साजरा करण्यात येतो. यावर्षी वर्धापनदिनाचे औचित्य साधून 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका वर्धापनदिन विशेषांक' आणि 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ - पर्स्पेक्टिव्ह अँड मॅनीफेस्टो' या संस्थेच्या ध्येय-उद्दिष्टांवर आधारित इंग्रजी पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा ५३ वा वर्धापनदिन दिनांक २२ मार्च २०२३ रोजी, पुण्यातील एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशनच्या मुख्य सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात सकारात्मक व सक्रिय भूमिका घेणाऱ्या सुप्रसिद्ध अभिनेत्री मा. उर्मिला मातोंडकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते पटना येथील प्रसिद्ध लेखक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि राज्यसभेचे माजी खासदार मा. अली अन्वर अन्सारी यांना निमंत्रित करण्यात आले होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वर्धापनदिनी यावर्षी दोन पुरस्कार देण्यात आले. पहिला पुरस्कार हा 'हमीद दलवाई समाज प्रबोधन पुरस्कार' मा. डॉ. जहीर काझी (मुंबई) यांना शिक्षण, समाज आणि वैद्यकीय क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल देण्यात आला. मा. डॉ. जहीर काझी हे अंजुमन आय. इस्लामचे अध्यक्ष आणि राष्ट्र सेवा दलाचे कार्यकारी विश्वस्त आहेत. तसेच मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त दुसरा पुरस्कार हा 'सत्यशोधक फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान पुरस्कार' मा. वसीमा हैदरसाब शेख यांच्या प्रेरणादायी कार्याबद्दल त्यांना बहाल करण्यात आला. मा. वसीमा हैदरसाब शेख या प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत मुक्त विद्यापीठातून पदवी संपादन करणाऱ्या आणि अमरावतीच्या विद्यमान उपजिल्हाधिकारी आहेत. या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून ज्येष्ठ सत्यशोधक नेते आणि कार्यकर्ते

मा. डॉ. बाबा आढाव यांना निमंत्रित करण्यात आले होते; परंतु मा. डॉ. बाबा आढाव यांची प्रकृती चांगली नसल्यामुळे ते या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाही. तसेच काही अपरिहार्य अडचणीमुळे मा. डॉ. जहीर काझी हे या कार्यक्रमासाठी उपस्थित राहू शकले नाहीत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी होते. वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे, प्रमुख वक्ते आणि पुरस्कारार्थी या सर्वांनी आपले भारावून टाकणारे मनोगत व्यक्त केले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी आपल्या मनोगतामध्ये संस्थेच्या कार्याचा आढावा, हमीद दलवाई यांची प्रेरणा आणि सद्य:स्थितीतील प्रबोधन कार्यासमोरील आव्हानांचा आढावा घेतला, तसेच आजच्या घडीला मुस्लीम सत्यशोधक मंडळावरील जबाबदारीचा मागोवा घेतला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाच्या सत्यशोधक फातिमाबी शेख महिला मंच प्रमुख डॉ. बेनझीर तांबोळी यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये अमरावती येथील सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका रजिया सुलताना यांच्या आत्मकथनात्मक 'रजनी ते रजिया' या पुस्तकाचे मा. उर्मिला मातोंडकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच उर्मिला मातोंडकर यांच्याच हस्ते अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत उपजिल्हाधिकारी झालेल्या मा. वसीमा शेख यांना 'सत्यशोधक फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान' पुरस्काराने गौरवण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या सामाजिक, सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात सकारात्मक आणि सक्रिय भूमिका घेणाऱ्या सुप्रसिद्ध अभिनेत्री मा. उर्मिला मातोंडकर यांनी उपस्थित सर्व श्रोत्यांशी अभ्यासपूर्ण संवाद साधला. त्यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, 'हमीद दलवाई हे क्रांतिकारक होते. त्यांनी मुस्लीम महिलांवरील अन्याय, धर्माच्या नावाखाली निर्माण होणारे विविध प्रश्न सोडवण्यासाठी कार्य केले. समाजाने दुर्लक्ष केलेल्या अनेक मुद्यांवर आवाज उठवण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. मात्र ५३ वर्षांनंतर आजही ते प्रश्न आणि मुद्दे अधिक कालसुसंगत आहेत असे दिसते. त्यामुळे हमीद दलवाई, महात्मा फुले, सावित्री फुले यांचे काम पुढे नेणे ही आपली जबाबदारी आहे. सध्या समाज आणि धर्मा-धर्मात लहान सहान मुद्यांवरून वाद निर्माण होत आहेत; परंतु याला महाराष्ट्र अपवाद ठरायला पाहिजे होते. महाराष्ट्रात हिंदू-मुस्लीम हे दोन भिन्न समाज असून ते एकोप्याने नांदत होते. आज काळजी

वाटावी अशी स्थिती आहे. सद्भाव मोडीत काढण्याचे षडयंत्र रचले जात आहे; परंतु महाराष्ट्रात हिंदू - मुस्लीम भाई भाई असल्याचे चित्र पाहावयास मिळते. हे सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण असून, ते देशाला दिशा देणारे ठरत असल्याचे मत अभिनेत्री उर्मिला मातोंडकर यांनी यावेळी व्यक्त केले. राजकारणापेक्षा समाजकारण मोठे असून आपण महाराष्ट्र हाच धर्म म्हणून एकत्र येऊन, माणुसकी या नात्याने एकमेकांसाठी उभे राहून हा राजकारण्यांचा विशिष्ट वर्गाचा विखारी दृष्टिकोन हाणून पाडण्यासाठी एकत्र यावे', असे आवाहन यावेळी अभिनेत्री मा. उर्मिला मातोंडकर यांनी केले. त्या पुढे असेही म्हणतात की, 'शिक्षणाचा दुसरा अर्थ स्वातंत्र्य आहे. शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व देण्याची आवश्यकता आहे. मुस्लीम समाज अजूनही शिक्षणाच्या बाबतीत मागे आहे; पण त्यांनी पुढील पिढीला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच सर्वधर्मांना एकत्र घेऊन जाण्याची पुरोगामी विचारांची परंपरा महाराष्ट्राने नेहमीच जपली आहे, मात्र आज समाजात असहिष्णुता पसरली आहे. धर्माचे राजकारण होत आहे. राजकारणापेक्षा समाजकारण नेहमीच व्यापक असते, हे तरुणांनी लक्षात ठेवले पाहिजे. राजकीय सत्ता येतील आणि जातील; पण समाज पुढे गेला पाहिजे. समाजातील नेतृत्वाने महाराष्ट्र घडवला आहे. आजची परिस्थिती बदलण्यासाठी सगळ्यांनी एकत्र येऊन लढा देण्याची वेळ आली आहे', असे मत प्रसिद्ध अभिनेत्री उर्मिला मातोंडकर यांनी व्यक्त केले.

समाजातील मागासलेल्या मुस्लीम समाजाला संघटित करून बाहेर काढण्याचे काम हमीद दलवाई यांनी केले आहे. महाराष्ट्रातील हिंदू आणि मुसलमान समाज एकमेकांमध्ये मिसळून महाराष्ट्र धर्म पाळत पुढे जात आहे, असे प्रतिपादन उर्मिला मातोंडकर यांनी केले. तसेच, त्यांनी असे मत मांडले की, हमीद दलवाईंमुळे मुस्लीम महिलांना दिशा मिळते कारण हमीद दलवाई यांनी १९७० मध्ये मुस्लीम सत्यशोधक समाज संघटना स्थापन करून, त्या समाजातील महिलांना एक प्रकारे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. समाजातील अनिष्ट घटनांना दूर करण्यासाठी, चळवळ उभी करून समाज पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले. आजच्या काळात आणि त्या काळातील परिस्थिती यामध्ये विरोधाभास आहे. आज समाजातील छोट्या - छोट्या गोष्टींवर वाद निर्माण होत आहेत; परंतु, महाराष्ट्र हे असे राज्य आहे की त्यामध्ये हिंदू आणि मुसलमान हे एकमेकांच्या गळ्यात हात घालून पुढे जात आहेत. प्रत्येक धर्माने माणसाला चांगले आयुष्य जगण्याचा दृष्टिकोन दिला.

सद्सद्विवेक बुद्धी दिली. मात्र आजची सामाजिक परिस्थिती बघता, 'विवेकाला धरून वागा' असे सांगावे लागणे दुर्दैवी आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवर धार्मिकतेचे राजकारण सुरू आहे, त्याला बळी पडू नका. घाबरून मागे जाणाऱ्यांमधला महाराष्ट्र नाही. तरुणांनी सगळ्यांना एकत्र आणून, महाराष्ट्राला पुन्हा पुरोगामी विचारांकडे नेण्याची गरज आहे. अशी अपेक्षा उर्मिला मातोंडकर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून पटना येथील प्रसिद्ध पत्रकार, लेखक, सामाजिक सबलीकरणाच्या मुद्यावर भरीव योगदान देणारे कार्यकर्ते, ऑल इंडिया पसमांदा मुस्लीम समाजाचे नेते आणि राज्यसभेतील माजी खासदार मा. अली अनवर अन्सारी हे उपस्थित होते. त्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. मा. अली अन्वर अन्सारी म्हणाले की, हमीद दलवाई यांच्या संस्थेला ५३ वर्षे झाली तरी, भारतात वास्तव्य असूनही मला त्यांचे काम समजण्यास उशीर झाला, याची खंत वाटते. आज अघोषित आणीबाणीचा काळ असताना, कट्टरता आणि धर्म या बाबी अफूच्या गोळी सारखे काम करत असताना, दलवाई यांचे कार्य आणि विचारांचे महत्त्व ठळकपणे अधोरेखित होते. मा. अली अन्वर अन्सारी पुढे असे म्हणतात की, हिंदू आणि मुस्लीम या दोन समाजात तेढ निर्माण करण्यापेक्षा त्यांच्यात 'मानव जात' ही संकल्पना रूजविणे गरजेचे आहे. तरच देशात सर्वधर्मसमभाव राहील. महात्मा ज्योतिराव फुले, फातिमाबी शेख यांच्या कार्यामुळे आज महिला पुढे जात आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळे देश एकसंध राहिला आहे. आपले मनोगत व्यक्त करत असताना, मा. अली अन्वर अन्सारी यांनी सांगितले की, देशात ठराविक वर्गातील स्वार्थी राजकारण्यांनी जाती - धर्माच्या नावाने लोकांच्या डोळ्यांवर पडदा टाकला आहे. त्यांना विरोध केल्यावर हल्ले केले जात आहेत. सद्य:स्थितीला देशात अघोषित आणीबाणी सुरू झाली असून, २०२४ ही देशातील शेवटची निवडणूक राहणार आहे, अशी टीका त्यांनी केली. सामूहिक हत्या, मॉबलिंचिंगचे प्रमाण वाढत आहे. कपोलकल्पित लव्ह जिहाद, धर्मांतर आदी नावाने समाजावर बंधने लादली जात आहेत. संविधानात्मक मूल्यांचे अवमान होत आहे. त्यामुळे विरोधी पक्षातील सर्व पक्षांनी एकत्र येऊन या ठराविक वर्गासमोर निडरतेने विरोध करणे, ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मा. अन्वर अली यांनी केले.

मा. अली अन्वर अन्सारी यांनी राजकीय नेतृत्वांकडून पसरवल्या जात असलेल्या धार्मिक कट्टरता वादाबद्दल नाराजी व्यक्त केली. हिंसेच्या माध्यमातून समतावादी विचार दाबण्याचा सध्या प्रयत्न सुरू आहे. लोकांच्या डोळ्यांवर धर्माच्या पट्ट्या बांधल्या गेल्या आहेत. देशात आणीबाणी सदृश परिस्थिती दिसत आहे, मात्र आपण घाबरून न जाता सडेतोड उत्तर दिले पाहिजे अशी अपेक्षा अन्सारी यांनी व्यक्त केली. मा. अली अन्वर अन्सारी म्हणतात की, धर्मांधतेचा बिमोड देशातील नागरिकच करतील. भीती, आमिष तसेच ब्लॅकमेलिंगला घाबरून काही लोक सत्ताधाऱ्यांच्या पक्षात प्रवेश करीत आहेत. मात्र, देशातील नागरिक, शेतकरी, कामगार यांना कसली भीती आहे ? त्यांनी पलायन न करता, परिवर्तनाची लढाई लढली पाहिजे. तेच देशातील धर्मांधतेचा बिमोड करतील, असा आशावाद राज्यसभेचे माजी खासदार आली अन्वर अन्सारी यांनी व्यक्त केला. पुढे ते म्हणतात की, सत्ताधारी असो वा विरोधी पक्षातील नेते, धर्माच्या नावाखाली ते नागरिकांना मूर्ख बनवत आहेत. डोळ्यांवर धर्माचा पडदा टाकून मनुष्याच्या अन्न, शिक्षण, समानता या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे. देशात मागच्या दहा वर्षांपासून अघोषित आणीबाणी सुरू असल्याचे सांगत, सत्ताधाऱ्यांकडून देशातील लोकशाहीचा गळा दाबण्याचे काम केले जात आहे. सध्या 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द उच्चारण्यास लोक धजावत नाहीत. 'धर्मनिरपेक्षता' हा या देशाचा आत्मा आहे. जर भारताच्या संविधानातून 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द काढण्यात आला, तर जसा शरीरातून आत्मा काढला तर तो केवळ एक हाडांचा सापळा राहील, अगदी तशीच देशाची अवस्था होईल. विरोधी पक्षांनी एकत्र यावे. देशातील परिस्थितीचे व्यवस्थित आकलन करीत, पर्याय उभा करावा. अन्यथा सर्वांना कारागृहात जावे लागेल. यापुढे मा. अली अन्वर अन्सारी असे म्हणतात की, कोणताच धर्म हा 'विवेक आणि माणूसकीला सोडून वागा' असे सांगत नाही. दुधात जशी साखर मिसळते, तसेच महाराष्ट्रात हिंदू-मुस्लीम एकत्र मिसळलेले आहेत. सत्यशोधक वृत्तीने समाजाला पुढे नेण्याची गरज आहे. राजकारणापेक्षा समाजकारण खूप व्यापक असते. सर्वच समाज एकत्रितपणे पुढे गेला पाहिजे. धार्मिक कट्टरता आणि धर्मांधता यातून मार्ग काढत मार्गक्रमण केले पाहिजे. त्यासाठी तरुण पिढीने पुढे येणे गरजेचे आहे. सध्या समाजात विषमता पसरवली जात आहे. त्यामुळे, समाजाला जागृत होण्याशिवाय पर्याय नाही. हिंदू आणि मुसलमान या दोन समाजात तेढ निर्माण करण्यापेक्षा, मानव जात ही संकल्पना समाजात रूजवली पाहिजे.

२०२३ वर्षाचा 'सत्यशोधक फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान पुरस्कार' मा. वसीमा हैदरसाब शेख यांना प्रदान करण्यात आला. वर्धापनदिनाच्या या कार्यक्रमांमध्ये मा. वसीमा हैदरसाब शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा. वसीमा हैदरसाब शेख अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करून प्रशासकीय सेवेत रूजू झालेल्या अमरावतीच्या विद्यमान उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी आपला खडतर शैक्षणिक प्रवास उलगडला. मुस्लीम समाजातील, तसेच समाजातील सर्वच स्तरातील स्त्रियांच्या प्रश्नाचे उत्तर 'शिक्षण' या एका गोष्टीमध्ये आहे, असे वसीमा शेख यांनी सांगितले. वसीमा शेख पुढे म्हणाल्या की, देशात स्त्री-पुरुष समानता असल्याचे दाखविले जाते; परंतु प्रत्यक्षात हा समतोल साधला जात नसून, यासाठी महिलांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. 'आत्मविश्वास, कष्टाची तयारी, योग्य नियोजन आणि आव्हानांना संधी म्हणून काम केल्यास यश मिळतेच' असा विश्वास वसीमा शेख यांनी व्यक्त केला. आपल्या संघर्षाचे वर्णन करताना उपस्थित श्रोते भारावून गेले होते. विशेषतः त्यांनी आपली बिकट कौटुंबिक परिस्थिती सांगून अशा परिस्थितीत भावाने कष्ट करून दिलेली साथ महत्त्वाची ठरल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या अनेक मुलींना समाज आणि शासनाने सहकार्य करण्याची गरज व्यक्त केली. याप्रसंगी मा. वसीमा शेख यांचे पती हैदरसाब शेख, लेखिका रजिया सुलताना आणि पोलीस उपनिरीक्षक म्हणून नियुक्ती झालेल्या तहसीन बेग यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा ५३ वा वर्धापनदिन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. शमसुद्दीन तांबोळी (अध्यक्ष), प्रा. सायरा मुलानी (उपाध्यक्ष), प्रा. जमीर शेख (कार्यवाह), नवाब अल्ताफ हुसेन (सहकार्यवाह), दिलावर शेख (खजिनदार), प्रा. समीना पठाण (कार्यकारणी सदस्य), महिला मंच प्रमुख डॉ.बेनझीर तांबोळी, श्रीरूपा बागवान, जुनेद सय्यद आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या इतर कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

प्रा. जमीर शेख यांनी या कार्यक्रमात मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे सर्वांचे आभार मानले आणि सामुहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

(लेखिका समिना पठाण या मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकारिणी सदस्य आहेत)

■ ■

गोरैया

खून पसीना एक करके
दस बाय दस के
जमीन के छोटे से टुकड़े पर
बस्ती के दादा को रिश्वत देकर
छोटा सा आशियाना बनाया था।

घर में गोल घुमकर
चारों और मुआयना करते हुए
हाथों में मेरा हाथ थामकर
बेगम ने कहा था,
'चलो अच्छा हुआ
रयने कू छप्पर मिल गया'
उसकी छलकती आंखों से
खुशी भीग रही थी
पल्लू से आंख पोंछते हुए
नन्ही सी बिटिया को
गोद मे उठाकर कहने लगी,
'ये अपून का घर
अब्बू का, अम्मी का ...'

छोटे से रोशनदान पर
छोटी सी गोरैया को देख कर
नन्ही बेटी खुशी से उछल पड़ी ,
'अब्बू , वो देखो चिडिया...'

अब वक्त बदल गया है
वे लम्हें अब नहीं रहे
रात ख़ौफ़ज़दा, वीरान है, खामोश है
रोशनी भी हांफ रही है
सांस फूल गई है
छोटे से आशियाने का
छोटा सा रोशनदान, दरवाज़ा
दुश्मन बन चुके है।

रात बे रात मैं नींद से
घबराकर जाग जाता हूं
बेगम और बिटिया को
छूकर इत्मीनान कर लेता हूँ
के, वे अभी जिंदा है
रोशनदान तो अब
किले ठोंककर बंद कर दिया है
दरवाजे से अपना नाम भी
कब का मिटा दिया है।

लेकिन
रोशनदान की कांच पर
गोरैया मुसलसल चोंच मार रही हैं
उसकी बेचैनी देखकर
आशियाना बेकरार है
उसका छोटा सा घोंसला
घर के अंदर, दीवार के उपर
लकडी पर रह गया है

और मैं मजबूर हूं !

- जावेद कुरैशी

('चिमणी' नज़्म का मराठी से
तर्जुमा : संजय मेश्राम)

अहवाल

सत्यशोधक दलवाई - जवळकर स्मृतिदिन

● **श्रीरूपा बागवान**

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने दि. ३ मे २०२३ रोजी सत्यशोधक दिनकरराव जवळकर/हमीद दलवाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त ज्येष्ठ लेखक, राजकीय विश्लेषक व शैक्षणिक तज्ज्ञ डॉ. हिलाल अहमद यांचे व्याख्यान एस. एम. जोशी सभागृह, पुणे येथे आयोजित करण्यात आले होते.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सत्यशोधक बाबा आढाव यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. याप्रसंगी डॉ. अहमद यांचे स्वागत व सत्कार बाबांच्या हस्ते तर अध्यक्षांचे स्वागत शाहिन सय्यद यांनी केले. प्रास्ताविक महात्मा फुले प्रतिष्ठानच्या सरचिटणीस ॲड. शारदा वाडेकर यांनी, तर निमंत्रित वक्त्यांचा परिचय व स्वागत-सत्कार मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी केले. दलवाई-जवळकर स्मृतिदिनानिमित्त गेल्या २५ वर्षांपासून दोन्ही संस्थांतर्फे महिला मेळावे, कार्यकर्ते शिबिर, व्याख्याने व विविध परिषदांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती डॉ. तांबोळींनी दिली.

दिल्लीस्थित डॉ. हिलाल अहमद यांनी School of oriental African studies, University of London येथून डॉक्टरेट प्राप्त केली असून ते S.C.D.S. दिल्ली येथे सहयोगी प्राध्यापक आहेत. दिल्ली विद्यापीठात राज्यशास्त्राचे अध्यापक म्हणून त्यांनी काम केले. 'साऊथ एशियन स्टडीज' या मासिकाचे सहयोगी संपादक आहेत, तर देशविदेशात राजकीय विश्लेषक म्हणून त्यांना निमंत्रित केले जाते. अनेक मान्यवर विद्यापीठांच्या त्यांना फेलोशिप व पुरस्कार मिळाले आहेत. 'अल्लाह नाम की सियासत', 'मुस्लीम पॉलिटिकल डिसकोर्स इन पोस्ट कोलोनियल इंडिया', 'सियासती मुस्लीम - ए स्टोरी ऑफ पॉलिटिकल इस्लाम इन इंडिया' ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत, तर 'रिथिंकींग मुस्लीम पर्सोनल लॉ इश्यूज इल्याबेट ॲण्ड रिफॉर्मस्' हे पुस्तक प्रकाशित होणार आहे. 'जामा मस्जिद' आणि 'कुतुब - एक अधुरा अफसाना' या लघुपटाची निर्मिती त्यांनी केली असून, 'बेकन्स ऑफ होप' हा लघुपट त्यांच्या आयुष्यावर चित्रित करण्यात आला आहे. सध्या 'पॉलिटिक्स

ऑफ मुस्लीम पॉलिटिकल रिप्रेझेंटेशन' या पुस्तकावर ते काम करीत आहेत.

संस्थेशी निगडित 'मुस्लीम सत्यशोधक विचार आणि आजच्या भारतात त्याची प्रासंगिकता' या विषयावर बोलताना डॉ. हिलाल अहमद यांनी महाराष्ट्रात बाकरवडी आणि सुनील गावस्कर हे आपल्याला प्रिय आहेत, असा मिस्किलपणे प्रारंभ करीत 'केवळ ऐकणारा नाही, तर बोलणारा समाज ही संवाद पद्धती दलवाई-म. फुलेंना जशी अभिप्रेत होती तीच आपण पुढे घेऊन जात आहोत. पूर्ण सत्य हे कुणाकडे नसते तर प्रत्येकाकडे ते स्वरूपानुसार बदलते; पण तरीही ते सत्यच असते. मग शोध कशाचा घ्यायचा ? सत्यशोधनाचा अर्थ काय आहे ? आपल्या महान विचारकांचे अनुकरण कशा प्रकारे करायचे, तर अनुकरण आणि अंधभक्ती यात फरक काय करावा ? आजचे आपले प्रश्न काय आहेत ? याचे विश्लेषण करताना ते म्हणतात, मी भारतीय लोकतंत्र व मुस्लीम राजकारणाचा शोधार्थी आहे; पण मी समतेला प्राधान्य देतो. हीच आजच्या भारताची प्रासंगिकता आहे.

'दलवाईंचे लेखन हे अनुभव प्रेरित होते. ते एक जहाल सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते होते, तर माझे काम चळवळींचा शोध घेणे आहे; पण मी राजकीय तत्त्वे मांडत नाही. दोघेही सामाजिक सामंजस्य निर्माण करू इच्छितो. ते कार्यकर्ता असल्याने त्यांचा भर प्रत्यक्ष कृतीवर असल्याने त्यांच्या लेखनात उग्रता आहे. तर माझ्या लेखनात विश्लेषण आहे. उग्रतर्क आणि विश्लेषण यातून कसा मार्ग बनवला जावा हीच समस्या मला भेडसावते. दलवाईंच्या काळात शक्यता आहे की हिंदू-मुस्लीम सांप्रदायिकता काही प्रमाणात होती; पण आमच्या काळात हे संतुलन समोर दिसत नाही. याचा संबंध हिंदू सांप्रदायिकतेशी कसा आहे, तर दोन्ही संदर्भच वेगळे आहेत.'

ही भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात, 'दलवाई नेहमी जवाहरलाल नेहरू आणि जयप्रकाश नारायण (जे. पी.) यांचे उदाहरण देत असत. त्याकाळात ते दोघेही स्वीकाराहार्य होते; पण सद्य: काळात ना कोणी जे.पीं. विषयी बोलतात, तर नेहरू पूर्णत: अस्वीकाराहार्य आहेत. आम्हाला आज काय करायला हवे याचे उत्तर आम्हालाच द्यायचे आहे. फुले, गांधी, आंबेडकर, दलवाई यांना महान मानतो कारण त्याकाळात त्यांनी सद्य:परिस्थितीला शरण न जाता प्रासंगिक उत्तरे शोधली. त्यांच्यावर फुले वाहून काम होणर नाही , तर आम्हाला त्यांच्या प्रश्नांना भिडण्याचा मार्ग समजावून घ्यावा लागेल तरच आम्ही त्यांच्याशी समरस, एकरूप होऊ शकतो. 'विचार कधीच मरत नसतात कारण विचार करण्याची पद्धती अमर असते.'

दलवाईंच्या 'मुस्लीम पॉलिटिक्स इन इंडिया' या पुस्तकात त्यांनी मुस्लिमांमध्ये कधी गांधी जन्मले नाहीत अशी खंत बऱ्याच वेळा व्यक्त केल्याचे सांगून डॉ. अहमद पुढे म्हणतात, की दलवाईंचा इशारा याच पद्धतीकडे होता, त्याच्या अनुसरनाकडे होता, त्याची रूपरेषा करण्याकडे होता.

सत्यशोधक शब्द जेव्हा वापरतो तेव्हा त्याचे चार अर्थ होतात. १) सत्यशोधन आणि त्याची निरंतरता २) सत्यशोधनाचे संदर्भ ३) सत्यशोधनाची ऐतिहासिक पडताळणी ४) सत्यशोधनाचे खुलेपण. या निरंतरतेमध्ये आपले प्रत्येकाचे सत्य वेगळे आहे. म्हणूनच सत्याचा शोध हा एक अजेंडा नसून आमची दैनंदिन प्रयत्नशीलता आहे. ज्याचा शोध घेण्याची इच्छा कायम आपल्यात असली पाहिजे. सत्याची कोणतीच साचेबद्ध परिभाषा नसून विविध कालखंडात, संदर्भात सत्य हे बदलत राहते. काही ठिकाणी दलवाई म्हणतात त्याप्रमाणे आम्हाला ऐतिहासिक संविधानिक सत्याकडे बघितले पाहिजे. सत्य नेहमीच एक इतिहास असतो आणि तोच मूलभूत असतो. जेव्हा जेव्हा आम्ही सत्यशोधनाबद्दल बोलू तेव्हा तेव्हा आम्हाला त्याची ऐतिहासिक पडताळणी करणे जरूरी आहे.

चौथा मुद्दा सत्यशोधनातील खुलेपणाची मांडणी करताना ते याकडे विशेष निर्देश करतात, की आज हिंदू ही ओळख अधोरेखित करताना मुस्लिमांवर निशाणा साधला जात आहे. याच द्वेषाच्या राजनीतीने मुस्लीमपीडित मानसिकता निर्माण केली आहे. सर्व मुस्लीम दोषी नसतात हीच बाब आम्हाला विविधतेकडे घेऊन जाते. दलवाई वारंवार म्हणतात की, आपल्या सत्यशोधनासाठी आपल्या तर्काच्या खुलेपणाचा वापर प्रत्येक परिघटनेवर करा. मुस्लिमांवर बोलूच नका असा अविर्भाव बाळगला तर आम्ही वर्तमान सांप्रदायिकता समजूच शकणार नाही. यासाठीच तार्किक खुलेपणाची आवश्यकता आहे.

हिंदू-मुस्लीम ही लेबलं आहेत. ती आम्ही निवडली नाहीत. जसे की मी पुरुष आहे, मुस्लीम आहे, भारतीय आहे हे जन्माधारित आले आहे. तर मी द्वेष न करता त्यात सकारात्मक बदल घडवू शकतो. मी या समाजात जन्माला आलो त्यामुळे येथील चांगले आणि वाईट मी जाणतो, तसेच त्याला जबाबदारही आहे. म्हणूनच मी मुस्लीम समाजातील योग्य-अयोग्य बाबींबरोबरच भारतीय समाजातील या घटकांच्या बाबतीत जबाबदार आहे. जसा मला हक्क आहे मी हिंदूंच्या चुकींवर व्यक्त होऊ तसेच हिंदूंनाही हक्क आहे की ते मुस्लिमांच्या चुका अधोरेखित करतील.

दलवाईंच्या योगदानाचा सन्मान करताना ते म्हणतात, 'दलवाई सर्वांप्रति

सचेत होते. आम्ही उत्तरे, परिणाम शोधत होतो तर ते प्रश्न आणि उपाययोजना मांडत होते. याला अनुसरूनच मी चार प्रश्न मांडतो. १) लोकतंत्राची प्रासंगिकता २) आर्थिक बरोबरी ३) धर्म आणि धर्मनिरपेक्षता ४) नैतिकता.

'संविधान, प्रिअेंबल आमच्यासाठी कधी जरूरी बनले तर १९९१ पासून लोकतंत्राचे भारतीय संदर्भातील नवीन आयाम समोर आले. डॉ. आंबेडकर म्हणतात, लोकतंत्र एक माध्यम आहे. एका व्यापक सामाजिक परिवर्तनाचे ते साध्य नाही तर साधन आहे. ही भारतीय संविधानाची रूपरेषा आहे. लोकतंत्र साधन आहे तर संविधान त्याचे मूर्त स्वरूप आहे. १९९० पूर्व लोकतंत्र हे साधन बाबरी मस्जिद विध्वंसानंतर मात्र एक परिघटना घडल्याने संघराज्य पद्धतीत राज्याचे स्वरूपच बदलून राज्य हे लोकतंत्राचे साधन न मानता ते एक साध्य मानायला सुरुवात झाली. लोकशाही वाचवण्यासाठी लोकशाही हे लोकशाहीत कशासाठी? याचाच परिणाम होऊन राज्य संविधानिक अंधभक्तीला सुरुवात करतात; पण संविधान कोणतेही पवित्र पुस्तक नसून ते आम्ही सर्वांनी मिळून बनविले असल्याने त्यात परिवर्तन संभव आहे.

'माझ्या लेखनात मी एका टर्मचा वापर करतो, 'हिंदूत्व कॉन्स्टॅटिलिझम.' भाजपची भूमिका बदलण्याचे श्रेय बहुतांश नरेंद्र मोदींना जाते. मागील दहा वर्षांत आपले लोकतंत्र हे पूर्णत: निवडणूक केंद्रित झाले. हा विरोधाभास आहे की, न्यायालयात जाऊनच संविधानाचा प्रतिवाद करावा लागतो. सकारात्मक राजनीती व्हायला हवी. प्रिअेंबलमध्ये वारंवार येते की, लोकहितकारी राष्ट्र लोकहितासाठीच बांधील असते. सामाजिक बरोबरीसाठी हे बनले असून सर्व संसाधनावर आमचा समान हक्क आहे.

'१९९१ नंतर राज्य आर्थिकक्षेत्रात हस्तक्षेप करू लागले. तत्पूर्वी खाजगी क्षेत्राबरोबर राज्यात लालफितीचाही कारभार होता; पण यानंतर अधिक प्रमाणात आर्थिकक्षेत्राचे बाजारीकरण झाले. एका बाजूला संविधान आर्थिक-सामाजिक बरोबरी मांडते तर राज्य आम्हाला बरोबरी नाही, तर बाजारव्यवस्था तयार करायची आहे अशी भूमिका घेतात. राज्यांनी सामाजिक समूहाला आरक्षणाशिवाय संबोधित करणे सुरू केले.

'१९९१ ते मोदी उदयापर्यंत स्वनियंत्रित बाजार नव्हता, तर केंद्र-राज्य हस्तक्षेप होता. उदा. सेज, मनरेगा; पण पश्चात परिस्थिती बदलली. आज सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उदा. महिला, ओबीसी तसेच मुख्यत: मुस्लीम.

याशिवाय बाबासाहेबांनाही भारतरत्न देण्याची राजनीती आखून प्रतिक बनविले गेले. या दुर्बल घटकांना मुक्त अर्थव्यवस्था आहे असे सांगून आम्ही उत्पन्नाचे साधन, नोकरी देणाऱ्या भूमिकेत नाही, तर ती तुम्ही शोधा असे सांगितले गेले. या व्यवस्थेवर सर्वच राजकीय पक्षांचे एकमत आहे अगदी साम्यवादींचेही.

'कार्ल मार्क्स 'धर्म ही अफूची गोळी आहे' असे म्हणतो; पण ती एक विचारधारा आध्यात्मिक पंथही आहे. आजची तरुणाई ही एका बाजूला हातात राशीची अंगठी तर दुसरीकडे हातातील मोबाईलमध्ये हॉलीवुडचे चित्रपट पाहताना दिसते. हीच धर्माची विसंगती आहे. म्हणूनच माझ्या सर्वेक्षणातून मी २०१७ मध्ये काही प्रश्न विचारले. भारतात ९८% लोक धर्म आणि धार्मिकतेवर विश्वास ठेवतात. यात शिव आणि हनुमान आघाडीवर आहेत; पण श्रीराम नाही हेही अधोरेखित झाले. ३०,००० लोकांच्या सर्वेक्षणात आम्ही हिंदू असण्याची परिभाषा काय असे विचारले असता ७०% लोकांनी गायीचे मास न खाणारा तो हिंदू असे सांगितले. म्हणजेच हिंदू होण्याची परिभाषा ही गायीचे मास न खाणे ही आहे. मंदिरात जाणे, पूजा करणे, देवावर विश्वास यापेक्षा ही परिभाषा जास्त मानली जाते. तर ७०% मुस्लिमांनी डुकराचे मास खाणारा मुस्लीम नाही असे सांगितले. याचा अर्थ माणसांवर गाय आणि डुक्कर हे प्राणीमात्र वर्चस्व गाजवित आहेत. नैतिकता, आध्यात्मिकता यावरून धर्म तोलला जात नाही.

'लग्न, मुंडण, अंत्यसंस्कारसारख्या खाजगी विधींचे बाजारीकरण झाले आहे. चंगळवाद फोफावला आहे. पूर्ण समाजात वाईट प्रवृत्ती मूलतत्ववाद वाढतो आहे. याचे उदाहरण देताना उद्या जर काँग्रेस आणि राहुल गांधी सत्तेत आले तर तेही राम मंदिरात जातील. राजकारणातील हा वर्चस्ववाद नाकारायचा असेल तर सर्वांनी मिळून आपले प्रश्न आपणच सोडवायचे आहेत,' असे समारोप करताना अहमद यांनी उद्धृत केले.

अध्यक्षीय समारोप करताना बाबांनी गेल्या ७५ वर्षांत मान्य संविधान पूर्ण अमलात आणले गेले नाही, अशी खंत व्यक्त करताना 'घर घर तिरंगा ऐवजी घर घर संविधान' राबविले गेले पाहिजे. लोकशाही मूल्ये उपेक्षित होता कामा नये अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्थेचे सचिव प्रा. जमीर शेख यांनी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता केली.

(लेखिका मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्या आहेत.)

■ ■

मंडळाचे कार्यक्रम

जानेवारी २०२३ ते ८ मार्च २०२३ पर्यंतच्या कार्यक्रमांचा उल्लेख जाने-मार्च या मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेच्या दीपावली अंकात केला आहे. या पुढील कालावधीतील उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल....

१८ मार्च २०२३ – मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुणे येथील कार्यकर्त्यांची वर्धापनदिन समारंभ तयारी, बैठकीचे आयोजन आणि पत्रकार परिषदेची माहिती.

२२ मार्च २०२३ – मंडळाचा ५३ वा वर्धापनदिन प्रकाशन, व्याख्यान आणि पुरस्कार प्रदान कार्यक्रम. या कार्यक्रमाचा स्वतंत्र वृत्तांत पत्रिकेत देण्यात आला आहे.

याच दिवशी सकाळी १० ते १२.३० दरम्यान बिहार येथून वर्धापनदिन कार्यक्रमासाठी आलेले माजी खासदार मा. अली अन्वर अन्सारी यांच्याशी चर्चात्मक कार्यक्रम जैन वसतीगृह, बी.एम.सी.सी. रोड, पुणे येथे आयोजित करण्यात आला. या चर्चेत पसमांदा मुस्लीमांच्या समस्या आणि वर्तमान राजकीय परिस्थितीवर मांडणी करण्यात आली. मंडळाच्या कार्यकर्त्यांबरोबरच मंडळाचे हितचिंतक आणि समाजवादी कार्यकर्त्यांनी यात सहभाग नोंदवला. मा. अशोक धिवरे सरांनी मा. अली अन्वर अन्सारी यांचे स्वागत केले.

१ एप्रिल – मंडळाच्या कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक. मा. एस. एम. जोशी यांना अभिवादन.

१४ एप्रिल – डॉ. बाबासाहेब आबेडकरांना जयंतीनिमित्त अभिवादन.

२८ एप्रिल – मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचे नांदेड येथील पिपल्स कॉलेज येथे 'समान नागरी कायदा : वास्तव-अपेक्षा आणि आक्षेप' या विषयावर व्याख्यान. माजी खासदार व्यंकटेश काब्दे अध्यक्षस्थानी होते.

१ मे – मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यालयात हमीद दलवाई स्मृतिदिनानिमित्त मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्यावतीने डॉ. हिलाल अहमद यांचे 'मुस्लीम सत्यशोधक विचार और आज के भारत मे इसकी प्रासंगिकता' विषयावरील व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. बाबा आढाव होते. (सविस्तर वृतांत पत्रिकेत दिला आहे.) याच दिवशी मंडळाचे अध्यक्ष डॉ. तांबोळी

यांचा 'दैनिक लोकमत'मध्ये 'हिंदूंनाही दलवाईंची गरज का आहे ?' हा लेख प्रसिद्ध झाला. सदर लेख आणि त्यावरील प्रतिक्रिया प्रकाशित केल्या आहेत. याच दिवशी हिलाल अहमद यांच्याशी अनौपचारिक चर्चा आयोजित करण्यात आली. यावेळी मा. अशोक धिवरे, मा. डी. आर. परिहार, डॉ. शहेन चौधरी, नबाब अल्ताफ हुसेन उपस्थित होते.

४ मे – डॉ. हिलाल अहमद यांच्या समवेत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी 'जागतिक मुस्लीम समुदाय आणि भारतीय मुस्लीम' या विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष तांबोळी यांच्यासह बशीर शेख (ज्येष्ठ कार्यकर्ते), शाहेद शेख, समिर शेख, हिना कौसर खान, प्रा. रूक्साना ख्वाजाबी पाटील व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. डॉ. हिलाल अहमद यांनी महात्मा फुले वाडा आणि डॉ. बाबा आढाव यांच्या भवानी पेठ येथील कार्यालयात भेट देऊन चर्चा केली.

७ मे – कमलताई विचारे यांच्या समवेत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी महात्मा फुले वाड्यास भेट देऊन अभिवादन केले. मा. कमलताईंनी डॉ. बाबा आढाव, महात्मा फुले समता प्रतिष्ठानला भेट दिली आणि हमाल-मापाडी महासंघाच्या राज्यस्तरीय बैठकीस आलेल्या पदाधिकाऱ्यांशी संवाद केला.

१२ ते १५ मे – मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी परभणी, नांदेड, उस्मानाबाद, सोलापूर भागाचा दौरा केला. मराठवाड्यातील कार्यकर्त्यांच्या भेटी आणि चर्चा करण्यात आली. दि. १५ मे रोजी नळदूर्ग येथे मा. पन्नालाल सुराणा यांच्याशी दीर्घ चर्चा केली आणि 'आपलं घर'मधील कार्यकर्ते, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांशी संवाद केला.

२३ मे – मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे हितचिंतक आणि मार्गदर्शक मा. डॉ. राम ताकवले सरांचे दि. १३ मे रोजी वयाच्या ९०व्या वर्षी निधन झाले. यानिमित्त बालशिक्षण मंदिर सभागृह, पुणे येथे डॉ. बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली एम. के. सी. एल.च्या पुढाकाराने आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी डॉ. ताकवले सरांच्या व्यासंगी व्यक्तिमत्वाचा थोडक्यात उल्लेख करून मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्यावतीने आदरांजली व्यक्त केली.

२७ मे – महाराष्ट्र साहित्य परिषदेने डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांना डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार जाहीर केला. हा पुरस्कार साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात प्रदान करण्यात आला. याप्रसंगी लेखक अच्युत गोडबोले यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या

११८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विवेक सावंत होते, तर अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे होते. डॉ. मिलींद जोशी यांनी प्रास्ताविक केले. मा. उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले आणि कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विविध शाखांना गौरवण्यात आले. जीवनगौरव पुरस्कार आणि डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार ज्येष्ठ भाषा अभ्यासक आणि लेखिका प्रा. अंजली सोमण पुरस्कृत आहे.

२८ मे - संत साहित्याचे अभ्यासक ह. भ. प. शामसुंदर सोनार महाराज यांनी आळंदी येथील संत गाडगे महाराज आश्रमात २१ दिवसांचे वारकरी संत संस्कार शिबीराचे आयोजन केले. या शिबीराच्या समारोप दिनी डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी 'धार्मिक सुसंवाद आणि सद्‌भावना' विषयावर विचार मांडले.

१ जून - ज्येष्ठ नेते आणि सत्यशोधक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांना ९४व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा !

२ जून - मानव जनशक्ती मंचाने आयोजित केलेल्या ऑनलाईन कार्यक्रमात द्वेषाधारीत राजकारणावर मात कशी करावी याविषयी डॉ. तांबोळी यांनी मार्गदर्शन केले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे दिवंगत अध्यक्ष मा. सय्यदभाई (८ एप्रिल), ज्येष्ठ कार्यकर्ते मेहरूनमिसाद दलवाई (८ जून) यांच्या स्मृतिदिनानिमित्त स्मरण आणि अभिवादन.

१० जून - महाराष्ट्रातील धार्मिक तणावाची परिस्थिती आणि आगामी कार्यक्रमाची चर्चा करण्यासाठी मंडळाच्या कार्यालयात पुणे येथील कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी डॉ. शमसुद्दीन तांबोळी, दिलावर शेख, बशीर शेख, समिना पठाण, शाहेद शेख, श्रीरूपा बागवान, जुनेद सय्यद आणि कार्यकर्ते उपस्थित होते. महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर, अहमदनगर, संगमनेर, कोल्हापूर, अमरावती, श्रीरामपूर आणि इतर शहरांत धर्मांध लोकांकडून सामाजिक सलोखा, धार्मिक सद्‌भावना आणि सुव्यवस्था मोडकळीस आणून धार्मिक तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर शांतता, सौहार्दता टिकवून ठेवण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्याचे ठरवण्यात आले. समाजमाध्यमातून तसा संदेश पोहचवणे, शांतातापूर्ण मूक निदर्शने करून शासनास निवेदन देणे, तसेच बकरी ईद निमित्त २९ जून रोजी राज्यस्तरीय रक्तदान सप्ताहाचे आयोजन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. यात समता, संविधानवादी,

समविचारी संघटना आणि व्यक्तींचा सहभाग घेण्यासाठी प्रयत्न करण्याचे निश्चित केले.

१० जून – आंतरधर्मिय, आंतरजातीय आणि मिश्र विवाह करणाऱ्यांना सहकार्य करणाऱ्या, त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील संघटनांची संघटना 'चयन' मार्फत ऑक्टोबर महिन्यात लखनौ येथे परिषद आयोजित करण्यात येणार आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ 'चयन'चा भाग आहे. यानिमित्त दिल्लीस्थित धनक फॉर ह्यूमॅनिटीच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या ऑनलाईन बैठकीत मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी सहभाग घेतला.

१४ जून – महाराष्ट्रात वारी-दिंडीचे महत्त्व आहे. या वारीतून सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात येतो. समविचारी संघटना-व्यक्तींच्या समवेत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. दि. १४ जून रोजी कार्यकर्त्यांनी पुणे ते सासवड वारी संत कबीर दिंडी समवेत सहभाग नोंदवला.

२२ जून – ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, नेते अणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे स्थापनेपासून पाठिराखे मा. भाई वैद्य यांच्या ९५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन !

२६ जून – राजर्षि शाहू महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन !

२९ जून – बकरी ईदनिमित्त २०११ पासून रक्तदान अभियान आयोजित करण्यात येते. यावर्षी रक्तदानाबरोबरच मा. सुनील देशपांडे यांचे अवयव दान व देहदान या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच प्रा. समिना पठाण यांचे विद्यार्थ्यांसाठी 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या पुस्तकाचे प्रा. अशोक धिवरे सरांच्या हस्ते प्रकाशन झाले. कोल्हापूर, सातारा, गोंदावले, नंदूरबार, नागपूर आणि इतर ठिकाणीही 'रक्तदान अभियान सप्ताह' आयोजित करण्यात आले.

■ ■

आदरांजली



ज्येष्ठ गणितज्ज्ञ, व्यासंगी लेखिका

डॉ. मंगला नारळीकर

यांचे दि. १७ जुलै रोजी निधन झाले. त्या ७९ वर्षांच्या होत्या.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने विनम्र आदरांजली !

३ मे दलवाई-जवळकर
स्मृतिदिन कार्यक्रम



डॉ. हिलाल अहमद विचार मांडताना....




डॉ. बाबा आढाव
अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना....



मुस्लिम सत्यशोधक मंडळ आयोजित राज्यव्यापी रक्तदान सप्ताह

Registered with Registrar of News Papers of India, New Delhi
Book-Post containing Printed Periodical **Regd. No. 24247 / 73**



महाराष्ट्र साहित्य परिषदेचा डॉ. भीमराव कुलकर्णी पुरस्कार डॉ. विवेक सावंत यांच्या हस्ते स्वीकारताना डॉ. शमसुद्दीन तांबोळी



मा. डॉ. रावसाहेब कसबे आणि मान्यवरांच्या समवेत मंडळाचे कार्यकर्ते.

'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' हे त्रैमासिक मुद्रक व प्रकाशक श्री. शमशुद्दीन तांबोळी यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठी साई समर्थ प्रिंटर्स, दुकान क्र. ४,विठ्ठल हाईटस्, हिंगणे खुर्द, पुणे ५१ येथे छापून सी ८/२३, स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण, पुणे ८ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.